

इंग्लंडचे पार्लमेंट

होती. अशी एखादी विविधांगी प्रक्रिया जेव्हा समाजाच्या फार मोठ्या वर्गात दीर्घकाळ चालू असते तेव्हा तिच्या वेगवेगळ्या अंगांच्या प्रारंभाचा क्रम निश्चित करणे व त्यांच्या एकमेकांवरील परिणामाचे मोजमाप करणे अवघड असते.

इंग्रजांचा पराभव शस्त्राने करता येणार नाही याची जाणीव हे उदारमतवाद आणि लोकशाही राज्यव्यवस्था यांच्या भारतीयांनी केलेल्या पुरस्काराचे एकमेव कारण होते काय? शस्त्रबळाने इंग्रजांचा पराभव करता येणे शक्य नाही हे भास्कर पांडुरंग तर्खडकरांपासून सयाजीराव महाराजापर्यंत सर्वांनाच उमगलेले आणि स्वच्छ दिसणारे सत्य होते. इंग्रजी राज्य जावे व भारतीयांना स्वातंत्र्य मिळावे ही स्पष्ट कल्पना जनमानसात रुजण्याअगोदरच लोकशाही राज्यपद्धती आणि माणसाचे हक्क संरक्षिणारी व्यवस्था याबद्दलचा आग्रह सुरू झाला होता. अर्थात लोकशाही राज्यव्यवस्था येणे याचाच अर्थ जबाबदार राज्यपद्धती येणे म्हणजेच स्वातंत्र्य येणे. राजकीय हक्क क्रमाक्रमाने व हळूहळू मागितले जात असले तरी त्यांचे अंतिम ध्येय स्वातंत्र्य हेच होते हे मात्र खरे. शस्त्रबळाने स्वतंत्र होता येणार नाही हे लक्षात आल्यामुळे लोकशाही मूल्यव्यवस्था अंगीकारून त्या मार्गाचा स्वीकार भारतीयांनी केला असे अनुमान करणे म्हणजे शस्त्रबळाचा विचार भारतीयांच्या मनात होता व नाइलाजाने लोकशाही व्यवस्थेची निवड त्यांच्या मनाने केली असे सूचित करणे आहे. हे थोडेसे अन्यायकारक आहे.

महाराष्ट्रात हिंदूंच्या सामाजिक चालीरीतींत काही सुधारणा घडवून आणू इच्छिणारी चळवळ या काळात झाली. त्याचप्रमाणे धर्मातील कर्मकांडाचे हीण बाजूला काढून धर्मशुद्धीचाही प्रयत्न प्रार्थनासमाजाच्या रूपाने झाला. ब्राह्मणी वर्चस्वाच्या विरुद्ध लढा देऊन समाजाच्या इतर घटकांना त्यापासून मुक्त करण्याचा तसेच अंधश्रद्धांचे मूळ असणाऱ्या देवताकल्पना बाजूला सारून ईश्वराचे शुद्ध स्वरूप शोधण्याचा प्रयत्न सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून झाला. या सर्व चळवळी आणि प्रयत्न यातून सर्व माणसे समान आहेत, जाती मानवनिर्मित आहेत, वर्ण किंवा जात हा श्रेष्ठत्वाचा किंवा कनिष्ठत्वाचा निकष होऊ शकत नाही हा मूलभूत विचार समाजात दृढ व्हावयास हवा होता. परंतु तसे झालेले दिसत नाही. वस्तुत: जातीजातींचे सार्वजनिक जीवनातील वेगळेपण नाहीसे व्हावे, त्यांचे अहंकार गळून पडावेत एवढीच अपेक्षा होती; परंतु तेही घडले नाही. कर्मकांडापासून शक्यतो मुक्त असा, केवळ एकाच ईश्वराविषयी श्रद्धा बाळगणारा, शुद्ध धर्मविचार रुजवण्याचा या कालखंडात झालेला प्रयत्न पुढे अयशस्वी झाला. आज तर अंधश्रद्धा अधिक बळकट होत असलेल्या दिसतात. देवदर्शनासाठीच्या रांगांची लांबी, नवस आणि उत्सव प्रचंड प्रमाणात वाढत असताना आपण पाहतो. एका परीने माणसाला बंधनातून मुक्त करण्याचा रानडे-फुले यांच्यासारख्या महापुरुषांचा प्रयत्न फारसा फलद्रूप झाला नाही असे चित्र आज दिसते.

व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर नियंत्रण घालणाऱ्या बाह्यशक्तींना मर्यादित ठेवणे आवश्यक असते. शासनसंस्था आणि धर्म या दोन महत्त्वाच्या शक्तींनी व्यक्तिस्वातंत्र्य बाधित होऊ शकते. भारतीय समाजरचनेत धर्मशक्तीला आणखी एक हत्यार उपलब्ध

झाले ते म्हणजे जात. जातीच्या मर्यादा, जातीची दडपणे व जातीच्या अहंता या सर्वांनी व्यक्तिस्वातंत्र्याला आणखी मर्यादित करण्यात भूमिका बजावली आहे. व्यक्तीचे सामाजिक जीवनातील व्यवहार, विशेषत: ज्यांचा इतरांशी संबंध येतो असे व्यवहार धर्मातीत (Secular) राखणारी समाजव्यवस्था अस्तित्वात असेल तर व्यक्तीला अधिकाधिक स्वातंत्र्य उपभोगता येते. उपासना व खासगी जीवनातील नैतिक आचरण अशी काही क्षेत्रे वगळता इतर बाबींत धर्माने हस्तक्षेप करण्याचे वस्तुत: काही कारण नाही. विवाह कोणाशी करावा, संपत्तीतील वारसा कसा असावा, दत्तक घ्यावा की नाही, संततीनियमन करावे की नाही, या प्रश्नांचा धर्मातीत विचार शक्य आहे. परंतु या दिशेने आपली फारशी प्रगती झालेली नाही.

शिक्षण हे माणसाला स्वतंत्र करणारे, स्वाभिमानी बनवणारे, आपल्या हक्कांची जाणीव देणारे, अन्यायाविरुद्ध संघर्षाची प्रेरणा देणारे अमोघ शस्त्र आहे हे अनेक मोठ्या माणसांनी आपल्याला सांगितले. शिक्षण स्वतंत्र असेल, शुद्ध असेल, सर्व प्रकारच्या ज्ञानाचे स्वागत करणारे असेल तर ते प्रभावी व योग्य परिणाम घडवू शकते. आज शिक्षणाची अवस्था काय आहे? शिक्षण सर्वत्र उपलब्ध झाले पण त्यातला प्राणच हरवून गेला की काय असे वाटू लागले आहे. लाचारी आणि अनुदारपणा या दोन दुर्गुणांच्या आधारावर जर आमच्या शिक्षणसंस्था उभ्या राहिल्या तर त्यातून मिळणारे शिक्षण विद्यार्थ्यांवर कोणता संस्कार करणार? स्वातंत्र्यपूर्व काळात खासगी शिक्षणसंस्थांची सरकारला भीती वाटे; कारण अशा संस्थांत विद्यार्थ्यांवर अन्याय सहन न करता स्वातंत्र्यासाठी लढा देण्याचे संस्कार होत. आज खासगी शिक्षणसंस्थाही नावालाच खासगी असतात. त्यांच्यावर शंभर टक्के नियंत्रण सरकारचेच असते. या नियंत्रणातूनही मार्ग काढून विद्यार्थ्यांना काही वेगळे देण्याची प्रेरणा संस्थाचालकांत निर्माण होणे थांबले आहे. अशा अवस्थेत शिक्षण व्यक्तिस्वातंत्र्याचे मूल्य कसे अधोरेखित करणार?

उदारमतवादी विचारांचा संस्थात्मक आधार फार महत्त्वाचा असतो. लोकांच्या इच्छेचे प्रतिबिंब संमत होणाऱ्या कायद्यात पडावे असा प्रयत्न करणारे विधिमंडळ, कायद्याचे राज्य ही संकल्पना लोकांच्या अनुभवाला प्रत्यक्ष यावी असा प्रयत्न करणारी न्यायसंस्था, लोकांचे आपण सेवक आहोत असे मानणारी कार्यपालिका, स्थानिक स्वराज्यसंस्था, मालक कोणीही असला तरी आपण लोकांना जबाबदार असतो असे मानणारी वृत्तपत्रे, राज्यकर्त्यांचे किंवा समाजातील एखाद्या गटाचे लांगूलचालन करणे हे आपले काम नाही, सत्याची कास निर्भयपणे धरणारे ज्ञानदान हे आहे, असे मानणारी विद्यापीठे अशा संस्था समाजातील मूल्यात्मक मानसिकतेचा आधार असतात. एकोणिसाव्या शतकात परकीय राज्य असतानाही या संस्थांचा पाया निर्दोष करण्याचे काही प्रयत्न झाले. स्वातंत्र्योत्तर काळात अशा संस्थांची काय अवस्था आहे? या संस्थांतील उदार मूल्ये हीच त्यांचा प्राण असतात. तीच गमावली तर संस्थांचा फक्त सांगाडा उरतो. लोकशाही व्यवस्थेच्या सांगाड्यात असहिष्णू हुकूमशाही आरामात नांदण्याचा प्रयत्न करते.



■■

■ प्रा. राम बापट



# महाराष्ट्राची १९६० पासूनची राजकीय वाटचाल

आजचे महाराष्ट्र राज्य १९६० साली स्थापन झाले. महाराष्ट्राच्या सुदैवाने श्री. यशवंतराव चव्हाण यांच्यासारखा एक व्यासंगी, समाजहिताची खरी कळकळ असणारा, ग्रामीण जनतेच्या जीवनाशी समरस झालेला दूरदृष्टीचा प्रगल्भ असा नेता सुरुवातीलाच मुख्यमंत्री म्हणून लाभला. विशेष म्हणजे महाराष्ट्राचा विकास कसा व्हावा याविषयी त्यांच्यापाशी एक सम्यक, संवेदनक्षम आणि सर्वसमावेशक अशी चौफेर दृष्टी होती. त्यांनी महाराष्ट्राच्या परिस्थितीला अनुरुप होईल अशा पद्धतीने कृषीऔद्योगीक समाज उभारण्याचे स्वप्न आणि निश्चय लोकांसमोर मांडला.

या धोरणांना अनुसरुन त्यांनी काही पायाभूत धोरणे व तत्त्वे स्विकारली आणि त्या अनुषंगाने निर्णयांची उतरंड ते रचत गेले. त्यांच्या या मुलगामी

धोरणांचा परिणाम महाराष्ट्राच्या विकासावर आज झालेला दिसतो आहे. त्यांनी अत्यंत प्रयत्नपूर्वक व हिरीरीने शासनाच्या पूर्ण पाठिंब्यानिशी सहकाराची चळवळ उभारण्याचा व्यापक असा कार्यक्रम हाती घेतला. हळूहळू कोयनेसारख्या मोठाल्या आणि इतर मध्यम स्वरुपाच्या अनेक धरणांची उभारणी करुन विश्वासार्हसिंचन व्यवस्था निर्माण करण्यास प्रारंभ केला. त्याचा परिणाम म्हणून विशेषतः पश्चिम महाराष्ट्रात क्रमाक्रमाने जिल्हा आणि तालुका पातळीवर सहकारी साखर कारखाने निर्माण झाले. यामुळे प्रथमतःच गरीबीने होरपळलेल्या ग्रामीण भागातील लोकांच्या हातात पैसा खेळू लागला. आणि त्याचा परिणाम त्यांचे जीवनमान उंचावण्यामध्ये झाला. या सहकारी चळवळीतून विविध पातळ्यांवर व विविध संस्थांमध्ये वेगवेगळ्या पद्धतीचे काम करु शकेल असे सकस नेतृत्व निर्माण झाले आणि सक्षम अशा कार्यकर्त्यांची एक फौजच कालांतराने महाराष्ट्रात निर्माण झाली. सहकारी साखर कारखान्यांच्या जोडीला दुग्धव्यवसाय आणि काही प्रमाणात सुतगिरण्या यांच्याची विकासाला चांगलाच प्रारंभ झाला.

श्री. यशवंतराव चव्हाणांनी महाराष्ट्रात पंचायत राज्य उभारण्याच्या बाबतीत पुढाकार घेतला. जिल्हा परिषदांपासून ग्रामपंचायतींपर्यंत विकासाच्या आणि प्रशासनाच्या कार्याचे पद्धतशीर विकेंद्रीकरण केले. यामुळेही महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यापर्यंत नवे नेतृत्व क्रमाक्रमाने विकसीत होत तर गेलेच पण त्याच्या जोडीला लोकशाहीनिर्णय प्रक्रियांमधला जनतेचा सहभागही भरीवपणे वाढला. फार काळ पंचायत राज्याचा हा महाराष्ट्रातील प्रयोग संबंध देशात एक आदर्श



***१९६० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीचा विचार केला तर पक्षीय संघटना आणि कार्याचा पोत बदलताना दिसून येत आहे. निःस्पृह लोकसेवेवर उभारलेल्या राजकारणाऐवजी धनदांडग्यांची आणि बलदंडांची हुकूमत वाढत चाललेली आहे. राजकीय जीवन अधिकाधिक भ्रष्ट होताना दिसून येत आहे. त्यामुळे आज एक अंतर्विरोध जाणवू लागला आहे. समाजाच्या एकूण लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला अधिकाधिक चालना मिळत आहे पण त्याच वेळेला संस्थात्मक चौकटीशी जोडलेले राजकारण संधीसाधू, भ्रष्ट व दिशाहीन होताना दिसत आहे. त्या समस्येला आपण कसे तोंड देणार आहोत यावर महाराष्ट्राच्या आगामी राजकारणाची वाटचाल अवलंबून राहणार आहे.***


कोयना धरण

प्रारुप ठरणारा झाला.

श्री. चव्हाणांच्या नेतृत्वाखाली आणि नंतर वेळोवेळी महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार होईल याकरिता जबरदस्त पावले उचलली त्यामुळे मुंबई, पुणे, नागपूर आणि अशाच अन्य काही ठिकाणी असणारे माध्यमिक शाळा व महाविद्यालये यांचे जाळे क्रमाक्रमाने महाराष्ट्रात सर्वत्र निर्माण झाले आणि ज्या घरातून शिक्षणाची परंपरा नव्हती तेथून एक नवशिक्षित साक्षर वर्ग निर्माण झाला त्याचा एक परिणाम म्हणून प्रशासनाच्या पातळीवर बहुजन समाजाशी समरस झालेला आणि ग्रामीण जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव असलेला सर्व पातळीवरचा प्रशासकीय वर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला. प्रारंभीच्या काळात महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी खेडोपाड्यांपर्यंत रस्त्यांचे जाळे उभारायला सुरुवात केली. सार्वजनिक वाहतुक व्यवस्थेचे खाजगीकरण संपवून त्याऐवजी राज्यपरिवहन मंडळाच्या बसगाड्यांमार्फत वाहतुक सेवा सुरु केली गाव तेथे एस.टी. या धोरणामुळे खेड्यापाड्यातील लोकांचा प्रवास सुकर झाला. एकमेकांकडे येणेजाणे वाढले आणि शेतीमालाच्या व्यापारालाही चांगली चालना मिळाली. आरोग्य व्यवस्थेच्याही संदर्भात सर्वांना चांगल्या पद्धतीने आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी म्हणून दवाखाने, इस्पितळे यांची उभारणी करण्याच्या दृष्टीने पावले टाकली गेली.

थोडक्यात असे ठामपणे म्हणता येते की १९६० पासून १९९१ पर्यंत महाराष्ट्राला काँग्रेसच्या नेतृत्वाखाली चांगलाच विकास साधता आला. हे राजकीय नेतृत्व कळकळीने काम


सहकारी साखर कारखाना

करणारे, स्वार्थबुद्धीने फारसे न बरबटलेले आणि तळागाळातील लोकजीवनाशी आत्मीयतेने जोडले गेलेले होते.

विरोधी पक्षांचा विचार केला तर निवडणुकीच्या राजकारणातील यशापयशाचा विचार करता त्यांचा प्रभाव वरकरणी कमी वाटणारा होता असे वाटेल पण परिस्थिती तशी नव्हती. साम्यवादी पक्षातील कॉ. श्रीपाद अमृत डांगे, कॉ. अहिल्या रांगणेकर, समाजवादी विचारांची धारणा असलेले साथी, एस. एम. जोशी, नानासाहेब गोरे, मृणाल गोरे, बापुसाहेब काळदाते व अनेक मान्यवर नेते निस्पृहपणे व प्रभावीरित्या विरोधी पक्षात काम करीत होते. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात शेतकरी कामकरी पक्षाची स्थापना झाली त्या काळात ब्राह्मणांच्या हाती एकवटलेली सत्ता दूर व्हावी आणि बहुजन समाजाला सत्तेत भरीव वाटा मिळावा असे धोरण घेऊन हा पक्ष उभा राहिला. या पक्षासकट महाराष्ट्रातील तत्त्कालिन सर्वच पक्षांनी 'कसेल त्याची जमीन' हे धोरण उचलून धरले आणि महाराष्ट्रातील शेतीमालकीचे ब्राह्मण आणि बिगरशेतकरी धनिक वर्गाकडून जमिनींचे मोठे हस्तांतरण खेड्यापाड्यातून झाले. १९६० साली नवे महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर श्री. यशवंतराव चव्हाण यांनी कम्युनिस्ट, शेकाप व अन्य काँग्रेस



*सभेत वसंतदादा पाटील बोलताना शेजारी अण्णासाहेब शिंदे*

विरोधी पक्षातील अनेक मातबर नेत्यांना उदा. आण्णासाहेब शिंदे, यशवंतराव मोहिते, भाऊसाहेब थोरात, वगैरे काँग्रेसमध्ये ओढून घेतले. असे असले तरीही आजतागायत गणपतराव देशमुख, प्रा. एन. डी. पाटील व अन्य काही मातबर व कर्तृत्ववान नेते नंतरही निस्पृहपणे आपल्या मूळ निष्ठेला जागून शेकाप व अन्य विरोधी पक्षात काम करीतच राहिले आहेत. याच्याच जोडीला डाव्या राजकारणाच्या मुशीतून आलेले लाल निशाण पक्षातील श्री. एस. के. लिमये, कॉ. संतराम



*प्रा. एन. डी. पाटील*



*भाऊसाहेब थोरात*

पाटील, काॅ. दत्ता देशमुख यांच्यासारख्या नेत्यांना फार मोठे राजकीय वजन लाभलेले होते व त्यांचा लोकसंग्रही तितकाच प्रचंड दांडगा होता.

साधारणपणे १९९१ नंतर महाराष्ट्राच्या राजकारणात काही गुणात्मक परिवर्तन घडू लागले आहे. महाराष्ट्राचे नागरीकरण फार झपाट्याने होत गेलेले दिसते. आणि हळूहळू नागरी समस्या जाणून घेऊन त्या सोडविण्याच्या बाबतीत प्रयत्न करणाऱ्या नेत्यांची एक नवी साखळीच निर्माण होऊ लागली आहे. यापुढच्या काळात विविध सामाजिक स्तरातून पुढे आलेल्या नागरी नेतृत्वाचा प्रभाव ग्रामीण विभागाच्या तुलनेत वाढत जाणार अशीच लक्षणे दिसतात. प्रत्यक्ष परिस्थिती बघितली तरी आज जरी खेडी ओस पडताना दिसत असली तरी अजूनही बराच काळ मराठी भाषिक बहुसंख्य जनता खेड्यापाड्यातूनच आढळून येईल. पण संपत्तीच्या उत्पादनाचा आणि वितरणाचा विचार केला तर शेतीचा हिस्सा दिवसेंदिवस कमीकमी होत असून उद्योगधंदे, व्यापार आणि सेवाक्षेत्रे यांचा वाटा भरीवपणे वाढताना दिसत आहे. याचा निश्चित परिणाम राजकीय जीवनाच्या मांडणीवर होत आहे. पूर्वी खेड्यापाड्यातून पसरलेले समुह एकमेकांशी बांधले गेलेले होते. शहरी वातावरणात ते बंध आता शिथील होत आहे. आणि मग सर्वांना जोडून घेणारे विधायक स्वरुपाचे राजकीय नेतृत्व कसे उभारले जाईल हा आता कळीचा प्रश्न बनणार आहे. निवडणुकांच्या राजकारणाचा विचार केला तर प्रारंभीच्या काळात पैशाचा वापर कमी होता. निवडणुका पैशाभोवती फिरत नव्हत्या. पण हळुहळू या घटकाचा प्रभाव फार झपाट्याने वाढताना दिसत आहे याचाही दूरगामी परिणाम आपल्या लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेवर होणार आहे.

सामाजिकदृष्टया विचार केला तर वाढत्या शहरीकरणामुळे काही जाणवणारे परिणाम झालेले दिसतात.



उदा. आपण दलित समाजाचा विचार करुया. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अद्वितीय कार्यामुळे महार समाजात अभूतपूर्व जागृती झाली. शिक्षणाचा प्रसार डोळ्यात भरण्यासारखा झाला. हा समाजही हळूहळू मुंबईसारख्या महानगरीत किंवा अन्य मोठ्या शहरांमध्ये ग्रामीण भागाकडे पाठ फिरवून येऊ लागला. ग्रामीण भागापेक्षा अधिक मोकळ्या व खुल्या वातावरणात त्याला रहावयाचे होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९६० पर्यंत आणि काही काळ नंतरही डॉ. आंबेडकरांच्या मुशीत तयार झालेले उदा. दादासाहेब रुपवते, श्री. भाऊराव गायकवाड, श्रीमती शांता दाणी, श्री. खोब्रागडे वगैरे कर्तृत्ववान नेतृत्व दलित समाजाला लाभले. पण शहरीकरणाच्या प्रवाहाचा एक भाग म्हणून दलित पँथरसारखी एक अतिशय लढाऊ संघटना निर्माण झाली. त्यातून नामदेव ढसाळ, राजा ढाले, अर्जुन डांगळे, वगैरे यांच्यासारखे नेते निर्माण झाले. दलित समाजातील या नव्या लढाऊ नेतृत्वाचा दबदबा सर्वत्र निर्माण झाला. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराच्या निमित्ताने महाराष्ट्रातील सामाजिक जीवन चांगलेच ढवळून निघाले आणि हे नामांतरणाचे स्वप्न कालांतराने साकार झाले. दलित अत्याचार विरोधी कायद्यांसारख्या उपायांमुळे आपले हक्क प्रस्थापित करुन घेण्याकरिता दलित समाज हा राजकीयदृष्ट्या आजही अत्यंत जागृत व सक्रीय झालेला आज आपणाला पहावयास मिळत आहे. मातंग समाजातही हळूहळू का होईना शिक्षणाचे प्रमाण वाढत आहे. श्री. आण्णाभाऊ साठे यांचा वारसा स्वीकारत या समाजात स्वाभिमानाचे राजकारण करणारे नेतृत्व विविध पक्षात आज उभे राहताना दिसत आहे.

पण या शहरीकरणाच्या रेट्याचा अजिबात परिणाम झाला नाही. तो म्हणजे आदिवासी व भटक्या विमुक्त जाती व तत्सम समाज यांच्यावर. त्यांच्यातही तसे काही नवे नेते निर्माण झाले नाही अशातला काही भाग नाही. भंडाऱ्याचे श्री. नाशिकराव तिरपुडे, अकोल्याचे श्री. मधुकरराव पिचड इत्यादी नेते आदिवसींमध्येही निर्माण झाले. श्री. पिचड यांनी तर एक सहकारी साखर कारखानाच उभारला पण एकूण विचार केला तर महाराष्ट्राच्या राजकीय जीवनात दुर्दैवाने आदिवासी आणि भटक्या विमुक्त जाती व जमाती यांचा प्रभाव नगण्य वाटावा अशीच परिस्थिती आहे.

१९६० नंतरच्या राजकारणाचा विचार केला तर प्रथम भारतीय जनसंघ आणि नंतर भारतीय जनता पार्टी या हिंदुत्ववादी प्रवाहाचाही विचार करावा लागतो. हा प्रवाह पहिल्यांदा तर

फारच क्षीण होता. अर्थातच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या परिवाराचा विचार केला तर त्यांच्या कार्याचे जाळे सर्वत्र विणलेले आढळून येते. प्रारंभीच्या काळात तोही एक शिस्तबद्ध राजकीय पक्ष म्हणून वावरत होता आणि श्री. रामभाऊ म्हाळगी यांच्यासारखे काही नामवंत नेते राजकारणात आणि विधिमंडळाच्या कार्यात हिरीरीने भाग घेताना दिसतात.

१९६५ नंतरच्या काळात महाराष्ट्रात राजकीय ध्येयवाद उराशी बाळगून काम करणाऱ्या समतावादी अशा अनेक पुरोगामी संघटना उदयाला आल्या. या संघटना म्हणजे पक्ष नव्हेत. पण तरीही समतेचे उद्दिष्ट बाळगून व्यापक सार्वजनिक व राजकीय भूमिका घेत त्यांनी विविध स्वरुपाची लोकआंदोलने उभारली. उदा. विषमता निर्मूलन आंदोलन, युक्रांद, मागोवा किंवा तत्सम स्वरुपाच्या अनेक संघटना त्या काळात सक्रिय होत्या. आणिबाणीच्या पूर्वी आणि नंतर काही काळ त्यांना बरेच महत्व लाभले होते. पण १९९० नंतरच्या काळात त्यांचे तेज खूपच मंदावलेले दिसते. याच्याउलट स्वदेशी किंवा परकीय निधीच्या आधाराने चालणाऱ्या अनेक स्वसंसेवी संघटना म्हणजे एनजीओज् काम करताना दिसतात. पण त्यांचे राजकीय स्थान व प्रभाव जवळजवळ नगण्य आहे.

आणिबाणीच्या कालखंडानंतर भाजपच्या धोरणांत जाणवण्यासारखा फरक पडलेला आहे. पूर्वी जवळजवळ जणू काही ब्राह्मणांचाच पक्ष आहे असे दिसत असलेल्या भारतीय जनसंघाऐवजी भारतीय जनता पार्टीमध्ये अन्य समाजातील नेतृत्व आता सर्वत्र कार्यशील झालेले आहे. व ते आघाडीवर काम करीत आहे. उदा. गोपीनाथ मुंडे, पांडुरंग फुंडकर, एकनाथ खडसे वगैरे. यामुळे भारतीय जनता पार्टीचा राजकीय सामाजिक तोंडवळा बदललेला आहे ही गोष्ट स्वागतार्हच आहे.

आक्रमक हिंदुत्वाचे राजकारण करणारी शिवसेनेसारखी संघटना व पक्ष श्री. बाळासाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली उदयास आला. प्रथमतः मुंबईसारख्या महानगरीमध्ये आणि क्रमाक्रमाने महाराष्ट्रातल्या अन्य मोठ्या शहरांमध्ये व नंतर ग्रामीण भागातही या पक्षाचा प्रभाव वाढत गेला. आक्रमक


*रामभाऊ म्हाळगी*


*बाळ ठाकरे*


*गोपीनाथ मुंडे*


*एकनाथ खडसे*


*पांडुरंग फुंडकर*


*मधुकर पिचड*



पद्धतीने राजकारण करण्याची सर्वस्वी नवीन शैली त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात आणली. त्याचे भलेबुरे असे दोन्हीही परिणाम झालेले आढळून येतात.

१९६० पासून इ.स. २००० पर्यंतच्या राजकारणाचा विचार केला तर एक गोष्ट निश्चितपणाने आढळून येत आहे. प्रारंभीच्या काळात विविध पक्षांमध्ये एक ध्येयवाद व शिस्तबद्धता प्रकर्षाने अनुभवास यायची. राजकीय नेतृत्वाची राजकीय व सामाजिक प्रश्नांची जाण चौफेर व संवेदनक्षम असायची. पक्षाचे कार्य जो उमेदीने पार पाडेल अशी व्यक्ती धनहीन असली तरीही ती सत्तेच्या वरच्या स्तरांपर्यंत पोहचू शकत असे. निवडणुकीच्या राजकारणातही पैशापेक्षा लोकसंग्रहाला महत्त्व होते. त्याही काळात मतपेटीचे राजकारण जातीजातीवर आधारलेल्या मतपेढ्यांवरच चाललेले होते. तरीपण त्यात भाग घेणारे नेतृत्व हे खरोखरच त्या त्या जातीसमुहात कळकळीने, तळमळीने व प्रामाणिकपणे स्वतःला झोकून देऊन काम करणारे नेतृत्व असेल. त्यांचा एक नैतिक प्रभाव स्थानिक समाजावर असे. यामुळे प्रारंभीच्या काळात विधीमंडळे घ्या किंवा जिल्हा परिषदा घ्या किंवा महानगरपालिका, नगरपालिका घ्या. त्यातल्या चर्चा प्रभावीपणे आणि अभ्यासावर आधारलेल्या असत.

पण दिवसेंदिवस राजकारणात धनदांडग्यांचा आणि बलदंडांचा व सरळासरळ गुंडगिरीचा आश्रय घेणाऱ्या नेत्यांची चलती होताना दिसत आहे आणि ही एक चिंतेची बाब आहे. राजकीय नेतृत्वाची ही जी नैतिक घसरगुंडी वाढताना दिसते आहे तो आपल्यापुढील एक गंभीर स्वरुपाचा राजकीय प्रश्न आहे आणि पुढच्या काळात तो चालूच राहणार आहे. आता तर स्वतःची जाहिरातबाजी करण्याकरिता प्रसारमाध्यमांचा भ्रष्ट वापर करुन निवडणुका लढविण्याची उदाहरणे प्रकाशात येत आहेत.

आधीच्या काळातील वृत्तपत्रांचे स्वरुप लक्षात घेतले तरी वृत्तपत्रे बरीचशी जबाबदार, सखोल चर्चा करणारी आणि काही एक नैतिक बंधन पाळणारी होती. पण आता काही दुर्मिळ अपवाद सोडल्यास नफा हेच उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवल्याने माध्यमांचे





*विदर्भातल्याच नेत्यांनी विरोध केलेले हे अमरावतीतील अप्पर वर्धा धरण.*

लोकशिक्षणाचे कार्य जवळजवळ संपुष्टात आलेले आहे. अशा परिस्थितीत दिशाहीन संधीसाधु राजकीय नेतृत्व लोकशिक्षण आणि प्रबोधन करण्याचे कार्य अपवाद सोडल्यास करताना दिसत नाहीत. माध्यमांच्याही हातून हे कार्य यापुढे होईल असे दिसत नाही. अशा परिस्थितीत जबाबदारीने राजकारण करणारा राजकीय नेतृत्वाचा वर्ग आणि राजकारणात जबाबदारीने भाग घेणारा स्वहितदक्ष व सावध असा राजकीय समाज कसा निर्माण होईल ही एक आजची व्यापक राजकीय समस्या बनली आहे.

१९६० नंतर प्रारंभीच्या काळात महाराष्ट्रातील कामगार संघटनांचा राजकीय प्रभाव जाणवण्यासारखा होता. कम्युनिस्टांची लालबावटा संघटना, समाजवाद्यांची हिंद मजदूर सभा, काँग्रेसची इंटक इ. संघटनांचा कामगार चळवळीवरचा प्रभाव राजकारणात जाणवत असे. त्यातून आपापल्य पक्षाचे काम करणारे कार्यकर्ते तर पक्षांना लाभतच पण त्याच्या जोडीला जनतेचे राजकीय शिक्षणही होत असे. तथापि नानाविध कारणांनी आज जुन्या स्वरुपाच्या कामगार संघटना संपुष्टात आलेल्या दिसतात. आपापला कारखाना किंवा व्यवसाय यांच्यापुरत्याच मागण्या करणारा संघटना असे त्यांचे नवे रुप बनलेले दिसते.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा विचार करताना आपल्याला महाराष्ट्रातील प्रादेशिक राजकारणाचाही विचार करावाच लागतो. नवे महाराष्ट्र राज्य स्थापन होत असतानाच प्रादेशिक विश्व विकासाचा प्रश्न पुढे आला होता. सुप्रसिद्ध अकोला करार केल्यानंतरच विदर्भाचे नेतृत्व संयुक्त महाराष्ट्रात दाखल होण्याला राजी झाले होते. मराठवाड्याने मात्र कुठलीच अट न घालता खुलेपणाने या नव्या महाराष्ट्र राज्यात सामील होण्याचा निर्णय घेतला होता. पण त्याच्या अगोदरच्या १००-१५० वर्षाच्या राजकीय पार्श्वभूमीचा विचार केला तर मुंबई आणि पश्चिम महाराष्ट्रामध्ये ज्याप्रमाणे सहकार चळवळीच्या आधाराने व पायावर एक नवे विकासाभिमुख नेतृत्व निर्माण झाले तसे अन्यत्र झाले नाही. विदर्भाची प्राकृतिक परिस्थिती लक्षात घेता विदर्भातील शेतकरी वर्गाला व नेतृत्वाला सिंचन व्यवस्थेविषयी फारशी ओढ बराच काळ वाटली नव्हती. विदर्भ हा हमखास व खात्रीच्या पावसाचा प्रदेश असल्यामुळे येथे कुठल्याही प्रकारची धरणे व बंधारे बांधण्याची किंवा पाणी अडवून, साठवून ते शेतीला देण्याची व्यवस्था करण्याची काहीही गरज नाही असे १९२७ सालच्या सी.पी. ॲन्ड बेरार कमिशनने व्यक्त केलेले मत अगदी १९८० सालापर्यंत म्हणजे श्री. अंतुले मुख्यमंत्री होईपर्यंत कायम होते. १९८० मध्ये पहिल्यांदा विदर्भाचा माणूस म्हणजे श्री. अ. का. शेणोलीकर हे पाटबंधारे विभागाचे विदर्भाचे मुख्य अभियंता झाल्यानंतर १०० कोटी रु. खर्चाचा सिंचन विकासाचा कार्यक्रम आखण्यात आला. पश्चिम महाराष्ट्रात जेव्हा लोक धरणे व्हावीत, मोठे प्रकल्प बांधावेत म्हणून रास्ता रोको, मोर्चा यासारखी आंदोलने करीत होते तेव्हा विदर्भातील लोक धरणे वा प्रकल्प बांधू नयेत म्हणून आंदोलने करीत होते. १९६५ साली उजनी, जायकवाडी आणि अप्पर वर्धा या तीनही धरणांची भूमीपुजने एकाच दिवशी झाली. अप्पर वर्धा धरण होऊ नये म्हणून आंदोलकांनी त्यावेळी तत्त्कालीन मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची गाडी जाळली होती. हा प्रसंग आजही विसरता येत नाही. म्हणजे त्यावेळेला विदर्भात विकासाच्या घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याचेच काम चालु होते.



*जायकवाडी धरण ही शंकरराव चव्हाण यांची मराठवाड्याला देणगी आहे.*

विदर्भात प्रामुख्याने कापूस हे नगदी पीक असल्यामुळे आणि पडणारे पर्जन्यमान त्यासाठी पुरेसे असल्यामुळे विदर्भात राजकीय जाणिवा व विकास पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत कमी पडत गेला. विकासाचाही भर पश्चिम महाराष्ट्रावरच राहिल्या कारणाने प्रादेशिक असमतोलही वाढत गेला. त्याची बोचणी जरी तिथल्या काही जागृत नेत्यांना प्रथमपासूनच वाटत राहिली तरी तिने फार काळ उग्र रुप धारण केले नव्हते. मराठवाड्यातही श्री. शंकरराव चव्हाण, श्री. गोविंदभाई श्रॉफ यांच्यासारखे उंचीचे व मोठ्या दर्जाचे नेतृत्व फारसे फुलले नाही. शंकरराव चव्हाण यांनी ज्या तडफेने जायकवाडीचे धरण उभारण्यात कर्तृत्व दाखविले त्या तऱ्हेची कामगिरी मराठवाड्यात अन्य काही नेत्यांनी प्रारंभीच्या काळात केलेली फारशी दिसत नाही. अलीकडच्या काळात श्री. विलासराव देशमुखांसारखा एक कार्यक्षम नेता मराठवाड्याला लाभला पण त्यांनीही सगळ्या मराठवाड्याच्या कल्याणाकडे व सर्वांगीण विकासाकडे लक्ष दिलेले आहे असे दिसून येत नाही. म्हणून मराठवाड्याचाही विकास मागेच पडला आणि प्रादेशिक असमतोलाचा चटका त्यालाही बसला.

कोकणचा विचार केला तर कोकणातील आर्थिक जीवन हे प्रामुख्याने मुंबईच्या अर्थकारणावर व मनीऑर्डरवर अवलंबून होते. तेथील शेतीचा कस लक्षात घेता आणि विश्वासार्ह सिंचन व्यवस्था उभारण्याच्या बाबतीतील अनास्थेमुळे कोकणही बराच काळ पश्चिम महाराष्ट्राच्या मागेच पडत गेला. कोकणामध्ये बॅरिस्टर नाथ पै यांच्यासारखे काही नेते चमकून गेले पण अगदी अलिकडे मात्र कोकणामध्ये हापूस आंबे, काजू, मत्स्य व्यवसाय इत्यादी वस्तुंच्या वाढत्या उत्पादनामुळे आणि मुंबईत संपन्न झालेले लोक तिथे स्थानिक भांडवल ओतू लागल्याने एक नवे राजकीय नेतृत्व उभे राहत आहे असे दिसते. पण अजूनही एकूण कोकणाचा विचार करुन कोकणातील राजकीय जीवन उभारण्याची सर्वांगीण, सम्यक व सर्वसमावेशक दृष्टी असलेले नेतृत्व तिथेही आढळून येत नाही असे दिसते. पण प्रादेशिक विषम विकासाचे चटके आपल्यालाही बसलेले आहेत ही भावना आता कोकणात पसरताना दिसते आहे. प्रादेशिक असमतोलाच्या पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ आणि कोकण या तिघांच्या भांडणात सर्वात जास्त नुकसान कोकण आणि खानदेश यांचे झाले आहे हे मात्र निश्चित.

महाराष्ट्रातील या प्रादेशिक असमतोलाचा विचार केला तर त्या प्रश्नाचा रेटा जाणवू लागल्यावर वैधानिक विकास



*मुंबई शहराचे विमानातून घेतलेले छायाचित्र*

मंडळांची स्थापना करण्यात आली. विकासाचा अनुशेष भरण्याचे कार्य सुरु झाले पण तरीही याबाबतीत कमी विकास झालेल्या विभागांच्यामध्ये आपल्यावर राजकीयदृष्ट्या अन्याय झालेला आहे ही भावना खदखदताना दिसतेच.

मुंबई महानगरीचे जीवन व राजकारण हा एक वेगळाच प्रकार आहे. १९६० नंतर उत्तरोत्तर मुंबईमधील मराठी भाषिकांची संख्या तुलनेने कमी होत गेलेली दिसते त्याच्याच जोडीला मुंबई ही सबंध देशाची वित्तीय राजधानी असली तरी त्या उलाढालीत मराठी भाषिकांचा सहभाग फारच मर्यादित आहे. बड्या ताकदीच्या औद्योगिक आणि व्यापारी व वित्तीय वर्तुळात मराठी भाषिक अपवादानेच आढळतात किंवा जवळपास नाहीतच. त्या परिस्थितीमुळे मुंबई या महानगरीचे राजकारण महाराष्ट्रातील उर्वरीत भागातील अन्य राजकारणाचा सांधा तुटताना दिसत आहे. एकूणच वाढत्या नागरीकरणामुळे मुंबई महानगरी आणि पुण्यासारखी अन्य मोठाली शहरे यांच्यातील नवी राजकीय पिढीपण ग्रामीण भागापासून अधिकाधिक तुटताना दिसत आहे.

महाराष्ट्राच्या एकूण राजकारणाचा विचार केला तर एक अतिशय महत्त्वाची गोष्ट ध्यानात घ्यावी लागते. अन्य अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राच्या राजकारणात स्वातंत्र्यचळवळीच्या काळापासूनच मोठा बदल जाणवण्यासारखा होता. आता उत्तरोत्तर महाराष्ट्राच्या राजकारणातील महिला लोकप्रतिनीधांची सहभाग वाढताना दिसत आहे. आता तालुक्यांच्या पातळीवर समर्थपणे सार्वजनिक जीवनात भाग घेणाऱ्या स्त्रीयांची संख्या वाढताना दिसत आहे. ही एक स्वागतार्ह गोष्ट आहे. बहुतेक पक्षात ठळकपणे काम करणाऱ्या स्त्रिया आपापल्या राजकीय उतरंडीच्या विविध पातळ्यांवर कार्यरत असतांना दिसत आहे. मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण जसजसे वाढत जाईल त्या प्रमाणात स्त्रीयांचाही राजकीय प्रक्रियेतील वाटा वाढत राहील. एकूण स्त्री-शिक्षणाचे प्रमाण वाढलेले असले तरी त्याची वाटचाल अजूनही बरीचशी संथ आहे. पण ज्या प्रमाणात स्त्री शिक्षणाला गती मिळेल त्या प्रमाणात स्त्रिया राजकीय जीवनात बराचसा सहभाग घेताना दिसून येतील. स्त्री-पुरुष विषमतेचा प्रश्न अजूनही भीषण असला तरी स्त्रीयांच्या विविध चळवळींमुळे स्त्रियांना अनुकूल असणारे बरेचसे कायदे व शासकीय निर्णय झालेले आहेत त्याचेही सखोल परिणाम महाराष्ट्राच्या राजकीय जीवनावर होणारच आहेत.

थोडक्यात असे म्हणता येईल की १९६० नंतरच्या महाराष्ट्राच्या राजकीय वाटचालीचा विचार केला तर पक्षीय संघटना आणि कार्याचा पोत बदलताना दिसून येत आहे. निःस्पृह लोकसेवेवर उभारलेल्या राजकारणाऐवजी धनदांडग्यांची आणि बलदंडांची हुकूमत वाढत चाललेली आहे. राजकीय जीवन अधिकाधिक भ्रष्ट होताना दिसून येत आहे. त्यामुळे आज एक अंतर्विरोध जाणवू लागला आहे. समाजाच्या एकूण लोकशाहीकरणाच्या प्रक्रियेला अधिकाधिक चालना मिळत आहे पण त्याच वेळेला संस्थात्मक चौकटीशी जोडलेले राजकारण संधीसाधू, भ्रष्ट व दिशाहीन होताना दिसत आहे. त्या समस्येला आपण कसे तोंड देणार आहोत यावर महाराष्ट्राच्या आगामी राजकारणाची वाटचाल अवलंबून राहणार आहे.

■■

■ डॉ. द. ना. धनागरे



# महाराष्ट्रातील विद्यापीठे : समस्या आणि आव्हाने

***आर्थिक उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियांनी भारतातील उच्चशिक्षण यंत्रणेला पूर्णपणे विळखा घातला आहे. जागतिक व्यापार संघटनेचा भारत सदस्य असल्याने उच्चशिक्षणाची बाजारपेठ खुली करण्याचे बंधन ओघाने आलेच. सेवाक्षेत्र (शिक्षण-आरोग्य इ. ) वरील खर्च टप्प्याटप्प्याने कमी करावा लागणार आहे हे अटळ आहे. 'प्राथमिक शिक्षणाच्या विस्तारासाठी अधिक खर्च करावा लागणार असल्यामुळे आता उच्च शिक्षणाकरिता अधिक निधी उपलब्ध करून देणे शक्य नाही' असे सांगत राज्यशासनातील पुढारी आणि नोकरशहा तुमची आमची सतत दिशाभूल करीत राहणार. त्यातच आता विदेशी विद्यापीठांना भारतात त्यांचे शैक्षणिक संकुल सुरू करण्याची परवानगीही लवकरच दिली जाणार आहे. त्या संबंधीच्या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून ते संसदेसमोर पुढच्याच अधिवेशनात ठेवले जाणार आहे. अशा परिस्थितीत ढासळणाऱ्या शैक्षणिक गुणवत्तेचे ओझे घेऊन महाराष्ट्रातील विद्यापीठे कशी सामोरे जाणार हा खरा प्रश्न आहे.***

भारतातील उच्चशिक्षण संस्थांच्या इतिहासात जरा डोकावले म्हणजे त्यात एक गोष्ट ठळकपणे जाणवते. संस्थांना जेवढी दीर्घ आणि उज्ज्वल परंपरा लाभलेली असते, तितकीच त्या संस्थांना आधुनिकतेची ओढसुद्धा लागलेली दिसते. एकीकडे जुन्या विद्यापीठांना गोएथिक स्टाईल मधील ऐतिहासिक वास्तूंचा वारसा लाभल्याने त्यांना अभिमान वाटत असतो तर दुसरीकडे त्या जुनाट काळवंडलेल्या 'हेरिटेड' बिल्डिंगचा उबग आल्यामुळे त्याच विद्यापीठातील उच्चपदस्थांना पंचतारांकित गगनचुंबी इमारतींचे आकर्षण वाटत असते. तसेच पारंपरिक प्रवेश प्रक्रिया, गोपनीय पद्धतीने परीक्षा घेणे, त्यांचे निकाल जाहीर करणे ही कामेसुद्धा कालबाह्य वाटू लागतात.

आता इंटरनेटचे युग ! नवतंत्रज्ञानाने, माहिती तंत्रज्ञानाने विद्यापीठांच्या कार्यपद्धतीत आमूलाग्र बदल घडवून आणणे



*लोणारे येथील तंत्रविज्ञान विद्यापीठ*



सुरू झाले आहे. आता 'ऑनलाइन' अर्ज करा, ऑनलाइन प्रवेश परीक्षा, ऑनलाइन प्रवेश देणे एवढेच नाही तर ऑनलाइन सेमिस्टर किंवा वार्षिक परिक्षा घेण्याच्या योजना बनू लागल्यात. नव्याचा ध्यास घेण्यात चूक असे काहीच नाही. मात्र आपण काही तरी वेगळे आकर्षक करून दाखविण्याच्या खटाटोपात जुनी यंत्रणा निकामी होऊन बसते आणि नवतंत्रज्ञानावर आधारलेली कार्यपद्धती भरवशाची असेलच याची खात्री देता येत नाही. त्यातून विद्यापीठांमध्ये जुन्या समस्या आटोक्यात येत नाहीत आणि नव्या समस्यांमुळे परिस्थिती हाताबाहेर जातेय असे चित्र सध्या महाराष्ट्रातील विद्यापीठांमध्ये दिसतेय. तशातच विद्यापीठ जितके जुने तितक्या त्याच्या समस्या जटिल असे समीकरण तयार होताना दिसतेय.



*पुणे विद्यापीठ*

**सद्य:स्थिती**

महाराष्ट्र राज्यात सध्या १९ विद्यापीठे आहेत. १ मे १९६० ला राज्य स्थापनेपूर्वी मुंबई, ठाणे, नागपूर, एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ आणि औरंगाबाद येथे १९५६ मध्ये स्थापन झालेले मराठवाडा विद्यापीठ एवढी पाचच विद्यापीठे होती. ह्या १९ मध्ये पाच कृषी, पशुपालन आणि मत्स्योत्पादन या विषयांसाठीची स्वतंत्र विद्यापीठे असून त्यांच्या कारभाराचे नियमन राज्य कृषीमंत्रालयामार्फत होते. नाशिक येथे महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ असून राज्यातील सर्व वैद्यकीय (ॲलोपॅथी, आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी, दंतवैद्यक, नर्सिंग, इ.) महाविद्यालये (जवळपास २००) त्याला संलग्न केल्या गेलीत. शिवाय लोणारे (रायगड) येथे डॉ. आंबेडकर तंत्रविज्ञान विद्यापीठ आणि नागपूर येथे कवि कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ ही फक्त एका विषयासाठी निर्माण केली गेलेली विद्यापीठे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे नाशिक येथे असून संपूर्ण राज्यभर त्याचे कार्यक्षेत्र आहे.

२) याखेरीज महाराष्ट्रात बारा-तेरा अभिमत विद्यापीठे आहेत त्यापैकी निम्मी पुणे शहरातच आहेत. राज्यातील एकूण अभिमत विद्यापीठांपैकी तीनांना त्यांचे शैक्षणिक उपक्रम, दर्जा, पायाभूत सोई, प्राध्यापकांच्या नेमणुका इ. समाधानकारक नाहीत म्हणून यूजीसीने त्यांची मान्यता रद्द करण्यात येणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाला एका प्रतिज्ञापत्राद्वारे कळविले असल्याने त्यांच्या अस्तित्वावर सध्या टांगती तलवार आहे !

राज्यातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयां (एकूण २७२) साठी एक स्वतंत्र इंजिनियरिंग विद्यापीठ स्थापन करण्याच्या प्रस्तावाला तत्वतः मंजुरी दिल्याचे काही दिवसांपूर्वी उच्च व तंत्रशिक्षण खात्याच्या मंत्रिमहोदयांनी विधान केले होते. मराठी भाषा विकासासाठी वेगळे विद्यापीठ हवे ही आग्रही मागणी प्रतिवर्षी अ. भा. मराठी साहित्य संमेलनात होत असतेच. त्याच प्रमाणे कायद्याच्या शिक्षणासाठी स्वतंत्र विद्यापीठे सर्वच राज्यात स्थापन होऊ लागलीत. त्यामुळे पुढील काही वर्षात दर्जेदार विधिज्ञ (वकील) आणि न्यायाधीश तयार व्हावेत ह्या उद्देशाने महाराष्ट्रात वेगळे विधी-विद्यापीठ स्थापन झाल्यास आश्चर्य वाटू नये. अशा तऱ्हेने विषयवार विद्यापीठे निर्माण करणे हा मुळातच विद्यापीठ या संकल्पनेचा उपहास आहे हे शैक्षणिक धोरण ठरविणाऱ्या शिक्षणतज्ज्ञांच्या लक्षात येत नाही तसेच कोट्यवधी रुपये खर्च करून निवडून येणाऱ्या राज्यकर्त्यांच्याही धानात येत नाही. आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी अशी विषयवार विद्यापीठांची तटबंदी मारक ठरणार आहे याबाबत ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञांनी आता आग्रही भूमिका घेतली पाहिजे. कारण प्रो. यशपाल समितीनेही अशा एका विषयासाठीच्या विद्यापीठांना मान्यता देणे थांबविले पाहिजे असे सुचविले आहे.

**दहा + दोन चे तीन तेरा!**

महाविद्यालये आणि विद्यापीठांची संख्या महाराष्ट्रात वेगाने वाढण्याला जी अनेक कारणे आहेत त्यांत १० + २ हा आकृतिबंध आणण्यामागचा मूळ उद्देश सपशेल फसला हे एक महत्त्वाचे कारण आहे. दहावी परीक्षेनंतरच्या पुढील दोन वर्षांत (कनिष्ठ महाविद्यालयांत) व्यावसायिक / तंत्र शिक्षणावर भर दिला जाईल आणि त्यामुळे बारावी उत्तीर्ण, होताच दोन वर्षांचा तांत्रिक शिक्षणाचा अनुभव मिळाल्यामुळे तरुण मुले-मुली एक तर उद्योगधंदे, कारखाने आणि कार्पोरेट कंपन्यांमधून नोकऱ्याकडे वळतील किंवा तसे न झाल्यास स्वतंत्र व्यवसाय सुरू करू शकतील अशी धोरण ठरविणाऱ्या तज्ज्ञांची अपेक्षा होती. मात्र तसे झाले नाही. एक तर ११ वी आणि १२ वी ह्या दोन वर्षांत तांत्रिक/व्यवसाय शिक्षणाचे अभ्यासक्रम सुरू करणाऱ्या शाळा/महाविद्यालये पाच टक्केही नव्हती. त्यासाठी लागणाऱ्या, प्रयोगशाळा, उपकरणे इ. साठी भांडवली गुंतवणूक करण्याची त्यांची क्षमता नव्हती. त्यामुळे बव्हंशी संस्थांमधून पुनः तेच आर्ट्स, कॉमर्स, सायन्सचे कोर्सेस + २ मध्येही शिकविले गेले. परिणामतः १२ वी उत्तीर्ण झालेल्या लक्षावधी विद्यार्थ्यांचे लोंढे महाविद्यालयीन प्रवेशासाठी गर्दी करू लागले.

जर + २ च्या दोन वर्षांत तांत्रिक अभ्यासक्रमांसाठी पायाभूत सोई निर्माण केल्या असत्या, तरी अर्थव्यवस्था-व्यापार-उदिमाचे क्षेत्र तितक्या झपाट्याने वाढत नव्हते. त्यामुळे इतक्या मोठ्या संख्येने बारावी (तांत्रिक) उत्तीर्ण होणाऱ्या युवा-युवतींना नोकऱ्यांत सामावून घेता येईल इतक्या वेगाने आर्थिक-औद्योगिक विकास होत नव्हता. मुंबई-पुणे-नाशिक हा त्रिकोण सोडला तर उद्योगधंद्याची विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि कोकणात वानवाच आहे ! तात्पर्य, महाविद्यालयामध्ये प्रवेश मर्यादित, आणि प्रवेश मिळवू इच्छिणाऱ्यांची संख्या कितीतरी पटीने जास्त - अशा परिस्थितीचा - म्हणजे पुरवठ्यापेक्षा मागणी जास्त - याचा फायदा बिनभांडवली धंदा करू इच्छिणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतला आणि आपापली शैक्षणिक दुकाने थाटली ! त्यांना राज्यशासनाकडून अभयदान मिळाले आणि वरदहस्तही!

१९८० च्या दशकात महाराष्ट्र शासनाने 'विनाअनुदान तत्त्वावर' महाविद्यालयांना मान्यता देण्याचे धोरण स्वीकारून शिक्षणाचा बाजार मांडू इछिणाऱ्या 'उद्योजकांना' केवळ खतपाणी घातले एवढेच नाही तर त्यांना सरकार-दरबारी प्रतिष्ठाही मिळवून दिली. विनाअनुदानित महाविद्यालयांतही





नागपूर विद्यापीठ

दोन प्रकार आहेत. एक म्हणजे आर्ट्स, कॉमर्स, सायन्स कॉलेजेस ज्यांच्या संस्था चालकांनी पहिली ५-६ वर्षे शुल्क, देणग्या, इ. च्या बळावर कॉलेज चालवावे अशी अपेक्षा होती. मग ६ वर्षांनंतर २५ टक्के, ७ व्या वर्षांनंतर १०० टक्के अनुदान राज्य शासनाने देणे सुरू केले. दुसरा प्रकार हा व्यावसायिक महाविद्यालयांचा, त्यांत वैद्यकीय, इंजिनिअरिंग, एम.बी.ए. वगैरे संस्थांना कायमस्वरूपी विनाअनुदान तत्त्वावर मान्यता देण्यात आली. त्यांत अपुरा प्राध्यापक वर्ग, अर्धवट, पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा व ग्रंथालय चांगल्या तऱ्हेने विकसित नसणे अशी अवस्था बव्हंशी कॉलेजेसमध्ये होती ती आजही आहे. पण ५० टक्के बारावीत गुण असलेल्या कोणालाही ह्या व्यावयायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षेस बसता येते. प्रवेशाचा कट ऑफ पॉइंट असा निश्चित नसतो. ज्याच्याजवळ पैसा आहे त्यांना व्यावसायिक महाविद्यालयांचे मोकाट रान मिळाले आणि संस्थाचालकांना माया कमविण्याचे साधन. बहुतेक संस्था राजकीय पुढाऱ्यांच्या असल्याने महाविद्यालयातून मिळणारा अतिरिक्त नफा निवडणुका लढण्यासाठी वापरण्याचा एक राजरोस मार्ग महाराष्ट्रात तयार झाला तसाच तो इतरही काही राज्यांमध्ये झाला. व्यावसायिक उच्चशिक्षण आणि राजकारण्यांची अशी साखळी तयार झाली. ह्या प्रकारात अध्यापनाचा दर्जा विनाअनुदानित संस्थांना सांभाळता आला नाही. बाजारपेठेच्या-मागणी पुरवठ्याच्या-नियमांनुसार प्राध्यापकांचे पगार, तसेच विद्यार्थ्यांकडून वसूल करण्याचे शुल्क आणि देणग्यांचे आकडे ठरू लागले. अध्यापनाचा दर्जा खालावला आणि पैशाने आपण काहीही विकत घेऊ शकतो ही विद्यार्थ्यांमध्ये मानसिकता बळावली. ए.टी.के.टी ची सवलत ही जशी व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणाऱ्या धनदांडग्या विद्यार्थ्यांची सोय होतीच तशीच ती संस्था चालकांचीही होती. कारण प्रथम वर्षांत काही कोर्सेसमध्ये अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षांत प्रवेश मिळण्याची वाट मोकळी झाल्याने संस्थाचालकांचा 'गल्ला' भरतच गेला ! मात्र ह्या व्यावसायिक शिक्षणाचा दर्जा राखण्याची जबाबदारी विद्यापीठांची आहे अशी हाकाटी पिटवून पोत्याने पैसे मिळवणारे संस्थाचालक आणि त्यांची पाठराखण करणारे राज्यशासन नामानिराळे राहिले ! म्हणजे 'पैसा आम्ही खिशात टाकतो त्ये दर्जाचं तुमी बगा' अशी सोईस्कर श्रमविभागणी झाली !

मग देशातील नामांकित मानल्या जाणाऱ्या विद्यापीठांच्या बनावट (बोगस) पदव्यांची प्रमाणपत्रे उपलब्ध होणार नाहीत तर आणखी काय होईल ? पुणे विद्यापीठात ७२९, मुंबई विद्यापीठांत २३७, नागपूर विद्यापीठात ९२, डॉ. आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात १८, तर शिवाजी विद्यापीठात ४२ अशा बनावट पदव्यांची प्रकरणे उघडकीस आली असून सध्या



त्यांची चौकशी सुरु आहे (पाहा : टाइम्स ऑफ इंडिया, पुणे मिरर, १९ एप्रिल २०१० पृ. २) हा हिमनगाचा फक्त दृश्य भाग आहे, पाण्यात लपलेला त्याहून कितीतरी पटीने मोठा असेल अशी शंका अनेकांच्या मनात आल्यास त्यांत आश्चर्य काहीच नाही. महाराष्ट्रातील पुणे विद्यापीठ, मुंबई विद्यापीठासह पाच विद्यापीठांची नॅक ने दिलेल्या मानांकनाची मुदत २००७ सालीच संपली आहे. त्यांनी नॅक मूल्यांकनाचा दुसरा टप्पा अद्याप पूर्ण केलेला नाही. पुणे विद्यापीठातील ५८७ संलग्न महाविद्यालयांपैकी २९१ कॉलेजेसमध्ये पूर्ण वेळ प्राचार्यांची नियुक्तीच केली गेलेली नाही. त्यात ६५ महाविद्यालये अशी आहेत ज्यांत प्राचार्य ते चपराशी यांमधील एकाचीही नेमणूक झालेली नाही तरीही त्यांची पाहणी करायला गेलेल्या समित्यांनी 'आलबेल' अहवाल सादर केल्याचे नुकतेच पुणे विद्यापीठाच्या सिनेट बैठकीत सांगण्यात आले ! ३१ मे २०१० पूर्वी पूर्णवेळ प्राचार्य न नेमलेल्या महाविद्यालयांचे २०१०-११ ह्या शैक्षणिक वर्षासाठी प्रथम वर्षाचे प्रवेश देणे बंद करावे असा मुंबई उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेला आहे. यापैकी काही महाविद्यालयांत तर प्राचार्याला रु. तीन हजार तर लेक्चररला रु. दीड हजार एवढाच पगार मिळतो. त्यापेक्षा रोजगार हमीवर अधिक वेतन मिळते हे सत्य आहे.

**ग्लोबल मार्केटचे आव्हान**

आर्थिक उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाच्या प्रक्रियांनी भारतातील उच्चशिक्षण यंत्रणेला पूर्णपणे विळखा घातला आहे. जागतिक व्यापार संघटनेचा भारत सदस्य असल्याने उच्चशिक्षणाची बाजारपेठ खुली करण्याचे बंधन ओघाने आलेच. सेवाक्षेत्रा (शिक्षण-आरोग्य इ. ) वरील खर्च टप्प्याटप्प्याने कमी करावा लागणार आहे हे अटळ आहे. 'प्राथमिक शिक्षणाच्या विस्तारासाठी अधिक खर्च करावा लागणार असल्यामुळे आता उच्च शिक्षणाकरिता अधिक निधी उपलब्ध करून देणे शक्य नाही' असे सांगत राज्यशासनातील पुढारी आणि नोकरशहा तुमची आमची सतत दिशाभूल करीत राहणार. त्यातच आता विदेशी विद्यापीठांना भारतात त्यांचे शैक्षणिक संकुल सुरू करण्याची परवानगीही लवकरच दिली जाणार आहे. त्या संबंधीच्या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली असून ते संसदेसमोर पुढच्याच अधिवेशनात ठेवले जाणार आहे. अशा परिस्थितीत ढासळणाऱ्या शैक्षणिक गुणवत्तेचे ओझे घेऊन महाराष्ट्रातील विद्यापीठे कशी सामोरे जाणार हा खरा प्रश्न आहे. शिवाय मुंबई-पुणे आणि नागपूर विद्यापीठे प्रत्येकी पाचशे-सहाशे संलग्न महाविद्यालयांच्या ओझ्यामुळे पार खचून गेलीत, आणि विद्यापीठ विभाजनाचा प्रश्न अद्याप प्रलंबितच आहे. राज्यशासन रु. एक लाख ऐंशी हजार कोटी एवढ्या कर्जाखाली इतके दबून गेलेय की सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू केल्यामुळे शासनाची अवस्था बसलेल्या घोड्यासारखी झाली आहे.

फक्त भाषिक अस्मितेचा भावनिक प्रश्न वारंवार पुढे करून शैक्षणिक गुणवत्ता उंचावणार नाही आणि सुवर्ण महोत्सवी वर्षात महाराष्ट्राची मान तेवढ्यानेच ताठ होणार नाही. ज्ञानाधिष्ठित समाजाची वाटचाल आश्वस्त करणारीच झाली पाहिजे, आणि त्यासाठी उच्च शिक्षणाचा दर्जा सांभाळण्याचे आव्हान प्राध्यापक वर्गाने पेलायचे आहे. मात्र हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा विद्यार्थी आणि प्राध्यापकांची निवड/नेमणुका पैसे वसूल करून नव्हे, तर फक्त गुणवत्तेच्या निकषावरच करण्याला आणि शैक्षणिक उपक्रमांना संपूर्ण स्वायतत्ता देण्याला संस्थाचालक व राज्यशासन कटिबद्ध होतील. नोकरशहा आणि राजकीय पुढाऱ्यांचा उच्च शिक्षणातील 'धुडगूस' वाटण्याइतपत हस्तक्षेप जरी थांबला, तरी सुवर्ण महोत्सवी वर्षात महाराष्ट्राने उच्चशिक्षण क्षेत्रात एक पाऊल पुढे टाकलेय असे म्हणता येईल.

■■

महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सव





# संस्कृतीचे महत्त्व : विकासासंदर्भात


मूळ लेख :
अमर्त्य सेन

स्वैर अनुवाद :
डॉ. विद्युत भागवत



*प्रत्येक देशाने वा समुहाने आपल्या आपल्या संस्कृतीशी एकनिष्ठ राहाणे असे वाटणे हे मत जर स्विकारले तर, आपण फक्त मॅक्डोनाल्ड आणि सौंदर्य स्पर्धा नाकारत नाही तर शेक्सपिअर, बॅलेनृत्य किंवा अगदी क्रिकेट मॅचसुद्धा नाकारतो. रविंद्रनाथ टागोर ह्यांनी असे म्हटले आहे, 'जे जे मानवी निर्माण म्हणून आपल्याला समजते आणि भावते ते तात्काळ आपले होऊन जाते. मग त्यांचे मूलस्थान कोठेही असो, मला माझ्या मानवतेबद्दल अभिमान वाटतो. कारण, माझ्या स्वतःच्या देशाप्रमाणेच इतर देशातील कवी आणि कलावंत ह्यांचे आविष्कार मला आपले वाटतात. ' आपण मुळात कुठूनही आलेले असू जे आपल्याला आवडते आणि ज्याची आपल्याला आकांक्षा असते त्यापासून आपण वंचित राहता कामा नये. शेवटी संस्कृती ही फक्त भूगोल वा भूप्रदेश नसते.*

**स्वैर अनुवादासंदर्भातील मनोगत :**

गेल्या पस्तीस वर्षांत लिंगभावाची घडण, विकास आणि संस्कृती ह्या चौकटीत कशी घडली हे पाहाताना अमर्त्य सेन यांचे लेखन महत्त्वाचे वाटते.

एकतर कनिष्ठ वा मध्यम वर्गातून वरच्या वर्गात जाऊ पाहणाऱ्या एका शिक्षित कुटुंबात मुलगी म्हणून 'संस्कृती' हा शब्द माझ्या वाट्याला आला, तो मी वयात आल्यावर, भारतीय कुटुंबातील स्त्रियांनी संस्कृती जपायची असते, वाढवायची असते, एका कुटुंबातून दुसऱ्या कुटुंबात जाऊन आपल्या संस्कृतीच्या बळावर घरातील मुले-बाळे आणि पुरुष मंडळी ह्यांना काबीज करायचे असते, असे बरेचसे संस्कार माझ्यावर झाले होते. स्त्रिया संस्कृतीच्या वाहक असतात तसेच, मूर्तिमंत प्रतीक असतात ह्या विचाराचे आंतरिकीकरण इतर स्त्रियांप्रमाणेच मीसुद्धा केले होते.

संस्कृती प्रमाणे 'विकास' ही संकल्पनासुद्धा लहानपणापासून शहरीकरणाच्या प्रक्रियेशी मनात जोडली गेली होती. चांगले रस्ते असणं, सांडपाण्याची व्यवस्था असणे, वाहतुकीची साधने, दवाखाने, शाळा, दुकाने अशा सुविधा हाकेच्या अंतरावर असणे, रेडिओ, टेलिफोन, दूरदर्शन हे सारे उपलब्ध असणे म्हणजे विकास होणे असे नैसर्गिकरीत्या मानले गेले होते आणि त्यात काही चूक नव्हते. लहानपणी ऑपेरा हाऊस, लॅमिंग्टन रोड ह्या मुंबईच्या गजबजलेल्या गतिशील ठिकाणी राहिल्यानंतर ठाण्याला राहणाऱ्या खारकघर आळीतील आत्याकडे जाणे नकोसे वाटे, तिथले टोपलीचे संडास, उघडी गटारे, लहान गल्लीबोळ मागास वाटत असत.

लिंगभाव हा शब्द स्त्री अभ्यासामध्ये शक्यता खुल्या झाल्यानंतरच माझ्या शब्दकोशात सामील झाला. इंग्रजीतील जेन्डर ह्या शब्दाला समानार्थी म्हणून लिंगभाव हा शब्द आणला तेव्हा, 'लिंग' ही संकल्पना जैन साहित्यात 'आत्मा' वा 'स्व' या अर्थाने येते ह्याचे भान होते. स्त्रिया, बायका, बाया अथवा साऱ्या जणी ह्या शब्दांना व्यवहारात जो सर्वसाधारण अर्थ असतो, सामान्यज्ञानाच्या चौकटीत एका फटकाऱ्यात सर्व स्त्रियांना तो ज्या प्रकारे लागू होतो, त्या प्रकारे स्त्री अभ्यासात बिनचिकित्सा, विश्लेषण न करता हे शब्द वापरणे चूक आहे हे समजत गेले.

१९७४-७५ ह्या दशकात एकीकडे आणीबाणी दुसरीकडे दलित, आदिवासी, विद्यार्थी आणि स्त्रिया ह्यांच्या चळवळी आणि भारतीय स्त्रियांच्या दर्जाविषयक अहवालांचे प्रकाशन अशा अनेक घटना ह्या काळात घडत होत्या. साहित्य, भाषाशास्त्र, भाषाअध्ययन, अध्यापन या मार्गाने जाताना आपण काही वेगळे नवे मार्ग हाती घेतले पाहिजेत असे व्यक्ती म्हणून मला जाणवत होते. आणीबाणीच्या काळात तुरुंगात गेलेली परिचयातील मंडळी आणि त्याचवेळी औपचारिक शिक्षणात आलेल्या बंदिस्ती विरोधात होणारे प्रयोग असे सारे घडत होते. मागोवा, युक्रान्द अशासारख्या विद्यार्थी चळवळीतील विद्यार्थी अभियांत्रिकी किंवा वैद्यकीय शिक्षण घेऊनही प्रमुख प्रवाही नोकऱ्या, व्यवसायांच्या मागे न लागता पूर्णवेळ कार्यकर्ते होऊन ग्रामीण भागातील लहान शेतकरी अथवा आदिवासींच्या



वतीने झगडा उभे करीत होते. ह्याच काळात शहरातील स्त्रियांनी स्त्रियांवर होणाऱ्या हिंसाचाराचे प्रश्न हाती घेऊन भारतातील स्त्रियांच्या व्यवस्थात्मक दुय्यमत्वाचे मुद्दे मांडण्यास सुरुवात केली. मुंबई, बंगलोर, दिल्ली, हैदराबाद अशा शहरांमधून हुंडाबळी आणि बलात्कार या प्रश्नांसंदर्भात तरुण मुलींचे मोर्चे निघू लागले. ह्या काळातच विकासाची चिकित्सा करून, पर्यावरणीय विनाश हा मुद्दा घेऊन स्त्रियांच्या निसर्गाशी असणाऱ्या आंतरिक नात्याची मांडणी केली गेली. स्त्रिया मूलतः संगोपक, संवर्धक काम करतात आणि त्या मूल जन्माला घालतात ह्या वास्तवाच्या आधारे स्त्रियांचे निसर्गाशी काही 'विशेष' नाते असते हा विचार आमच्यातील बऱ्याच जणींना मनोमन पटला. चिपको आंदोलन, वंदना शिवा ह्यांची 'प्रकृती-पुरुष' या जोडीच्या आधारे स्त्री शक्तीविषयक मांडणी, मधू किश्वर ह्यांचे पाश्चात्त्य जगात घडलेले स्त्रीवादाचे प्रारूप नाकारून आणि अस्सल भारतीय स्त्रीत्व शोधणे तसेच, मेनका गांधी ह्यांचे प्राण्यांविषयीचे प्रेम आणि कोंबड्या वा गाईंना यांत्रिकप्रकारे मांस निर्माण करणारे जीव मानणे ह्या बाजारपेठी प्रवृत्तीला विरोध करणे हे सर्व क्रांतिकारी वाटण्याचेच ते दिवस होते. मोठ्या धरणांना विरोध करणारे नर्मदा बचाव आंदोलन तसेच, शेती मालाला रास्त भाव मागणारे परंतु स्त्रियांना माजघर, शेती, सीता शेती करण्याची वाट दाखविणारे शेतकरी आंदोलन अशा एककलमी, एक नेतृत्व छायेखाली वाढणाऱ्या आंदोलनांचा हा काळ होता. बघताबघता आमच्या डोळ्यासमोरच स्त्री चळवळीतून अनेक बिगर शासकीय संघटना जन्माला आल्या. त्यातील कित्येकांना परदेशातूनही पैसा मिळाला. कोणी 'पाणी प्रश्ना'वर काम करून लागले तर, कोणी लहानलहान गावखेड्यांमध्ये स्त्रियांच्या सामूहिक पापड, लोणच्यां ऐवजी रांगोळ्या काढण्याच्या कौशल्यालाच सांस्कृतिक एकात्मता हे नाव देऊ लागले. स्त्रियांच्या शोषणाचा, दडपणुकीचा व्यवस्थात्मक मुद्दा, धर्म, जात, समुदाय ह्या चौकटीत घडणाऱ्या भारतातील बहुविध पुरुषसत्ताकता आणि त्यातून जागतिक भांडवलाशी केली जाणारी हातमिळवणी, दडपलेल्या जातींमधील स्त्रियांचे केले जाणारे वेश्याकरण असे अनेक मुद्दे मागे पडू लागले. स्त्रियांची चळवळ स्त्रिया विरुद्ध पुरुष अशी नाही हा मुद्दा रेटण्यामध्येच आपली शक्ती खर्च करू लागली. त्यानंतरच्या काळात विशेषतः १९९० च्या दशकात बाजारपेठी मूलतत्त्ववादाबरोबरच धार्मिक मूलतत्त्ववाद फोफावू लागला आणि दंगलींचे रण माजले. अल्पसंख्याक

गटांना दहशत बसविताना त्या गटातील स्त्रियांना त्या गटांचे प्रतीक मानून बलात्कार, हिंसा आणि एका अर्थाने सर्वतोपरी अवमूल्यनाला तोंड द्यावे लागले. 'सेवा' सारख्या स्त्रियांच्या सक्षमीकरणाचे काम करणाऱ्या संघटनांचा आवाज अशा विनाशक, हिंसक दंगलीच्या काळात हरवला. स्त्रीवाद ह्या राजकीय भानाचे हिंदुत्ववादी, वर्चस्ववादी रूप दिसू लागले. पुन्हा एकदा एक निरुत्तर करणारी अवस्था समोर आली. ह्या टप्प्यावरच लिंगभाव, संस्कृती आणि विकास ह्यांचे परस्परसंबंध जगाच्या पातळीवर पाहिले गेले पाहिजेत असे जाणवत राहिले.



*डॉ. अमर्त्य सेन*

अमर्त्य सेन हे पहिल्या जगात राहाणारे अर्थशास्त्रज्ञ भारतातील ०-६ ह्या वयोगटात खालावणारे बालिकांचे प्रमाण किंवा स्त्रिया आणि दारिद्र्य ह्यांचे भारतीय भूमीवरील नाते ह्या विषयी सातत्याने एक समतोलाची भूमिका घेतात. आपण निवडलेल्या निबंधामध्ये अमर्त्य सेन यांनी संस्कृतीचा विचार अर्थशास्त्रज्ञांनी सर्जनशीलपणे केला पाहिजे असे मांडले आहे. अमर्त्य सेन ह्यांनी प्रत्येक देशाने आता आपले खरे पर्याय वाढविले पाहिजेत आणि आपल्या देशातील लोकांच्या स्वातंत्र्याच्या कक्षा वाढविल्या पाहिजेत असा महत्त्वाचा मुद्दा मांडला आहे.

थोडक्यात ह्या निबंधाच्या आधारे आपण गेल्या तीन दशकात भारतीय समाजामध्ये जे वादविवाद, चळवळी वा संघर्ष उभे राहिले त्यांचा लिंगभाव, विकास आणि संस्कृती ह्या संदर्भात करू शकतो.

**लेखकाच्या मूळ मांडणीचा स्वैर अनुवाद :**

## संस्कृती कशा प्रकारे महत्त्वाची ठरते ?

समाजशास्त्रज्ञ, मानवशास्त्रज्ञ आणि इतिहासतज्ज्ञ बऱ्याचवेळा अर्थशास्त्रज्ञांच्या 'संस्कृती' ह्या विषयाकडे पुरेसे लक्ष न देणाऱ्या प्रवृत्तीबद्दल शेरे मारत असतात. सर्व साधारणतः मानवी समाजांचे स्वरूप तपासताना आणि विशेषतः विकास प्रक्रियेचा तपास करताना अर्थशास्त्रज्ञ असे करतात. अर्थात, अर्थशास्त्रज्ञांनी संस्कृतीकडे दुर्लक्ष केले हा आरोप खोटा ठरविण्यासाठी आपण काही उदाहरणे देऊ शकतो. अगदी किमानपक्षी ॲडम स्मिथ, जॉन स्टुअर्ट मिल किंवा आल्फ्रेड मार्शल ह्यांची उदाहरणे घेता येतात. अर्थात तरीही एक सर्वसाधारण टीका ह्या दृष्टीने पाहता हा आरोप बहुतांश स्वरूपात योग्यच ठरतो.

हे दुर्लक्ष (किंवा अधिक नेमकेपणाने मांडायचे तर तुलनात्मक उपेक्षा) दुरुस्त केले गेले पाहिजे. अर्थशास्त्रज्ञांनी असे केले तर, आर्थिक आणि सामाजिक घडामोडींवर संस्कृतीचा परिणाम कसा होतो ह्यावर अधिक फलदायी स्वरूपात लक्ष पुरवतील. आणखी असे की, जागतिक बँक ही प्रामुख्याने अर्थशास्त्रज्ञ आणि वित्तीयतज्ज्ञ ह्यांनी केलेल्या विचार चौकटीवर भिस्त ठेवून असतात. अर्थशास्त्रज्ञांना जर संस्कृतीची भूमिका फारशी महत्त्वाची वाटत नसेल, तर त्याचा अप्रत्यक्ष परिणाम वर्ल्ड बँकेसारख्या संस्थांच्या दृष्टिकोनावर आणि व्यवहारावर होतो. अशा तऱ्हेने संस्कृतीकडे दुर्लक्ष करणे ही गोष्ट किती धोकादायक असू शकते ह्याबद्दल मतभिन्नता असेल. परंतु, विकासाच्या विश्लेषणामध्ये खोलवर तपास करायचा, तर विकासाचे सांस्कृतिक परिमाण तपासणे आवश्यक ठरते. विकासाच्या संदर्भात येणारे नवे नवे बदल तपासताना 'संस्कृती' या घटकाचा विचार करणे आवश्यक ठरते. संस्कृतीचा विचार करताना किती भिन्न प्रकारे संस्कृती प्रभाव पाडत असते हे लक्षात येते. अगदी निर्दोष अशा आर्थिक रणनीतींचे मूल्यमापन करतानासुद्धा हा विचार महत्त्वाचा ठरतो.

लॉरेन्स हॅरिसन आणि सॅम्युएल हंटिंग्टन (२००२) ह्यांनी एकत्रित संपादित केलेले एक महत्त्वाचे आणि प्रचंड स्वरूपात यशस्वी पुस्तक म्हणजे 'संस्कृती महत्त्वाची असते



*भाजी विकणाऱ्या स्त्रियांचा उदरनिर्वाह की सबलीकरण महत्त्वाचे ?*

का?' हा प्रश्न येथे तसा चर्चेच्या दृष्टीने फारसा महत्त्वाचा नाही. मानवी जीवनात सातत्याने पाठपुरावा करणाऱ्या संस्कृतीच्या प्रभावाचा विचार केलाच पाहिजे. परंतु खरा प्रश्न आहे तो असा की, संस्कृती 'कशा प्रकारे' महत्त्वाची ठरते ? ती महत्त्वाची आहे की नाही हा विवादाचा मुद्दा असूच शकत नाही. विकासावर कोणत्या भिन्न मार्गांनी संस्कृतीचा प्रभाव पडतो? हे प्रभाव कोणत्या प्रकारे अधिक चांगल्या स्वरूपात समजावून घेता येतील? विकासाची धोरणे जी अगदी उचित वाटत असतात त्यांच्यामध्येही दुरुस्ती किंवा बदल संस्कृतीच्या हस्तक्षेपामुळे कसे होतात? थोडक्यात येथे आपण संस्कृती हा घटक महत्त्वाचा आहे हा विषय फक्त मांडत नसून आपल्याला संस्कृतीचे स्वरूप आणि आविष्कार ह्यातून प्रत्यक्ष कार्यक्रम आणि धोरण ह्यावर काय परिणाम होतो हे पाहणे महत्त्वाचे वाटते.

सदर निबंधामध्ये मी 'कशा प्रकारे' ह्या प्रश्नाची चर्चा केली आहे. परंतु ह्या प्रक्रियेत मला काही 'कशा प्रकारे नाही' अशा प्रश्नांचाही विचार केला पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की, संस्कृतीच्या भूमिकेची पुरेशी दखल घेण्याच्या दडपणापोटी काही वेळा विकासाच्या प्रक्रियेवर संस्कृतीचा होणारा प्रभाव पाहताना अनेकदा अत्यंत साचेबंद आणि सरळसोट दृष्टिकोन घेतलेला दिसतो. उदाहरणार्थ, अनेक जणांचा असा विश्वास दिसतो – मग हा विश्वास कधी स्पष्ट शब्दात तर, कधी सूचित स्वरूपात व्यक्त केला जातो असा की, भिन्न रेषांचे दैव त्यांच्या संस्कृतीनुसार अपरिवर्तनीय पद्धतीने निश्चित केले जाते. असा विचार करणे म्हणजे अतीव स्वरूपात सुलभीकरण करणे, इतकेच नसून येथे असा निष्कर्ष निघतो की, काही देशांमध्ये 'चुकीची' संस्कृती असल्याने त्यांचे भविष्य विकासाच्या दृष्टीने निराशाजनकच असते. असे निष्कर्ष म्हणजे राजकीय आणि नैतिकदृष्ट्या किती घृणास्पद असतात, एवढेच नसून माझ्या मते ह्यातून संकल्पनेच्या पातळीवर एकतऱ्हेचा

निरर्थकपणा अभिव्यक्त होतो. म्हणून ह्या निबंधातून मला 'कशा प्रकारे नाही' हा प्रश्‍न सुद्धा हाती घेणे महत्त्वाचे वाटते.

ह्या निबंधाचा तिसरा उद्देश आहे तो म्हणजे संस्कृतीच्या क्षेत्रात एकमेकांपासून शिकण्याची भूमिका किती महत्त्वाची असते ह्याची चर्चा करणे. जरी विकासाच्या प्रक्रियेचा आंतरिक भाग म्हणून अशा प्रकारची देवघेव आणि शिक्षण दिले जाते तरीही ह्या प्रक्रियेला बऱ्याचवेळा कमी महत्त्वाची असे मानले जाते. खरेतर प्रत्येक संस्कृतीकडे एकमेव अद्वितीय म्हणून बघितले जाते त्यामुळे संस्कृती जणू काही बाह्य परिणामांपासून संपूणतः अलिप्त असते असे मानण्याकडे कल दिसतो. विकासाची प्रक्रिया समजावून घेताना असे करणे निश्‍चितच फसवे आणि बऱ्याच प्रमाणात हानीकारक ठरू शकते. खरोखरच संस्कृतीच्या अनेक पैलूंपैकी सर्वांत महत्त्वाचा पैलू असतो तो म्हणजे, एकमेकांपासून शिकण्याची शक्यता. त्या ऐवजी जर आपण संस्कृतीच्या चौकटीत जगातील सामान्यजनांना कर्मठपणे वर्गीकरण करून ढकलून देऊन त्याचे सोहाळे किंवा हळहळ उराशी बाळगून बसलो तर असे करणे म्हणजे कर्मठ भाषापंडितांच्या पंगतीला जाऊन बसण्यासारखे आहे.

शेवटी ह्या निबंधात सांस्कृतिक देवाण-घेवाणीचे महत्त्व आणि देशांतर्गत संप्रेषण ह्या विषयी चर्चा करताना समकालीन जगामध्ये जागतिकीकरण आणि सत्तेचा असमतोल ह्या विषयी खरी किंवा मनात भासत असलेली धास्तीसुद्धा मी मांडली पाहिजे. बऱ्याचवेळा स्थानिक संस्कृतींच्या विनाशाची भीती हा दृष्टिकोन व्यक्त केला जातो आणि मग ह्या साऱ्याचा प्रतिकार करण्यासाठी काहीतरी केले पाहिजे हा विश्‍वाससुद्धा सत्याचा आभास निर्माण करू शकतो. अशा तऱ्हेच्या शक्य कोटीतील घाताचे आकलन कसे करावे आणि असा घात होऊ नये म्हणून किंवा तो परतवून लावण्यासाठी कोणत्या आवश्यक गोष्टी केल्या पाहिजेत हे विषयसुद्धा विकासाच्या विश्‍लेषणाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. हाच या निबंधाचा चौथा आणि शेवटचा मुद्दा तपासून पाहण्याच्या दृष्टीने मी मांडला आहे.

**संदर्भ (किंवा अनुसंधान)**

येथे लक्षात घेतले पाहिजे की, विकासाच्या दृष्टीने संस्कृती कोणकोणत्या भिन्न मार्गाने महत्त्वाची ठरते हे जाणून घेणे आवश्यक आहे. खाली दिलेले कोटिक्रम ह्या दृष्टीने आत्यंतिक महत्त्वाचे आणि दूरगामी परिणाम करणारे वाटतात.

१) विकासाच्या घडणीचा एक भाग म्हणून संस्कृती

येथे आपण एका पायाभूत प्रश्‍नापासून सुरुवात करू शकतो. विकास कशासाठी असतो? विकासाच्या प्रकियेमध्ये आपला प्रयत्न असतो तो म्हणजे, एका निरोगी आणि स्वातंत्र्यशील जगण्याचा. असे जगण्यासाठी मानवी जीवन समृद्ध व्हायचे तर साहित्य, संगीत, कला ह्यांचा अभाव असेल तर ह्याला विकासाचे यश म्हणून मानता येणार नाही. ह्या ना त्या प्रकारे संस्कृती आपले आयुष्य आपल्या आकांक्षा, आपल्या विफलता, आपल्या महत्त्वाकांक्षा आणि आपली स्वातंत्र्ये ह्यांना वेढत असते. सांस्कृतिक घडामोडींसाठी स्वातंत्र्य आणि संधी ही मूलभूत स्वातंत्र्यामधील एक महत्त्वाची गोष्ट आहे. असे झाले तरच विकासाच्या घडणीचा भाग होते.

२) आर्थिकदृष्ट्या उत्पादन मिळवून देणारे सांस्कृतिक कार्यक्रम आणि वस्तू.

अनेक कार्यक्रम ज्यामधून आर्थिकदृष्ट्या फायदा मिळू शकतो. ते कार्यक्रम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या सांस्कृतिक सुविधा आणि अधिक सर्वसाधारणपणे बोलायचे तर सांस्कृतिक पर्यावरण यावर अवलंबून असतात. पर्यटन क्षेत्राचा सांधा सांस्कृतिक स्थळांशी (ह्यात ऐतिहासिक स्थळेही येतात) जोडलेला असतो हे सहजच लक्षात येते. पर्यटन क्षेत्रांच्या दृष्टीने गुन्हेगारी असणे वा नसणे किंवा स्वागतशील परंपरा असणे तसेच देशांतर्गत किंवा सीमारेषांपलिकडील परस्पर विनिमय ह्या गोष्टींही महत्त्वाच्या ठरतात, संगीत, नृत्य आणि इतर सांस्कृतिक कार्यक्रम ह्यांना फार मोठी व्यापारी, बऱ्याच वेळा जागतिक बाजारपेठ मिळणे शक्य असते. अशा कलात्मक कार्यक्रमांची केंद्रे अस्तित्वात असणे हे अनेकदा एखाद्या विशिष्ट देशामध्ये किंवा प्रांतामध्ये लोकांना आकर्षित करण्यास कारणीभूत ठरते. ह्यातून अनेक अप्रत्यक्ष परिणाम पाहावयास मिळतात.

अर्थात, सांस्कृतिक म्हणजे धार्मिक वस्तू वा स्थळे ह्यासह सर्व, ह्यांचा वापर पैसा मिळण्यासाठी करावा की करू नये ह्याबद्दल शंका वाटणे साहजिक आहे आणि अनेकदा काही वेळा व्यापारी वापरामुळे एखाद्या वस्तूचे किंवा स्थळाचे महत्त्व उखडून निघेल असे वाटले तर आर्थिक लाभाची संधी सोडूनही द्यावी लागते. अशा तऱ्हेचा घातक व्यापारी वापर टाळूनसुद्धा सांस्कृतिक आणि आर्थिक कार्यक्रम एकत्रितपणे आणण्याची संधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध असते. इतकेच नाही तर, जी माणसे अत्यंत चांगली देखभाल केलेली सांस्कृतिक किंवा धार्मिक स्थळे पाहण्यासाठी येतात, त्यांचा प्रत्यक्ष व्यापारी हेतू नसूनही अशी माणसे त्या देशातील या प्रांतातील पर्यटन व्यवसायाला चालना देतात.



*रोजगार हमीच्या कामावरील महिलांची संख्या मोठी लक्षणीय आहे.*

३) सांस्कृतिक घटक आर्थिक व्यवहारावर परिणाम करतात

काही अर्थशास्त्रज्ञांच्या विचार चौकटीत असा समज पक्का झालेला असतो की, सर्व माणसे समान पद्धतीनेच विचार करतात. (उदा. जणू काही सर्व माणसे एखादे परिपूर्ण कवच घालून स्वतःचे हित अथकपणे वाढवितच जातात.) परंतु, हे सर्वसाधारण सत्य नव्हे ह्या विषयी भरपूर पुरावा उपलब्ध आहे. सांस्कृतिक प्रभावांमुळे कामासंदर्भात असणारी नैतिकता, जबाबदार वर्तणूक, आत्मस्फूर्तीने एखादी गोष्ट हातात घेण्याची क्षमता, चैतन्यशाली व्यवस्थापन, उद्योजक म्हणून असणारी हिरीरी, धोका पत्करण्याविषयी असणारी ऐच्छिकता आणि मानवी वर्तणुकीचे इतर अनेक घटक ह्या सर्व गोष्टी आर्थिक यश मिळवण्याच्या दृष्टीने कळीच्या ठरतात.

विनिमयावर आधारित अर्थव्यवस्था जर यशस्वीपणे कार्यरत व्हायची असेल, तर परस्परांवरील विश्वास आणि सूचक अशा काही रीतीरिवाजांची चौकट अपेक्षित असते. वर्तणुकीचे हे साचे भरपूर असतात तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे सहज शक्य असते. परंतु जेव्हा असे साचे निर्माण करावे लागतात, त्यांची निगराणी करावी लागते, तेव्हा ते नसतील तर आर्थिक यशाच्या दृष्टीने मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. ह्याविषयी अनेक उदाहरणे भांडवलपूर्व अर्थव्यवस्थांमध्ये येणाऱ्या समस्या पाहिल्या तर घेता येतील. अशा अर्थव्यवस्थांमध्ये व्यापार आणि धंदा ह्यासाठी लागणारे मूलभूत गुण अविकसित असतात.

आर्थिक यशाच्या इतर अनेक घटकांशी वर्तणुकीची संस्कृती जोडलेली असते. उदाहरणार्थः आर्थिक भ्रष्टाचार आहे किंवा नाही आणि त्याची सांधेजोड संघटित गुन्ह्याशी कशी आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते. इटलीमध्ये ह्या विषयावर चर्चा करताना मला त्या चर्चेमध्ये सहभागी होता आले, आणि तेव्हा इटलीमधील संसदेमध्ये माफिया-विरोधी आयोग स्थापन करण्याचा सल्ला देता आला. त्या वेळी ह्या आयोगासाठी आवश्यक असणाऱ्या मूल्यांची साद्यन्त चर्चा केली गेली. संस्कृती आणखी एका दृष्टीने महत्त्वाची ठरते कारण, तिच्यामुळे भोवतीच्या पर्यावरणाशी मैत्रीपूर्ण वागणूक निर्माण करता येते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये जेव्हा नव्या चकमकी घडून नवी आव्हाने समोर येतात, तेव्हा संस्कृतीची रीतसुद्धा त्यानुसार बदलते.

४) संस्कृती आणि राजकीय सहभाग

सांस्कृतिक परिस्थितीतील प्रभावानुसार नागरी जीवनात केला जाणारा परस्पर व्यवहार आणि राजकीय कार्यक्रम ह्यामधील सहभाग घडत असतो. जर सार्वजनिक जीवनातील चर्चा आणि सहभागी पद्धतीने केलेला विचारविनिमय ह्यांची परंपरा असेल तर हा कळीचा मुद्दा ठरतो. लोकशाही स्थापनेच्या दृष्टीने, जतन करण्याच्या दृष्टीने आणि व्यवहाराच्या दृष्टीने हे महत्त्वाचे

ठरते. नागरी जीवनातील कळीची गुणवत्ता म्हणून सांस्कृतिक सहभाग ही गोष्ट युरोपातील प्रबोधनाविषयी विचार मांडणाऱ्यांनी मांडली आहे.

अर्थात ॲरिस्टॉटलने असे म्हटले आहे की, मनुष्यप्राण्याचा परस्परांशी सभ्य स्वरूपात व्यवहार करण्याकडे नैसर्गिकच कल असतो आणि तरीही भिन्न समाजानुसार राजकीय सहभागाचे प्रमाण बदलते. विशेषतः समाजामध्ये असणारे राजकीय कल हे हुकूमशाही, सत्ताधारी आणि त्यांचे नियंत्रण ह्यामुळे दडपले जातात हे खरे असले तरी राजकीयदृष्ट्या दडपणूक केल्यामुळे जी एक भीतीची संस्कृती निर्माण होते त्यामुळेही हे घडते. काही समाजांमध्ये उपेक्षेची संस्कृती रुजलेली असते आणि त्यातून एक प्रकारचा संशयवादीपणा निर्माण होऊन दुसऱ्यांविषयी वा समाजाविषयी उदासीनता किंवा शिथिलपणा येतो. विकास साध्य होण्यासाठी राजकीय सहभाग हा कळीचा मुद्दा ठरतो. विकास कसा करायचा, कोणत्या साधनांच्या आधारे करायचा आणि विकास घडविताना कोणती नैतिक मूल्ये घडवायची किंवा भरीव करायची ह्या दृष्टीने हे महत्त्वाचे ठरते.

५) सामाजिक एकजूट आणि संघटन

आर्थिक व्यवहार आणि राजकीय सहभाग ह्यांच्या बरोबरच संस्कृतीचा प्रभाव, सामाजिक एकजूट आणि परस्परांना पाठिंबा देणे ह्यावरही पडतो. सामाजिकदृष्ट्या जगण्याचे यश हे फार मोठ्या प्रमाणात लोक ज्या उत्स्फूर्तपणे एकमेकांना पाठिंबा देतात त्याच्याशी निगडित असते. ह्याचा अगदी खोलवर परिणाम समाजाच्या व्यवहारावर दिसतो. ह्या समाजातील कमनशिबी सदस्यांची काळजी घेणे आणि सर्वांची असलेली मालमत्ता जपणे असे सारे घडू शकते. समाजामध्ये जर एकजूट असेल आणि परस्परांना पाठिंबा देणारे व्यवहार असतील तर, त्यातून तो समाज पुढे जातो असे अभ्यासकांचे मत आहे आणि ह्याला हे अभ्यासक 'सामाजिक भांडवल' असे म्हणतात. एकमेकांशी जोडलेपण असणारा समाज ही त्या समाजाची मालमत्ता ठरते.

सामाजिक अन्वेषणाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे नवे क्षेत्र आहे. अर्थात, असे करताना सामाजिक भांडवलाला भांडवल म्हणून जे महत्त्व आहे त्याचे स्वरूप बारकाव्याने छाननी करून तपासले पाहिजे. एक सर्वसाधारण संसाधन म्हणून त्याकडे पाहता येईल का हा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. एखाद्या गटाचे स्वरूप कसे आहे यावर ते अवलंबून असते. उदा. अनेक काळ एखाद्या प्रदेशात राहणाऱ्या विशिष्ट गटाची एकजूट ही त्या गटाचे सदस्य नसणाऱ्यांशी मित्रभावनेची नसणार. म्हणजेच समूहकेंद्री विचार हा या समाजांतर्गत नात्याच्या दृष्टीने सकारात्मक ठरतो आणि इतर स्थलांतरितांच्या दृष्टीने त्यांना बगळणारा म्हणून नकारात्मक ठरतो. अस्मितेच्या पायावर विचार करण्यामधून परस्पर विसंगत घटक निर्माण होतात. जेव्हा एखादा गट एकमेकांशी घट्टपणे जोडलेला असतो तेव्हा, अस्मितेच्या मुद्यामळे तो अधिक भरीव होतो. परंतु, त्यामुळेच ह्या गटाच्या सदस्य नसणाऱ्यांना हिंसक वागणूक देण्यासही असा गट कचरत नाही. असे द्वैत निर्माण होत असल्यामुळेच सामाजिक भांडवलाला सरसकट भांडवल मानणे चुकीचे ठरेल. परंतु, तरीही सामाजिक भांडवलाची संकल्पना समस्यात्मक असली तरी तिचे स्वरूप आणि व्यवहार ह्याविषयी संशोधन करणे, तपासणी करणे महत्त्वाचे ठरते.

६) सांस्कृतिक स्थळे आणि गतकाळातील वारशासंदर्भातील पूर्वस्मृती

एखाद्या देशाच्या किंवा समाजाच्या सांस्कृतिक इतिहासाचे व्यवस्थात्मक संशोधन करून एक स्वच्छ आणि व्यापक आकलन पुढे आणणे ही भरीव शक्यता महत्त्वाची ठरते. उदा. ऐतिहासिक उत्खनने, शोध आणि तत्संबंधी संशोधन याला पाठिंबा देऊन विकास विषयक कार्यक्रम हाती घेतला, तर एखाद्या विशिष्ट संस्कृतीच्या आणि परंपरेच्या अंतर्गत असणाऱ्या भिन्नतेचा तसेच त्याचा व्याप समजावून घेण्याच्या दृष्टीने साहाय्य होते. जेव्हा असे घडते, तेव्हा ऐतिहासिक वास्तू, स्थळे, दस्तऐवज ह्यांच्या साहाय्याने आधुनिक राजकारणातील चकमकी वा झुंजी ह्यांचे समीकरण बदलणे शक्य होते. तीव्र राजकीय आणि बऱ्याचवेळा अनैतिहासिक अन्वयार्थापेक्षा वर्तमानाचा अर्थ लावताना इतिहास, संस्कृती आणि परंपरा ह्यांच्या साहाय्याने नवे अन्वयार्थ लावणे शक्य होते.

उदा. अरब इतिहासामध्ये आपल्याला असे दिसते की, ज्यू समाजाशी एक शांततामय नाते असणारी दीर्घ परंपरा सामावलेली दिसते. त्याचप्रमाणे इंडोनेशियाच्या भूतकाळात एकाच वेळी हिंदू, बौद्ध, कन्फ्युशिअस संस्कृती बहराला आल्या होत्या असे दिसते. त्यांच्याशी संलग्न इस्लामी परंपराही नांदत होत्या. अल्बेनियामधील बुटरिंट ह्या ऐतिहासिक स्थळामध्ये असे दिसते की, ग्रीक, रोमन आणि नंतरच्या काळातील ख्रिस्ती संस्कृती तसेच इस्लामी इतिहास हे सारे एकत्रितपणे उपस्थित होते. अशा तऱ्हेने भिन्न असे गतकाळातील पुरावे उत्खननाच्या आधारे ऐतिहासिक वास्तूंच्या आधारे, स्थळांच्या

आधारे दाखविता येतात. ह्यातून समकालीन परिस्थितीत दिसणारी विविधता सहिष्णूपणे स्वीकारण्याकडे माणसांना वळविता येते. एखाद्या देशाच्या भूतकाळाचा 'एकसत्त्वीकरण' करून सांस्कृतिक अर्थ जो लावला जातो त्याच्याशी होड घेण्यासाठी असा इतिहास महत्त्वाचा ठरतो.

अलिकडच्या काळातील उदाहरण द्यायचे तर, हिंदू कार्यकर्त्यांनी भारत देश हा फक्त हिंदू देश आहे असे मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या मते, इतर धर्म मानणारे जे गट आहेत त्यांना कनिष्ठ स्थान दिले पाहिजे. परंतु, असा विचार करणे हे भारतीय इतिहासाच्या महान विविधतेला छेद देणारे आहे. यामुळे हजारो वर्षे बुद्धधर्मीय वर्चस्व असणाऱ्या आणि तशी स्थळे असणाऱ्या धर्मावर अन्याय होतो. तसेच भारतामध्ये जैन संस्कृतीलाही एक दीर्घ इतिहास आहे, चौथ्या शतकापासून ख्रिस्ती धर्मही येथे लक्षात येण्यासारख्या पद्धतीने उपस्थित होता. तसेच आठव्या शतकापासून पारशी मंडळी येथे राहात होती आणि ह्याच काळात दक्षिण भारतात अरब व्यापारी म्हणून मुस्लिमांच्या वस्त्या स्थिर होऊन देशात हिंदू मुस्लीम देवाण-घेवाण प्रचंड स्वरूपात घडली. आपल्याला ह्याचे प्रत्यंतर चित्रकला, संगीत, साहित्य आणि शिल्पकलेत दिसते. शीख धर्माचा जन्म, त्याची वाढ एक नवाच भारतीय धर्म म्हणून एका टप्प्यावर झाली. ह्या साऱ्यांची स्मृती इतिहासाच्या स्मृतीत केली, तर सहिष्णुवृत्तीचे संगोपन आणि बहुविधतेचे स्वागत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाची भर प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे घातली जाईल. विकासाच्या दृष्टीने हे घटक महत्त्वाचे ठरतात.

७) सांस्कृतिक प्रभावामुळे मूल्यांची घडण आणि उत्क्रांती घडते

एखाद्या समाजामध्ये विकास घडण्यासाठी सांस्कृतिक घटक जसे महत्त्वाचे ठरतात, त्याप्रमाणे घडविली गेलेली मूल्ये हीसुद्धा त्याच्या गाभ्यापाशी असतात. विकासाची उद्दिष्टे गाठण्याच्या दृष्टीने अशी मूल्ये महत्त्वाचे काम बजावतात. उदा. सार्वजनिक पातळीवर खुली चर्चा घडविणे ही सुद्धा एक सांस्कृतिकदृष्ट्या लक्षणीय सिद्धी आहे. नवे रीतीरिवाज आणि नवे अग्रक्रम ठरविण्याच्या दृष्टीने ते प्रभावी असू शकतात.

खरोखरच मूल्य घडविणे ही प्रक्रिया परस्परांशी विचारविनिमय करूनच साध्य होते. एकमेकांशी संवादाची संस्कृती आणि दुसऱ्यांचे ऐकण्याची क्षमता ह्यातून एक नवाच परस्परांशी जोडलेला व्यवहार निर्माण होऊ शकतो. जेव्हा नवे मानदंड निर्माण होतात, तेव्हा त्याविषयी सार्वजनिक चर्चा करून त्या प्रदेशात नवे रीतीरिवाज रुजविणे शक्य होते. उदा.



लोकसंख्या नियंत्रित ठेवण्याचा रिवाज किंवा मुलगा आणि मुलगी ह्यांच्यामध्ये भेदभाव न करण्याची रीत किंवा आपल्या मुलांना शाळेत पाठविण्याची इच्छा, असे कितीतरी घटक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात. हे घडण्यासाठी मुक्त चर्चा आणि खुले सार्वजनिक वादविवाद कोणत्याही राजकीय अडसरांशिवाय आणि सामाजिक दडपणुकीशिवाय घडणे महत्त्वाचे ठरते.

**एकात्मता**

विकासामध्ये संस्कृतीची भूमिका पाहणे हे महत्त्वाचे ठरते कारण, असे करताना आपण संस्कृतीला पुरेशी क्षमता असणारी चौकट बहाल करतो. ह्याच्याच मागे असणारी कारणे समजून घेणे कठीण नाही. एक म्हणजे, संस्कृती जरी प्रभावी असली, तरी आपली आयुष्ये आणि अस्मिता निश्चित करण्याचे काम फक्त संस्कृतीच करत असते असे नाही. वर्ग, वंश, लिंगभाव, व्यवसाय आणि राजकारण हे सर्व सुद्धा संस्कृती इतकेच महत्त्वाचे ठरतात. किंबहुना ह्या इतर गोष्टींचा प्रभाव अधिक असू शकतो. आपली सांस्कृतिक अस्मिता आपल्या आत्मविष्काराच्या इतर अनेक घटकांपैकी एक असते. आपण काय करतो किंवा कसे करतो ह्यावर सांस्कृतिक अस्मितेचा प्रभाव असला, तरी तो मर्यादित असतो. इतकेच नाहीतर, आपण जसे वागतो ते फक्त आपल्या मूल्यानुसार आणि आपल्या मनात असणाऱ्या पूर्वकल्पनांनुसार वागत नाही आणि कठोर सत्य हे लक्षात घेतले पाहिजे की, आपल्या भोवती उचित अशा संस्था आहेत अथवा नाहीत आणि त्यामधून नैतिक प्रोत्साहन आपल्याला मिळते की नाही हे सारे महत्त्वाचे ठरते.

दुसरे असे की, संस्कृती हा एक एकसंध साचा नसतो. सर्वसाधारण संस्कृतीच्या अवकाशात बरीच विविधता असते. जे सांस्कृतिक नियतीवादी असतात ते बऱ्याचवेळा एका विशिष्ट संस्कृतीत असणाऱ्या विभिन्नतेचे प्रमाण लक्षात घेत नाहीत. बऱ्याच वेळा असमाधानी वा विसंवादी सूर त्या त्या संस्कृतीच्या चौकटीतच उद्‌भवलेले असतात. थोडक्यात संस्कृती ह्या गोष्टींचे इतके घटक असतात की, आपण नेमक्या कोणत्या घटकावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरवितो त्यावर हे अवलंबून असते. उदाहरणार्थ घ्यायचे तर, आपण धर्म किंवा साहित्य किंवा संगीत किंवा जीवनशैली असा एका भागावर लक्ष केंद्रित केले तर कदाचित संस्कृती एकसाची भासते.

तिसरा मुद्दा म्हणजे, संस्कृती ही कधीच अचल किंवा स्थिर नसते. संस्कृतीला स्थिर मानणे म्हणजेच आपली स्वतःची फसवणूक करून घेण्यासारखे आहे. उदाहरण घ्यायचे तर, हिंदू संस्कृती किंवा भारतीय संस्कृती असे म्हणून जर आपण एक स्थिर चित्र उभे करू लागलो तर आपण त्या कोटिक्रमांमध्ये असणाऱ्या विविधतांकडे दुर्लक्ष तर करतोच परंतु ह्या चौकटीमध्ये काळाच्या ओघात झालेली उत्क्रांती किंवा फार मोठे बदल दृष्टीआड करतो. म्हणजेच एखाद्या गतिशील जहाजामध्ये संस्कृतीचा नांगर घालून थांबविण्याचा प्रयत्न सांस्कृतिक नियतीवादी करत असतात.

शेवटी भिन्न संस्कृती एकमेकींवर प्रभाव टाकत असतात आणि म्हणूनच कोणत्याही एका संस्कृतीकडे एखादे कवच घालून स्थिर राहिलेली म्हणून पाहता येत नाही. काही वेळा आपल्याला बाहेरून येणारा परिणाम फारसा जाणवत नाही. परंतु, म्हणून तो महत्त्वाचा नसतो असे नाही. उदाहरण घ्यायचे तर, १६ व्या शतकात पोर्तुगीजांनी भारतामध्ये मिरची आणेपर्यंत भारतीयांना मिरची म्हणजे काय ते माहीत नव्हते. परंतु आता खास भारतीय मसाल्याचा अविभाज्य भाग म्हणून मिरची दिसते.

थोडक्यात सांगायचे तर, संस्कृतीला स्वतंत्र, अपरिवर्तनीय मानणे समस्यात्मकच आहे. परंतु, असे असले तरी संस्कृतीचे महत्त्व एका पुरेशा व्यापक परिप्रेक्ष्यामध्ये पाहणे तितकेच महत्त्वाचे आहे.

धर्मांधता आणि परात्मता

संस्कृतीचे महत्त्व जाणूनही कोणती पथ्ये पाळायची ह्याचा विचार गांभीर्याने केला पाहिजे. कारण, बंडखोर पद्धतीने संस्कृती विषयक सर्वसाधारण समज करून घेतले, तर संस्कृती नेमके कोणते कार्य करते ह्या विषयीचे खोल आकलन होणे कठीण होऊन बसते. इतकेच नाही तर, जहाल पद्धतीने संस्कृतीचा विचार केल्यामुळे एखाद्या पंथाविषयी दुराभिमान, अपसमज, सामाजिक भेदभाव आणि अगदी राजकीय क्रौर्यसुद्धा फोफावते. अनेकदा सरळ साधेपणाने संस्कृतीविषयक समज करून घेतले तर, त्यातून आपली विचारशक्ती कुंठीत होते. जनसामान्यांमध्ये आणि सर्वसाधारण अनौपचारिक गप्पांमध्ये असे झालेले आपल्याला दिसते. आपण जर आपल्या अशा अपसमजांची नीट परीक्षा केली नाही तर, केवळ वंशवादी विनोद आणि वांशिक अपशब्द अभिव्यक्त होतात इतकेच नाही तर काही वेळा ह्यातून अतिशय घातक अशा महान सिद्धांतांना खतपाणी घातले जाते. जेव्हा सांस्कृतिक पूर्वग्रह आणि सामाजिक निरीक्षण ह्यांच्यातील परस्परसंबंध अपघाताने निर्माण होतो, तेव्हा असे सिद्धांतन जन्माला येते. आणि असे सिद्धांतन अपघाती परिस्थिती संपली तरीसुद्धा संपत नाही.

उदा. आयरिश मंडळींच्या विरोधात तयार केलेले विनोद इंग्लंडमध्ये कितीतरी काळ वापरले जात होते. जेव्हा आयरिश अर्थव्यवस्था दुबळी होती, त्या काळात असे विनोद चपखल वाटत असत. परंतु, जेव्हा आयरिश अर्थव्यवस्था झपाट्याने प्रगती करू लागली – खरेतर कोणत्याही युरोपीय अर्थव्यवस्थेपेक्षा ती अधिक गतीने भरभराटीला आली तेव्हा सुद्धा आयरिश मंडळींवरील विनोद कचऱ्याच्या टोपलीत टाकले गेले नाहीत. थोडक्यात, अशी सिद्धांतने अनेकदा उद्धटपणे चालूच ठेवली जातात.

प्रत्यक्षात आपल्या लक्षात येते की, सांस्कृतिक पूर्वग्रहांनी आयर्लंडला ब्रिटिश सरकारने कसे वागविले ह्या संदर्भात भूमिका बजावलेली दिसते. आणि ह्याचा परिणाम म्हणून १८४० साली जेव्हा अभूतपूर्व अशा दुष्काळामध्ये भरपूर माणसे मेली, तेव्हा त्याबाबत ब्रिटिश सरकारने काहीच केले नाही. जोएल मॉकीर (१९८३) ह्या अभ्यासकाने आयरिश समस्यांसंदर्भात लंडनने दाखविलेली सांस्कृतिक परात्मता मांडली. लेबाऊ ह्याचे तर मत असे आहे की, ब्रिटनमधील दारिद्र्याची चर्चा करताना आर्थिक बदल आणि चढउतार ह्याची चर्चा केली गेली परंतु त्याच इंग्लंडमध्ये आयरिश दारिद्र्याकडे पाहताना मात्र आयरिश मंडळींचा आळशीपणा, दुर्लक्ष आणि मठ्ठपणा असे सारे चर्चिले गेले. त्यामुळे ब्रिटनने आयरिश मंडळींना दलदलीतून वर आणावे असा विचार केला गेला नाही.

१५९० साली स्पेन्सरने लिहिलेली फेअरीक्विन ही संहिता पाहिली, तर आयरिश दुष्काळाची सांस्कृतिक पाळेमुळे किती



दूरवर पसरली होती हे लक्षात येते. १५९० साली लिहिलेल्या ह्या संहितेत बळी जाणाऱ्यांनाच दोष देणे स्पष्टपणे दिसते आणि १८४० च्या दुष्काळातही ते तसेच चालू राहिलेले दिसते. चार्ल्स एडवर्ड ट्रव्हीलीयन हा दुष्काळाच्या काळातील सर्व सरकारी तिजोरी किंवा खजिना किंवा साठा सांभाळणारा असा होता. त्याचा पूर्वग्रह असा होता, की आयर्लंडसाठी जेवढे शक्य होते तेवढे सर्व ब्रिटनने केले. इतकेच नाहीतर आयर्लंडमधील भुकेचे सांस्कृतिक स्पष्टीकरणसुद्धा ट्रव्हीलीयनने असे दिले, 'आयर्लंडच्या पश्चिम भागामध्ये शेतकरी वर्गातील एकही स्त्री अशी नव्हती की, तिचे पाकशास्त्र बटाटे उकडण्यापलिकडे गेले होते.

म्हणजेच सांस्कृतिक अंधळेपणा अथवा दिवाळखोरी आणि राजकीय अत्याचार हे एकमेकांच्या निकटच असतात. राज्यकर्ता वर्ग आणि प्रजा ह्या दोहोंमध्ये असणारी सत्तेची विषमता जेव्हा सांस्कृतिक पूर्वग्रहामध्ये मिसळते, तेव्हा एकूण राज्ययंत्रणाही अपयशी ठरते. १८४० मधील आयरिश दुष्काळाबद्दल असेच म्हणता येईल. अशाच पद्धतीचा सांस्कृतिक पूर्वग्रह बाळगून राजकीय बेजबाबदारपणा केलेला दिसतो तो युरोपीय साम्राज्यांच्या इतिहासामध्ये आशिया आणि आफ्रिका या खंडांविषयी. १९४३ सालच्या बंगालमधील दुष्काळाविषयी विन्स्टन चर्चिलने असे विधान केले होते की, 'उंदराप्रमाणे वीण असणारे बंगालमधील लोक स्वतःला वसाहतवादाचे बळी म्हणवून घेतात.' अशा उपहासात्मक विधानामुळे ह्या भयानक दुष्काळात दुष्काळ निवारणाचे प्रयत्नही तत्परतेने झाले नाहीत. बळी गेलेल्यांची अशी चिकित्सा करणे आणि त्याचा वापर राज्यकर्त्यांनी आपल्या ढिसाळ आणि विषम वागणूक देणाऱ्या अत्याचारी राजवटीच्या समर्थनार्थ करणे, असे सारे घडते.

सांस्कृतिक नियतवाद

सांस्कृतिक पूर्वग्रह आणि राजकीय विषमता ह्यांची संलग्न युती विषारी असू शकते हे खरे असले, तरीसुद्धा आपण लक्षात घेतले पाहिजे की, ज्या तऱ्हेने सांस्कृतिक निष्कर्ष काढले जातात त्यातील धोका लक्षात घेणे अधिक महत्त्वाचे आहे. कारण असे सांस्कृतिक निष्कर्ष अगदी तज्ज्ञांच्या आर्थिक विकासाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनावरही परिणाम घडवू शकतात. बऱ्याच वेळा सिद्धांतने मांडली जातात ती अत्यंत तुरळक पुराव्यांच्या आधारे. अर्धसत्य किंवा पाव सत्य हे दिशाभूल करणारे असते. सरळसरळ खोटेपणा आपल्याला उघडकीस आणता येतो परंतु अर्धसत्याचे तसे नसते.

येथे उदाहरण म्हणून हन्टींग्टन ह्यांच्या 'कल्चर मॅटर्स' ह्या खंडातील परिचयात्मक निबंधाकडे पाहता येते. संस्कृती महत्त्वाच्या असतात असे मांडताना हन्टींग्टन लिहितो, '१९९० च्या अगदी सुरुवातीला मी अचानक घाणा आणि दक्षिण कोरिया या दोहोंमधील १९६० च्या सुरुवातीची आर्थिक आकडेवारी पाहिली आणि मला धक्का बसला की, ह्या दोहोंच्या अर्थव्यवस्था त्या काळात किती सारख्या होत्या... ३० वर्षांनंतर दक्षिण कोरिया जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थेच्या रांगेत १४ व्या क्रमांकावर आले. बहुराष्ट्रीय कार्पोरेशन्स, मोटर गाड्यांच्या निर्याती, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि इतर प्रगत तंत्र वैज्ञानिक उत्पादने तसेच माणशी अर्थार्जन जवळ जवळ ग्रीस इकतेच. इतकेच नाही तर दक्षिण कोरिया लोकशाही संस्थांचे संघटनही करण्याच्या मार्गावर होते. असे कोणतेही बदल घाणामध्ये झाले नाहीत. घाणाचे माणशी उत्पन्न दक्षिण कोरियापेक्षा एक पंधरांश होते. ह्या दोन देशांमधील इतकी अद्वितीय भिन्नता कशी समजून घ्यायची? अनेक घटकांनी हे घडविले असले तरी निःसंशयपणे मला असे दिसते की, संस्कृती ह्या गोष्टीने येथे मोठी कामगिरी बजावली. दक्षिण कोरियातील लोक काळजीपूर्वक खर्च करणारे आणि गुंतवणूक करणारे, कष्टाळू, शिकलेले, संघटित झालेले आणि शिस्तशीर आहेत. घाणामधील मंडळी मात्र भिन्न मूल्यांवर विश्वास ठेवतात. थोडक्यात, संस्कृती महत्त्वाच्या असता' (हॅरीसन आणि हन्टींग्टन २०००, xiii)

अगदी सहजपणे सांगितलेली ही कथा मोठ्या प्रमाणात फसवी आहे. ह्या दोहोंमध्ये अनेक फरक होते. केवळ सांस्कृतिक घडण एवढाच मुद्दा त्या दोहोंमध्ये नव्हता. हन्टींग्टनला जेव्हा १९६० च्या दशकात घाणा आणि कोरिया ह्यांच्यामध्ये संस्कृती

वजा करता साम्य भासले, तेव्हा खरेतर ह्या दोन देशांमधली वर्गीय संरचना बऱ्यापैकी भिन्न होत्या. दक्षिण कोरियामध्ये त्या काळात मोठा बिझनेस क्लास कार्यरत होता. दुसरे म्हणजे, ह्या दोहोंमधील राजकारण सुद्धा अत्यंत भिन्न होते. दक्षिण कोरियातील सरकार बिझनेसकेंद्री आर्थिक विकास साधण्यास उत्सुक होते तसे घाणामध्ये नव्हते. तिसरा फरक म्हणजे, कोरियातील अर्थव्यवस्था जपानमधील अर्थव्यवस्थेशी जुळलेली होती आणि त्याचवेळी अमेरिकेशीही जुळलेली होती. ह्यामुळे कोरियातील विकास सुरुवातीच्या टप्प्याला गतिशील झाला. चौथी आणि कदाचित सर्वांत महत्त्वाची भिन्नता म्हणजे, १९६० च्या दशकात दक्षिण कोरियामध्ये साक्षरतेचे प्रमाण खूपच जास्त होते आणि शैक्षणिक व्यवस्थाही घाणापेक्षा अधिक विस्तारित होती. दुसऱ्या महायुद्दोत्तर काळामध्ये कोरियामध्ये जे बदल झाले ते बऱ्याच प्रमाणात ठाम स्वरूपाच्या सार्वजनिक धोरणांमुळे झाले आणि ह्या बदलांकडे फक्त प्राचीन कोरियन संस्कृतीचे प्रतिबिंब म्हणून पाहाणे चूक ठरेल.

म्हणूनच कोरियातील संस्कृतीचा उदोउदो करणे किंवा घाणाचे भविष्य निराशेने ग्रासलेले आहे असे मांडणे घातक आहे. दक्षिण कोरियाने फक्त आपल्या पारंपरिक संस्कृतीवर विसंबण्याचे टाळले हे सत्य आहे. १९४० नंतरच्या काळात दक्षिण कोरियाने जाणीवपूर्वक रीतीने बाहेरच्या जगातील घडामोडींकडे लक्ष देऊन आपल्या मागास शालेय शिक्षणामध्ये प्रगती करण्याचे सार्वजनिक धोरण अवलंबिले.

अगदी आजही दक्षिण कोरिय जागतिक अनुभवापासून शिकत आहे. काही वेळा हे शिकणे त्यांना जे अपयशाचे अनुभव आले त्यातून घडले. जेव्हा दक्षिण कोरियाने इतर प्रदेशांप्रमाणेच पूर्व आशियायी कोंडीचा अनुभव घेतला, तेव्हा पूर्णपणे लोकशाही व्यवस्था न राबवण्याची किंमतही दिली. लोकशाहीमुळे दडपलेल्यांना जो आवाज प्राप्त होतो तसा आवाज हुकूमशाही राजवटीत मिळत नाही. आर्थिक कोंडीचेसुद्धा






*महिला बचत गटांमार्फत*
*वेगवेगळ्या वस्तू बनविणाऱ्या महिला*

एक राजकारण असते. दक्षिण कोरिया, इंडोनेशिया, थायलँड आणि इतर, ह्या देशांनी अशी कोंडी अनुभवली परंतु ह्यातून एक जागतिक पातळीवर धडाही दिला गेला तो असा कसा की, लोकशाही असेल तर आपत्काळात बळी गेलेल्यांना मदत करता येते. म्हणजेच 'वाढ' आणि 'समभाग' ह्या विषयीही विचार न करता घसरण झाली असता सुरक्षितता कशी मिळवायची या विषयीही विचार करणे भाग पडले.

इतकेच नाही तर, घाणा आणि इतर आफ्रिकेतील देश विकासाच्या दृष्टीने आवश्यक ती संस्कृती नसल्यामुळे अपयशी ठरणार, असे निराशाजनक चित्र रंगविण्यातही अर्थ नाही. एकतर हे लक्षात घेतले पाहिजे की, दक्षिण आफ्रिकेसारखे देश झपाट्याने बदलले कारण त्यांचे सांस्कृतिक मापदंड कधीही घट्ट स्थिर स्वरूपाचे राहिले नाहीत. म्हणजेच चुकीच्या दिशेने जाणारी अर्धसत्ये ही भयानकपणे दिशाभूल करणारी असतात.

अर्थात, आर्थिक विकासाचे स्पष्टीकरण देताना सांस्कृतिक नियतवादाचा आधार यापूर्वीही घेतला गेला आहे. खरोखरच १०० वर्षांपूर्वी मॅक्स वेबर (१९३०) ह्या महान समाजशास्त्रज्ञाने एक प्रमुख सिद्धान्तन मांडून प्रोटेस्टंट नीतिमत्तेच्या निर्णयात्मक भूमिकेमुळे भांडवली औद्योगिक अर्थव्यवस्था विकसित झाली असे मांडले होते. वेबरवादी विश्लेषणातून भांडवलशाहीच्या उदयामध्ये संस्कृतीची जी भूमिका मांडली होती ती १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात त्याने केलेल्या निरीक्षणावर आधारित होती. आता विशेषतः समकालीन जगामध्ये जेव्हा आपण पाहतो की, प्रोटेस्टंट नसणाऱ्या आणि ख्रिश्चनही नसणाऱ्या देशांमध्ये बाजारपेठी अर्थव्यवस्था यशस्वी झाल्या आहेत तेव्हा, असे विश्लेषण द्वंद्वात्मकदृष्ट्या अधिकच गमतीचे वाटते.

मॅक्स वेबरला विशेषतः असे निश्चित म्हणायचे होते की, चैतन्यशाली औद्योगिक अर्थव्यवस्था आणि कन्फ्युशियन वाद हे परस्पर विसंगत आहेत. अँथनी गिडन्सने वेबरविषयी थोडक्यात मांडताना हेच अधोरेखित करून असे मांडले की, 'कन्फ्युशियन मूल्य विवेकवादी साधनात्मकतेच्या पोषणाला हातभार लावत नाहीत.' ह्याच्या अगदी विरोधात अलीकडच्या काळातील आशियाबद्दल अनेक लेखक असा दावा करतात, की कन्फ्युशियन नीतिमत्ता औद्योगिक आणि आर्थिक यशाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाची ठरते. ह्याचे उदाहरण म्हणून पूर्व आशियामधील घडामोडी पाहिल्या जातात. मिचिओ मोरिशीमा ह्या महान अर्थशास्त्रज्ञाने जपानी जीवनपद्धतीची मुळे शोधताना जपानच्या सरंजामी व्यवस्थेच्या विशेष इतिहासाला महत्व दिले आहे. रोनाल्ड डोअर ह्या महान समाजशास्त्रज्ञानेसुद्धा कन्फ्युशियन नीतिमत्तेच्या गुणवत्तेला महत्त्व दिले. आईको इकेगामी हा अतिशय हुशार तरुण जपानी इतिहासज्ञ सामुराई चौकटीतील प्रतिष्ठा वा इज्जत ह्या संदर्भातील संकेतांवर भर देतो.

या सर्व सिद्धान्तनापासून आपल्याला शिकण्यासारखे बरेच आहे आणि हे सैद्धांतिक ज्या प्रकारे प्रत्यक्ष अनुभवांशी आपल्या सिद्धांतनांची सांगड घालतात, त्यामध्ये एकतऱ्हेची आंतर्दृष्टीसुद्धा दिसते. तरीही लक्षात येते की, सांस्कृतिक स्पष्टीकरणे देताना, विशिष्ट घटकांवर भर देताना भूतकाळाची निरीक्षणे मांडली जातात, ती मात्र बऱ्याच वेला नंतरच्या अनुभवाच्या प्रकाशात गडबडलेली दिसतात. खरोखरच सांस्कृतिक नियतवादाचे सिद्धांतन हे प्रत्यक्ष वा खऱ्या जगाच्या एक पाऊल मागेच असतात. मॅक्स वेबरने जेव्हा १९ व्या शतकाच्या अनुभवावर आधारित प्रोटेस्टंट नितीमत्तेला वर उचलून धरले आणि त्याच्या सिद्धांताला मोठ्या प्रमाणात महत्त्व प्राप्त झाले, त्या काळातच फ्रान्स आणि इटलीसारख्या कितीतरी कॅथेलिक देशांची वाढ प्रोटेस्टंट ब्रिटन किंवा जर्मनी ह्यांच्यापेक्षा अधिक गतीने पुढे जात होती. अशा तऱ्हेने मग हे सिद्धांतन बदलावे लागले आणि मग हितकारी संस्कृती सर्वसाधारणतः ख्रिश्चन आणि पाश्चात्य ह्या शब्दातून मांडावी लागली.

इतकेच नाही तर, विकासासंदर्भात संस्कृती विषयक युरोकेंद्रित दृष्टिकोन प्रस्थापित झाला, तोपर्यंत पाश्चिमात्य देशांपेक्षा जपान कितीतरी अधिक गतीने वाढला आणि मग जपानी जीवनशैली सामुराई संस्कृती ह्याच्या विषयी बोलायला लागेल. त्या नंतरच्या काळात जपानचे विशिष्टत्व समजून घेता घेताच पूर्व आशियाची अर्थव्यवस्था गतीने वाढल्या आणि मग हे सिद्धांतन व्यापक करून 'आशियायी मूल्यां'बद्दल सिद्धान्त मांडणि भाग पडले. कन्फ्युशियन सिद्धांत प्रस्थापित झाला तेव्हा थायलँडची अर्थव्यवस्था सर्वात अधिक गतीशील होती आणि थायलँड हा बुद्धधर्मीय देश होता. खरोखरच जपान, कोरिया, चीन आणि तैवान ह्या साऱ्यांवर संस्कृतीच्या दृष्टीने बुद्ध धर्माचा प्रभाव दिसतो. भव्य सांस्कृतिक सिद्धांतने ही नेहमीच व्यवहारात भूतकाळात रेंगाळताना दिसतात. त्यांना भविष्य कथनाची भूमिका घेता येत नाही.

असे सर्व विशेष अभ्यास आपल्याला सांस्कृतिक दुवे समजून घेण्याच्या दृष्टीने साहाय्य करतात. परंतु संस्कृतीला स्थिर, स्वतंत्र आणि एकमेव अद्वितीय मानून फक्त विकासाचा

स्रोत म्हणून तेवढेच लक्षात घेणे चुकीचे ठरते.

परस्परावलंबन आणि शिकणे

येथे मला पुन्हा एकदा दक्षिण कोरियाचा संदर्भ घ्यावासा वाटतो. अगदी १९६० च्या दशकात दक्षिण कोरिया हा देश एक समाज ह्या दृष्टीने घाणापेक्षा कितीतरी अधिक साक्षर आणि अधिक शिक्षित होता. ह्या दोन देशांमधलील फरक व साम्य पाहताना दक्षिम कोरियातील सार्वजनिक धोरणे दुसऱ्या महायुद्धाच्या नंतरच्या काळात ज्या प्रकारे अवलंबिली गेली तो मुद्दा महत्त्वाचा ठरतो.

एकीकडे असे दिसते की, ह्या शिक्षणाविषयक सार्वजनिक धोरणांवर सांस्कृतिक घटकांचा परिणाम होता हे खरे आहे. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, जेथे जेथे बुद्धधर्मीय परंपरा प्रभावी स्वरूपात अस्तित्वात आहे त्या सर्व देशांमध्ये शैक्षणिक उपक्रम आणि साक्षरता ह्याला सामान्य जनांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. जपान, कोरिया, चीन, थायलँड आणि श्रीलंका ह्या सर्व देशांमध्ये असे चित्र दिसते. अगदी दैन्यावस्थेतील बर्मामध्येसुद्धा इतकी राजकीय दडपणूक आणि सामाजिक उपेक्षा असतानाही साक्षरतेचे प्रमाण आपल्या शेजारच्या उपखंडापेक्षा जास्त दिसते. एका व्यापक चौकटीत ह्याकडे पाहिले तर कदाचित येथे काहीतरी तपासून पाहाण्यासारखे आणि शिकण्यासारखे दिसते.

तरीसुद्धा ह्या प्रक्रियेचे परस्परांकडून देणे-घेणे करुन पुढे जाण्याचे स्वरुप लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते. आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जेव्हा कोरियाने शालेय शिक्षणाचे प्रकल्प जोरकसपणे हाती घेतले तेव्हा, त्यांच्यावर फक्त सांस्कृतिक प्रभाव नव्हता तर, जपान, पाश्चिमात्य जग आणि अमेरिका ह्यांच्या अनुभवांमुळे त्यांना शिक्षणाची भूमिका आणि महत्त्व ह्या विषयी नवे आकलन झाले होते.

अशीच काहीशी कहाणी जपानच्या शैक्षणिक विकासाची दिसते. १७ व्या शतकाच्या सुरूवातीला टोकूगावा राजवटीच्या अंतर्गत जपान जेव्हा जगापासून तुटलेल्या अवस्थेतून बाहेर आला तेव्हा, जपानमध्ये एक चांगल्या प्रकारे विकसीत झालेली शैक्षणिक व्यवस्था होती. खरोखरच १८६८ मध्ये जपानमध्ये युरोपापेक्षा साक्षरतेचा दर अधिक होता. ह्या काळात जपान आर्थिकदृष्ट्या बऱ्यापैकी अविकसीत होता, असे असले तरी औद्योगिकीकरण घडलेल्या पाश्चिमात्य जगातील ज्ञान आणि शिक्षण ह्याच्याशी जपानी शिक्षण व्यवस्थेचा सांधा जुळलेला नव्हता. १८५२ मध्ये जेव्हा काळा धूर ओकणारे वाफेचे जहाज पाहिले जेव्हा, चपानी मंडळी नुसती चकीतच झाली नाही तर काही प्रमाणात भयभीतही झाली. ह्या सर्व प्रक्रियेत अमेरिकेशी राजकीय आणि व्यापारविषयक संबंध स्विकारून जपानला आपले जगापासून अलिप्त असणारे अस्तित्व तपासावे लागले.

१९०६ ते १९११ ह्या काळामध्ये संपूर्ण जपानमध्ये ४३% बजेट हे शिक्षणासाठी होते. १९०६ साली सैन्यात भरती होणारे सर्व अधिकारी साक्षर होते. १९१० च्या सुमाराला जपानमध्ये प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक केले गेले होते. १९१३ साली जेव्हा जपान हा देश अजूनही गरीब आणि अविसकीत होता. परंतु, तो देश आता जगामध्ये अधिक पुस्तके प्रसिद्ध करणारा ठरला.

जपानची ही कहाणी आणखी पुढे नेताना असे लक्षात येते की, जपान जवळचा देश फक्त शिकत नव्हता तर तो इतरांना शिकवतही होता. पूर्व आणि दक्षिणपूर्व आशियाच्या विकासावर ह्यांचा चांगला परिणाम दिसतो. विकास घडविताना कशाप्रकारचे सांस्कृतिक आणि आर्थिक शहाणपण आत्मसात करावे ह्याचे धडे जपानमुळे मिळतात. भारतासारखा देश आज तंत्रज्ञान आणि आर्थिकदृष्ट्या त्या काळातील जपानपेक्षा अधिक प्रगतीशील दिसला तरी भारताने ज्याप्रकारे पायाभूत शिक्षणाची चिकित्सक भूमिका दुर्लक्षित केली आहे त्याची किंमत आपण सर्वजण देत आहोत. मैझी काळातील जपानकडून आपण शिकले पाहिजे.

**सांस्कृतिक जागतिकीकरण**

मी आता एका विसंगत मुद्याकडे वळणार आहे. म्हणजे, जेव्हा जागतिक व्यवहार सुरु होतात तेव्हा, स्थानिक संस्कृतीची एकात्मता आणि खरेतर अस्तित्वसुद्धा धोक्यात येते. अशावेळी पाश्चिमात्य महानगरीय सांस्कृतिक साम्राज्यवादाचे वर्चस्व वाढते. अशा परिस्थितीत असे मांडले जाईल की, जागतिक प्रभावाचे स्वागत करण्यापेक्षा त्या प्रभावाला बळकटपणे विरोध करणे आवश्यक असते.

सर्वप्रथम मला हे सांगितले पाहिजे की, माझ्या मांडणीमध्ये आंतरविरोध नाही. आपण जेव्हा दुसऱ्यांकडून काही शिकतो तेव्हा, त्या शिकण्यात एक तऱ्हेचे स्वातंत्र्य असते आणि परिस्थितीचा अंदाज घेण्याची क्षमताही असते. आपण निवड करूनच बाह्य जगातील प्रभावाला तोंड द्यायचे असते. वर्चस्वात्मक बाजारपेठी शक्ती जी समृद्ध पाश्चिमात्य जगापाशी असते त्याने आपण गुदमरून जाण्याची शक्यता असते. परंतु जवळजवळ सर्व माध्यमांवर ह्याचा असमान

प्रभाव दिसतो, त्यातून नवाच प्रश्न उबा राहतो. खरेतर इतरांकडून शिकण्याचे महत्त्व हा मुद्दा ह्या परिस्थितीत अजिबात विसंगत ठरत नाही.

जागतिक सांस्कृतिक हल्ल्याकडे आपण कसे पहावे ? ह्या संदर्भात दोन मुद्दे महत्त्वाचे ठरतात. पहिला मुद्दा, सर्वसाधारण बाजारपेटी संस्कृतीचे स्वरूप ह्याच्याशी निगडीत आहे. ही संस्कृती आर्थिक जागतिकीकरणाचाच भाग असते. अनेकांना बाजारपेठेशी जोडलेली संस्कृती असभ्या आणि दरिद्री वाटते, म्हणून ते आर्थिक जागतिकीकरणाला विरोध करतात. दुसरा प्रश्न येतो तो म्हणजे, पाश्चिमात्य जग आणि इतर देश ह्यांच्यामध्ये असणारी सत्ते संदर्भात असमानता आणि ह्या असमानतेमुळे पाश्चिमात्य नसणाऱ्या समाजांमध्ये सांस्कृतिक कंगालीकरण येण्याचा धोका. पाश्चिमात्य जगातून जेव्हा एम.टी.व्ही. किंवा केंटकी चिकन येते तेव्हा, स्थानिक परंपरांना जो धोका जाणवतो तो खराच असतो.

जागतिक होणाऱ्या विश्वामध्ये आज प्राचीन देशी संस्कृतींवर घाला घातला जाणे अपरिहार्य दिसते. आपण व्यापार आणि वाणिज्य ह्यांचे जागतिकीकरण थांबवून हा प्रश्न सोडवू शकत नाही. कारण आर्थिक विनीमय आणि श्रमविभाग ह्या शक्तींना थांबविणे कठीण असते. अथा४त, जागतिकीकरणामधून येणारा न्याय वाटपाचा मुद्दा महत्त्वाचा आहे. जागतिक व्यापार आणि वाणिज्य ह्यामुळे येणारी आर्थिक समृद्धी प्रत्येक देशाला आवश्यक वाटते. परंतु, जर आपल्याला समभाग स्वरुपात जागतिकीकरणाचे फायदे पाहिजे असतील तर, मात्र ते एक आव्हानात्मक कृत्य आहे. हा फक्त आर्थिक प्रश्न नसून सांस्कृतिक क्षेत्राशीही निगडीत असा प्रश्न आहे. आपण आपले खरे पर्याय कशा तऱ्हेने वाढविणार आहोत किंवा आपल्या देशातील लोकांची स्वतांत्र्ये भरीव स्वरुपात कशी गतीशील करणार आहोत हा प्रश्न महत्त्वाचा आहे. ज्या सांस्कृतिक परंपरा लोकांना जतन कराव्याशा वाटतात त्यांना पाठिंबा देऊन लोकांच्या जीवनात मोठे बदल घडवणाऱ्या विकासाची वाटचाल कशी करायची हा प्रश्न महत्त्वाचा वाटतो. असमानता ही समस्या सोडविताना नैसर्गिक प्रतिसाद म्हणून स्थानिक संस्कृतिमधून ज्या संधी निर्माण होतात त्यांना बळकटी देणे महत्त्वाचे ठरते. जर पाश्चिमात्य वा परदेशी आयात होणाऱ्या गोष्टींचा हल्ला थांबवायचा तर, परदेशी वस्तूंना जो माध्यमांच्या संदर्भात नियंत्रणाचा आवाका असतो तसे नियंत्रण स्थानिक संस्कृतीच्या आविष्काराने मिळाले पाहिजे. परदेशी मालाल बंदी करण्यापेक्षा हा प्रतिसाद सकारात्मक आहे. शेवटी ह्या बाबत विचार करताना लोकशाही हे मूल्य निर्णायक ठरते. समाजामध्ये लोकांना सहभाग देऊन निर्णय घेण्यासाठी खुली चर्चा आणि अल्प संख्यांकांना आपल्या भूमिका अभिव्यक्त करण्याची पुरेशी संधी दिली गेली पाहिजे. आपण एकाचवेळी लोकशाही हवी असे म्हणताना सर्व विदेशी गोष्टींवर बहिष्कार घालू शकत नाही. एकीकडे परदेशी घाल्यापासून स्थानिक संस्कृती वाचवायची तर, आपला समाज लोकशाहीवादीच असला पाहिजे. कोणतेही बाहेरचे सांस्कृतिक प्रभाव बंदी घालून थांबविले की आपण लोकशाही व स्वातंत्र्य ह्यावर घाला घालतो.

ह्या प्रश्नाशी निगडीत असा एक सूक्ष्म प्रश्न आहे, त्या प्रश्नाला उत्तर शोधताना आपण पाश्चिमात्य संस्कृतीच्या बॉम्ब गोळ्याच्या भीतीपलिकडे जाऊन विचार करू शकतो. अकील बिलग्रामी (१९९५) यांनी 'मुस्लिम म्हणजे काय' ह्या आपल्या निबंधात पाश्चिमात्य लोकांपेक्षा मुस्लिम अस्मिता मूलतः भिन्न असते असे मांडले. अशा तऱ्हेची स्वतःची व्याख्या करून सांस्कृतिक किंवा राजकीय राष्ट्रवाद आणि धार्मिक आग्रहीकरण तसेच अगदी मूलतत्त्ववादही वाढलेला दिसतो. परंतु, वरवर पाहता पाश्चिमात्यांना विरोध करणारी ही भूमिका खोलवर परदेशी चौकटीवर नकारात्म स्वरूपात अवलंबून असेत. एकदा आपण स्वतःला दुसऱ्यापेक्षा भिन्न मानले की, आपल्यातील मुक्त आणि सर्जनशील कर्तेपणावर आपण अन्याय करतो. ह्या समस्येला उत्तर म्हणून आपल्याला सार्वजनिक चर्चा स्पष्ट स्वरुपात करता आल्या पाहिजेत.

आणखी एक महत्त्वाचा मुद्दा ज्याची मी चर्चा अजूनही केली नाही तो म्हणजे प्रत्येक देशाने वा समुहाने आपल्या आपल्या संस्कृतीशी एकनिष्ठ राहाणे असे वाटणे हे मत जर स्विकारले तर, आपण फक्त मॅक्डोनाल्ड आणि सौंदर्य स्पर्धा नाकारत नाही तर शेक्सपिअर, बॅलेनृत्य किंवा अगदी क्रिकेट मॅचसुद्धा नाकारतो. रविंद्रनाथ टागोर ह्यांनी असे म्हटले आहे, 'जे जे मानवी निर्माण म्हणून आपल्याला समजते आणि भावते ते तात्काळ आपले होऊन जाते. मग त्यांचे मूलस्थान कोठेही असो, मला माझ्या मानवतेबद्दल अभिमान वाटतो. कारम, माझ्या स्वतःच्या देशाप्रमाणेच इतर देशातील कवी आणि कलावंत ह्यांचे आविष्कार मला आपले वाटतात. ' आपण मुळात कुठूनही आलेले असू जे आपल्याला आवडते आणि ज्याची आपल्याला आकांक्षा असते त्यापासून आपण वंचित राहता कामा नये. शेवटी संस्कृती ही फक्त भूगोल वा भूप्रदेश नसते.

■■

महाराष्ट्राचा सुवर्ण महोत्सव



■ डॉ. दि. मा. मोरे

# महाराष्ट्रातील सिंचन

महाराष्ट्राला सिंचनाची गौरवशाली परंपरा लाभलेली आहे. तापी खोऱ्यात धुळे आणि नाशिक जिल्हयातील पांजरा, गिरणा, मौसम इ. तापीच्या उपनद्यावर दगडी बंधारे बांधून नदीतील वाहणारे पाणी काठावरच्या जमिनीवर कालव्याद्वारे वळवून लाभधारकांनी एकत्रित येऊन समिती स्थापन करून त्याद्वारे सिंचन करण्याची परंपरा मौर्य राजवटीच्या कालखंडापासून राबविलेली आहे. या मजबूत अशा दगडी बंधाऱ्याद्वारे उताराच्या दिशेने कालव्यातून पाणी वळवून केल्या जाणाऱ्या सिंचन पद्धतीला फड पद्धतीचे सिंचन असे म्हटले जात असे. या नद्या पाझरणाऱ्या खडकातून उगम पावलेल्या असल्याने वर्षातील बराचसा काळ नद्यांमध्ये पाणी वाहत असे. या लोकप्रणीत सिंचन व्यवस्था कालव्याखाली येणाऱ्या क्षेत्राला समन्यायी पद्धतीने पाणी वाटप करत असत. लाभ क्षेत्रातील प्रत्येक शेतकऱ्याला चार वर्षातून एका वर्षी उसासारखे बारमाही पीक घेत येत असे तर एका वर्षी पर्जन्यआधारित शेती करावी लागत असे. ही सामुदायिक सिंचनप्रणाली लाभाचे आणि पाण्याच्या चणचणीचे सर्व उपभोकर्त्यामध्ये समन्यायी पद्धतीने वाटप करणारी होती. श्रीमंती वाटून घ्यायची आणि गरीबीही वाटून घ्यायची हा या सिंचन व्यवस्थेतील, सामाजिक न्यायाचा गाभा होता. आज सुद्धा या भागात फड पद्धतीने सिंचन करणारी व्यवस्था काही बंधाऱ्यावर अस्तित्वात आहे. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सिंचनाच्या पाणी वाटपामध्ये न्याय्यपणा असणारी म्हणून प्रसिद्ध पावलेली जगातील ही एकमेव गौरवशाली व्यवस्था जवळ जवळ नामशेष पावली आहे.

विदर्भाच्या पूर्व भागात वैनगंगा खोऱ्यात गौंड राजवटीत मोठया प्रमाणात लहान लहान तलाव बांधले गेले. वैयक्तिक तलावाला बोडी म्हटले जात असे. ब्रिटिश काळापासून या तलावांना माजी मालगुजारी तलाव असे संबोधण्यात आले. बोडीसह अशा तलावाची संख्या २० हजारांच्या आसपास असावी. सिंचनाची व्यवस्था सामूहिकपणे लाभधारकाच्या मार्फतच राबविली जात असे. अनेक शतकाच्या वाटचालीत बरेच तलाव अद्यापी कार्यरत आहेत. अशाच प्रकारचे शेकडो तलाव मराठवाडयाच्या पूर्व भागात आजदेखील कार्यरत असलेले पहावयास सापडतात. महाराष्ट्रभर विखुरलेल्या बारमाही पाणी

देणाऱ्या बारवा आजही आपले अस्तित्व दाखवतात. मराठवाडयातील बीड जवळ दोन ते अडीच हजार एकर सिंचन करणारी 'खजाना विहिर' आजही कार्यरत असलेली दिसते. मिरज, सांगली, भोर, कोल्हापूर, पुणे, जुन्नर, नगर, औरंगाबाद, अचलपूर, अकोलाबाळापूर, पैठण जवळील तीस गाव, बीड, चंद्रपूर, सिंधखेड राजा, जालना, इ. ठिकाणच्या इतिहासकालीन भूमिगत कालवा वा नळाद्वारे शहरांना पाणी पुरवठा करणाऱ्या व्यवस्था या त्या काळातील पाणी व्यवस्थापनातील शहाणपणाचं उच्चांक दाखवतात. गावाला किमान एक तरी गाव तलाव आणि त्याच्या परिसरात आड, बारवा, विहिर या ग्रामीण आणि शहरी भागाला स्थायी स्वरूपात पाणी पुरवठा करणाऱ्या व्यवस्था होत्या. आजसुद्धा जवळ जवळ सर्वच गावांचा आणि काही शहरांचा पिण्यासाठीचा पाणी पुरवठा हा भूजलावरच आधारित आहे. मराठवाडयाच्या पश्चिम भागात नद्यांवर बंधारे बांधून कालव्याद्वारे पाणी वळवून विक्रेंद्रीतपणे व लोकसहभागातून सिंचन राबविले जात असल्याच्या खुणा अनेक ठिकाणी पहावयास मिळतात. औरंगाबाद जवळील देवगिरी किल्याच्या परिसरातील जल व्यवस्थापन पाणी या क्षेत्रातील वेगवेगळया कौशल्याचं (रेन वॉटर हार्वेटिंग, रूफ वॉटर हार्वेटिंग इ.) दर्शन घडविते. प्रत्येक किल्ल्यावर मग तो भुईकोट असो, डोंगरी असो वा सागरी असो निसर्गाचे पाणी साठवण्याची आगळी वेगळी व्यवस्था तलाव आणि टाक्याच्या स्वरूपात पहावयास मिळते. पुण्याजवळील सासवडची जाधवरावांची गढीपण रूफ वॉटर हार्वेटिंगचे उत्तम उदाहरण आहे. कोकणात व सहयाद्रीच्या पूर्व पायथ्याला झऱ्यांनी सिंचनाला आधार दिला.

ब्रिटिशाची राज्यव्यवस्था या देशावर बसेतोपर्यंत सिंचन व पिण्याच्या पाण्याचे जल व्यवस्थापन हे पूर्णपणे लोकप्रणीत होते. लोकांनी निर्माण केलेल्या, लोकांसाठी, लोकांनीच चालविलेल्या या व्यवस्था म्हणजे इतिहासकालीन जल व सिंचन या क्षेत्रातील कार्यरत असलेल्या लोकशाहीचचं दर्शन घडवितात. १७५७ पासून ईस्ट इंडिया कंपनीनं व्यापाराचं निमित्त करून या देशाचा ताबा घेण्यास सुरूवात केली आणि १८५७ पासून इंग्लंडच्या राणीचं राज्य या प्रदेशावर विस्तारलं. १८१८ ला शनिवारवाडयावर इंग्रज निशान फडकलं आणि तेव्हापासून महाराष्ट्रावर ब्रिटिशांनी आपली सत्ता बसविली.

दुष्काळामध्ये लोकांना जगविण्यासाठी फुकट पैसा खर्च करण्यापेक्षा दुष्काळी कामाचा भाग म्हणून आणि त्याचबरोबर पर्जन्यधारित शेतीला नद्यांवर बांध घालून त्याद्वारे पाणी अडवून कालव्याद्वारे वळवून संरक्षण देण्यासाठी काही नव्या सिंचन योजना ब्रिटिशांना हाती घाव्या लागल्या. १८७० साली कृष्णेवर खोडशी येथे बंधारा बांधून कृष्णेचा कालवा काढला. तदनंतर प्रवरा, गोदावरी, निरा, मुठा, गिरणा या नद्यांवर बंधारे बांधून कालव्याद्वारे सिंचनास प्रारंभ केला. या बंधाऱ्याच्या पाठीमागे साठा हा अल्पसा होता. नदीतील वाहणाऱ्या पाण्यावरच कालव्याखाली भिजणारे क्षेत्र अवलंबून होते. पुढे चालून या सिंचनाला शाश्वत आधार देण्याच्या दृष्टीकोनातून विसाव्या शतकाच्या सुरूवातीला प्रवरेवर आणि दारणा नदीवर भंडारदरा, दारणा अशी दोन धरणे बांधली. निरेवर भाटघर धरण पूर्ण केले. १८७० ते १८७५ या कालावधीत मुठेवर खडकवासला येथे दगडी धरण बांधले. याच काळात मुंबईस केवळ पिण्याचे पाणी आणि औद्योगिक वापरासाठी तुलसी, विहार, पवई व तानसा ही धरणं बांधून पाण्याचे साठे निर्माण केले गेले. लोकांचा राजा छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापूर भागात पंचगंगा खोऱ्यात भोगावती नदीवर राधानगरी धरण बांधून खालच्या भागातील लोकांनी बांधलेल्या बंधाऱ्यांना पाण्याचा शाश्वत आधार दिला. सहकारातून सिंचन व त्यातून शेतीची उन्नत अवस्था हे चित्र कोल्हापूर भागात उभा ठाकले. आजपण त्याचा प्रत्यय अनुभवास येतो. अशा रितीने धरणं बांधून मोठाले पाण्याचे साठे निर्माण करण्याची सुरूवात महाराष्ट्रात १९ व्या शतकाच्या शेवटच्या पर्वात सुरूवात झाली. विदर्भात रामटेक जवळ खिंडशी तलाव, चंद्रपूर जिल्हयात असोलामेंढा तलाव असे काही मोठाले पाण्याचे साठे २० व्या शतकाच्या सुरूवातीस निर्माण करण्यात आले. मराठवाडा भागात मात्र इतिहास काळापासून ते थेट स्वातंत्र्य मिळेपर्यंत कोठेही धरण बांधून पाण्याचा साठा निर्माण केलेलं ठिकाण आढळत नाही. गावोगांवी  तलाव आणि आड आणि त्यावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आधारलेली असावी. सिंचनासाठी विशेष असे काही प्रकल्प इतिहास काळात वा ब्रिटिश कालखंडात झालेले दिसत नाहीत. मराठवाडा तेव्हाही मागेच राहिला.

याच कालखंडात टाटांनी सहयाद्रीतून उगम पावणाऱ्या इंद्रायणी आणि मुळा या पूर्व वाहिनी खोऱ्यातील पाणी पश्चिमेकडे वळवून जलविद्युत निर्मितीचा कार्यक्रम हाती घेऊन लोणावळा (१९१६), वळवण (१९१६), शिरवटा (१९२०), ठाकूरवाडी (१९२२) आणि मुळशी (१९२४) या पाच मोठया धरणांची निर्मिती करून राज्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व काळातच पाण्याच्या खाजगीकरणाची पायवाट टाकली. हीच राज्यातील जलविद्युत

निर्मितीची सुरूवात म्हणावयास काही हरकत नाही. यातूनच मुबंई हे औद्योगिक शहर बनले आणि झपाटयाने वाढले.

स्वातंत्र्यपूर्व काळात भंडारदरा, दारणा, चणकापूर, घाटघर, राधानगरी, खडकवासला ही सगळी दगडी धरणे झाली. खोडशी, ओझर, नांदूर-मधमेश्वर हे बंधारे पण दगडामध्येच बांधण्यात आले. मोठाली मातीचे धरणे बांधण्याचा अनुभव नव्हता. दगडी धरण बांधण्याचे तंत्रज्ञान पुरेसे विकसीत झालेले नव्हते आणि म्हणून नंतरच्या काळात या सर्व धरणाचे मजबूतीकरण करण्यात आले. प्रकल्पाला लागणाऱ्या माहितीचे संकलन उदा. पर्जन्यमापनाचा तपशील, भूस्तराचा तपशील, पिकांना पाणी किती लागते, कोणते पिक घेणे फायदेशीर ठरते इ. बद्दल अनभिज्ञता होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत सुरूवातीला प्रामुख्याने अन्नधान्याच्या कमतरतेवर मात करण्याच्या उद्देशाने प्रकल्पावर पिक रचना ठरविण्यात आली. एक किंवा दोन पाण्याने पिकाचे रक्षण करणे हे प्रमुख धोरण ठेवण्यात आले. केवळ पूर नियंत्रणासाठी म्हणून कोणतेही धरण बांधले गेले नाही. तर सिंचनासाठी प्रकल्प बांधल्यानंतर जाता जाता त्यावर पूरनियंत्रण करणे शक्य होईल हा विचार ठेवण्यात आला होता.

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. १९४८ साली हैद्राबादच्या निजाम राजवटीतून मराठवाडा स्वतंत्र झाला. १ मे १९६० रोजी सद्यस्थितीतील महाराष्ट्राची निर्मिती झाली आणि सर्वप्रथम नाशिक जवळ गोदावरी नदीवर गंगापूर येथे मातीचे धरण बांधण्यात आले. या अनुभवातून बीडजवळ बिंदूसरा, तेरजवळ तेरणा, गिरणा, घोड, मुळा, पानशेत, दिना, इटियाडोह, बोर, मानार इ. मोठया धरणाची कामे हाती घेण्यात आली. दगडी धरणाच्या बाबतीत मात्र पूर्वानुभवाचा उपयोग करून कोयना, वीर, सिद्धेश्वर, येलदरी इ. धरणाची कामे हाती घेण्यात आली. या सर्व जलाशय निमिर्तीच्या कामात शेतीच्या विकासाला अग्रक्रम देण्यात येऊन सिंचनाचा विकास साधण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. कोयना धरण प्रामुख्याने आंतर खोरे स्थलांतरातून जलविद्युत निर्मितीसाठी निर्माण करण्यात आले. १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर तत्कालीन पाटबंधारे खात्याचे मंत्री व अर्थतज्ञ स.गो.बर्वे यांच्या अध्यक्षतेखाली सिंचनाची दिशा व धोरण आखण्यासाठी 'महाराष्ट्र सिंचन आयोग' नेमण्यात आला. या आयोगाचा अहवाल १९६२ मध्ये शासनास उपलब्ध झाला. या कालखंडात शेती शास्त्रात फार मोठा बदल होऊन पिकाच्या संकरीत जाती उपलब्ध झाल्या. किटकनाशके व रासायनिक खताचा पण मोठया प्रमाणावर वापर सुरू झाला. अनुभवाने माती व दगडी धरण बांधण्याचे तंत्रज्ञान राज्यात विकसीत करण्यात आले. मातीच्या धरण बांधकामात अवजड यंत्रसामुग्रीचा वापर हा प्रमुख घटक झाला व ओघानेच राज्यांमध्ये मोठया प्रमाणामध्ये प्रकल्पाची बांधकामे हाती घेण्यात आली.

*कृष्णेवरील पहिला खोडशी बंधारा*



याच कालखंडात पाणी या क्षेत्रात राज्याला अनेक महत्त्वाच्या घटना हाताळाव्या लागल्या. मोठाली धरणे, कालवे व वितरीकांचे जाळे, त्यावरील अवजड बांधकामे, जलविद्युत निर्मिती इ. साठी संशोधन व अनुभवाचा आधार घेऊन सहाय्य करण्यासाठी काही पूरक संघटनांची स्थापना करावी लागली. मध्यवर्ती संकल्प चित्र संघटना (१९५७), महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (१९५९), अभियांत्रिकी अधिकारी महाविद्यालय (१९६४), पाटबंधारे संशोधन व विकास संचलनालय (१९६९), यांत्रिकी संघटनेचा विस्तार (१९७१), लाभक्षेत्र विकास प्राधीकरण (१९७४), धरण सुरक्षितता संघटना (१९८०), जल आणि भूमी व्यवस्थापन संस्था (१९८०) या काही महत्त्वाच्या पूरक संस्थांचा उल्लेख करता येईल.

राज्यातील कोकणातील नद्यांची खोरी वगळता इतर चार खोरे हे आंतरराज्यीय खोरी आहेत. गोदावरी, कृष्णा आणि कोकणातील नद्यांचा उगम महाराष्ट्रात होतो तर तापी आणि नर्मदा या नद्यांचा उगम मध्यप्रदेशमध्ये होतो. गोदावरी नदी महाराष्ट्रातून बाहेर पडून आंध्रप्रदेशातून पूर्वेकडे बंगालच्या उपसागराला मिळते. वाटेत तिला कर्नाटक, मध्यप्रदेश,

छत्तीसगड, ओरिसा या प्रदेशातून अनेक उपनद्या मिळतात. कृष्णेचापण उगम महाराष्ट्रातच होतो. पुढे ती कर्नाटकातून आंध्रप्रदेशामध्ये जाते आणि बंगालच्या उपसागराला मिळते. तापी आणि नर्मदा या नद्या मध्यप्रदेशामधून उगम पावतात आणि पुढे पश्चिम दिशेने वाहत जाऊन महाराष्ट्रातून गुजरातमध्ये अरबी समुद्रास मिळतात. कोकणातील सर्व नद्या महाराष्ट्रातील सहयाद्री पर्वतातून उगवतात आणि पश्चिम दिशेने वाहत जाऊ न अरबी समुद्रास मिळतात.

आंतरराज्यीय नदी खोऱ्यातील पाणी सर्व संबंधीत राज्यामध्ये त्या त्या पद्रेशाचा विकास घडवून आणण्यासाठी विभागले गेले पाहिजे. पंचवार्षिक योजनेच्या माध्यमातून वेगवेगळया खोऱ्यांमध्ये वेगवेगळया आकाराची धरणे बांधून पाण्याचा साठा निर्माण करून पाण्याचा विविध प्रयोजनासाठी वापर करण्यासाठी राज्याचा नदी खोऱ्यातील उपलब्ध पाण्याचा हिस्सा ठरणे आवश्यक होते. याला अनुसरून भारतीय घटनेतील तरतुदीनुसार या खोऱ्यातील वेगवेगळया राज्यांचे पाण्याचे हक्क ठरविण्याबाबत केंद्रसरकारकडून लवादांच्या नेमणूका झाल्या. १९७६ ला कृष्णा खोऱ्याचा, साधारणत: १९७९ च्या दरम्यान नर्मदेचा, १९८० ला गोदावरीसाठी लवादाचा निर्णय राज्याच्या हातात आला. अय्यंगार समितीच्या (१९५८) शिफारसीनुसार राज्याचा तापी खोऱ्यातील वाटा ठरला. या विविध नदी खोऱ्यातील पाण्याची उपलब्धी मात्र अपुऱ्या पर्जन्य व सरिता मोजणीच्या आधारे काढली गेली. पर्जन्यमापक आणि सरीता मापन केंद्राचं विस्तृत असं जाळं बसविण्यासाठी बराचा काळ गेला. साधारण १९८० च्या पुढे असं जाळं बसवून विविध खोऱ्यामध्ये निसर्गातील पाण्याची शास्त्रीय मोजणी करून पाण्याचा अंदाज वर्तवणे शक्य झालेले आहे.

पाण्याचा सर्वाधिक वापर हा सिंचनासाठी व्हावयाचा असल्याने १९६० ला राज्याच्या निर्मितीबरोबरच सिंचन विकासाची दिशा ठरवून घेण्यासाठी बर्वेआयोगाच्या जवळ जवळ २०० शिफारसी शासनाने काही तत्वत: काही अंशत: तर काही पूर्णत: स्विकारल्या आणि त्या अनुषंगाने राज्यामध्ये पाणी क्षेत्रातील विकासाची पावले धडाडीने पडली. स्वातंत्र्यापूर्वी राज्यातील निर्मित सिंचन क्षमता २.७४ लक्ष हेक्टर होती. १९६० पर्यंत त्यात वाढ होऊन तो आकडा ३.८६ लक्ष हेक्टर झाला. राज्यातील सिंचन विकासाचा प्रवास चालू असताना १९७२ ला राष्ट्रीय सिंचन आयोगाचा अहवाल उपलब्ध झाला. याच दरम्यान राष्ट्रीय कृषी आयोगाच्या शिफारशी देखील बाहेर आल्या. हे दोन महत्त्वाचे दस्तऐवज पाणी, शेती, भूजल इ. च्या विविध उपागांवर प्रकाश टाकणारे असल्यामुळे राज्याला त्याच्या अनेक प्रश्नाची आणि या क्षेत्रातील आव्हानांची उत्तरे मिळविण्यात सुकरता झाली.

१९९५ ला राज्यातील सिंचन क्षमता ३.८६ लक्ष हेक्टर वरून ३० लक्ष हेक्टरचा टप्पा ओलांडत होती. लोकसंख्येमध्ये प्रचंड वाढ झालेली होती. शहरीकरण झपाट्याने होत होते. शहराच्या भोवती औद्योगिक वसाहती वाढत होत्या. लोकांचे राहणीमान उंचावत होते. पाण्याचे झपाटयाने प्रदूषण होत होते. नदी खोऱ्यामध्ये पाण्याचा वापर करणाऱ्या व्यवस्था अनेक झाल्या. पाणी पुरवठा अडचणीत आला. सिंचन व्यवस्थापनात पण टोकाची विषमता निर्माण झाली. पाणी वापराचा सुटा सुटा विचार मारक ठरू लागला. या सर्व गुंतागुतीच्या प्रश्नावर उपाययोजना सुचविण्यासाठी डिसेंबर १९९५ मध्ये महाराष्ट्राने दुसऱ्या सिंचन आयोगाची स्थापना डॉ.माधवरावजी चितळे, प्रसिद्ध जलतज्ञ यांच्या अध्यक्षतेखाली केली. या आयोगाचे नामाभिदान 'महाराष्ट्र जल व सिंचन आयोग' असे करण्यात आले. चितळे आयोगाने त्यांचा २००० पानांचा आणि जवळजवळ ३२५ पेक्षा जास्त शिफारसीचा अहवाल शासनाकडे ऑक्टोंबर १९९९ मध्ये सुपूर्त केला. या आयोगातील अनेक शिफारसीची मदत घेवून राज्याचा जलविकासाचा प्रवास चालू आहे. पण अधिकृतरित्या आयोगाच्या शिफारसी स्विकारण्याबद्दल शासनाने अद्यापी कसलेही भाष्य केलेले नाही.

१९८० पर्यंत सिंचनाचा विस्तार करण्यावर भर देण्यात आला. राज्याची सिंचन क्षमता जवळ जवळ १५ लक्ष हेक्टर पर्यंत वाढली. निर्मित सिंचन क्षमता आणि त्याचा प्रत्यक्षातील वापर यामध्ये फार मोठी तफावत जाणवू लागली. प्रकल्पाचे नियोजन करत असताना डोळयापुढे धरलेली पिक पद्धती आणि प्रत्यक्षातील पिक पद्धती यामध्ये कमालीचा फरक जाणवू लागला. बारमाही पिकाचे दोन ते पाच टक्क्यांपर्यंतचे क्षेत्र २० ते २५ टक्क्यांपर्यंत वाढलेले दिसू लागले. पाणी वाटपामध्ये विषमता निर्माण झाली. कालव्याच्या शिर्ष भागातील शेतकऱ्यांना मुबलक पाणी तर शेपटीकडच्या लोकांना हंगामी पिकाला देखील पाणी नाही अशी परिस्थिती निर्माण झाली. सिंचनाची कार्यक्षमता घसरून ३० ते ३५ टक्क्यांच्या दरम्यान घटल्याचं चित्र दिसून आलं. बिगर सिंचनाच्या पाणी-मागणीमध्ये झपाटयाने वाढ झाली. पिण्याचे म्हणजेच घरगुती वापराचे आणि उद्योगाच्या पाण्याने स्वत:साठी लागणाऱ्या पाण्याची, स्वतंत्रपणे जबाबदारी स्विकारण्याचा विचार केला

नाही. लागणारे पाणी जवळच्या सिंचन प्रकल्पाच्या पाणी साठयातून उचलण्याचा एक हाती कार्यक्रम त्यांनी राबविला. त्याला धोरणकर्त्यांने आणि राज्यकर्त्यांनेपण अनुकूलता दाखविली. या पार्श्वभूमीवर केवळ धरण, कालवे, वितरीका याचे पार्थीव सांगाडे निर्माण करून सिंचनक्षमता वाढवून सिंचनाचे मुख्य उद्दिष्ट गाठणे शक्य नाही याची जाणीव प्रथमत: झाली असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. १९७२ च्या राष्ट्रीय सिंचन आयोगाने पण सार्वजनिक निधीतून निर्माण केलेल्या सिंचनाच्या पायाभूत सोयीच्या अकार्यक्षम वापराबद्दल चिंता व्यक्त करून एकूणच सिंचन व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. आणि म्हणून १९८० नंतरचा कालखंड हा प्रकल्प निर्मितीबरोबरच सिंचन व्यवस्थापनाच्या सुधारणावर भर देण्याकडे कलला. पूर्ण झालेल्या प्रकल्पाची देखभाल, दुरूस्ती व पाण्याचा सुयोग्य वापराचा विचार पुढे आला. राज्याच्या वेगवेगळया भागामध्ये शेतकऱ्यांमध्ये पाण्याच्या अग्रहक्काबद्दलची जाणीव निर्माण झाली. याचबरोबर पिण्याच्या व उद्योगधंद्यांसारख्या बिगर सिंचन वापरासाठी पाण्याची मागणी मोठया प्रमाणावर पुढे आली. शहरे मोठी झाली. याला पाण्याची उपलब्धताच कारणीभूत ठरली. पर्यावरणाबद्दल आवाज उठला व धरणे बांधण्याच्या गतीमध्ये परस्पर अग्रक्रम पुढे येऊ लागले. हाती असलेले सिंचन प्रकल्प पूर्ण करून निर्माण झालेल्या सिंचन क्षमतेचा वापर करून ग्रामीण भागाची आर्थिक उन्नती करण्याकडे लक्ष देण्याऐवजी दरवर्षी नवीन नवीन प्रकल्प हाती घेऊन निधी गुंतवण्याचा विचार कितपत रास्त आहे, याबद्दल विचार मंथन सुरू झाले. राज्यातील सर्व प्रदेशात समतुल्य विकास साधण्यासाठी अवर्षण प्रवण क्षेत्र, डोंगराळ भाग, आदिवासी भाग, मागास भाग, ई. ना न्याय देण्याची भूमिका पुढे आली. १९८३ ला दांडेकर समितीचा अहवाल समोर आला आणि राज्याच्या वेगवेगळया भागातील सिंचनाच्या अनुशेषाचे चित्र पुढे आले. कृष्णा खोऱ्यातील राज्याच्या वाटयाला आलेल्या पाण्याचा पुर्नविचार मे २००० साली होणार असल्यामुळे कृष्णा खोऱ्यातील प्रकल्पाची कामे पूर्ण करण्याचा प्रक्रियेस वेगळीच दिशा मिळाली. पुर्नविचार म्हणजे राज्याच्या हिश्याला आलेलं पण न वापरलेलं पाणी हातून जाईल का अश्या भितीचं वातावरण निर्माण झालं आणि त्यातूनच या खोऱ्यातील दृष्टीक्षेपातील सर्व लघु, मध्यम, मोठे प्रकल्प मे २००० अखेर पूर्ण करण्याची निकड असल्याची वातावरण निर्मिती झाली. प्रगती पथावरील आणि याचबरोबर



*वेळेवर देखभाल-दुरुस्ती होत नसल्याने कालव्यात गवत व घाण वाढून त्याची वहनक्षमता कमी होत आहे.*

बाहय सहायित (जागतिक बँक इ.) प्रकल्प पूर्ण करणे याही बाबी प्रकर्षाने पुढे आल्या. लघु प्रकल्प व मोठे प्रकल्प असाही वाद पुढे आला. सिंचन विकासाला राजकीय धार आली. १९८७ ला जास्तीत जास्त शेतकऱ्यांना आणि जास्तीत जास्त क्षेत्राला सिंचनाचा लाभ मिळवून देण्यासाठी आठमाही धोरण स्विकारण्याचा विचार पुढे आला. १९७२ च्या दुष्काळाने भूजलाचा वापर सिंचनासाठी मोठया प्रमाणात करण्याचा पायंडा पाडला. वन जमिन आणि पर्यावरणाचा (१९८०) कायदा भारत सरकारने अंमलात आणला. पाण्यातून विकास घडवून आणणाऱ्या प्रकल्पाला विकासाबरोबरच पर्यावरण हानीच्या दुसऱ्या अंगाचा विचार करण्याची जाणीव या कायद्याने करून दिली. प्रकल्प बाधीत लोकांमध्ये त्यांच्या हक्काची जाणीव निर्माण झाली. नर्मदा आंदोलनाने या दिशेने देशभरातच नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावरपण दबलेल्यांचा आवाजाला मोकळीक करून दिली.

या सर्व प्रश्नाची सोडवणूक करत करत राज्यांने सिंचन प्रकल्प गतिमान ठेवण्यात यश मिळविले. आठव्या योजनेच्या अखेरपर्यंत (मार्च १९९७) साधारणत: रू.१० हजार कोटींची गुंतवणूक होऊन ३२ लक्ष हेक्टर सिंचनक्षमता निर्माण झाल्याची आकडेवारी समोर येते.

सद्य:स्थितीत देशातील एकूण मोठया धरणापैकी (१५ मी. पेक्षा उंच वा १ द.ल.घ.मी. पेक्षा जास्त क्षमता असलेले) ५० टक्के मोठी धरणे एकटया महाराष्ट्रात आहेत. ही प्रगती उल्लेखनीयच म्हणावी लागेल. याचबरोबर अवर्षणप्रवण, डोंगराळ व मागासलेल्या भागाच्या विकासासाठी जल व मृद संधारणाच्या हेतूने (पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत) लघु तलाव, पाझर तलाव, कोल्हापूर पद्धतीचे बंधारे, गावतळी, भूमीगत बंधारे इ. चा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्याचा प्रयत्न झाला.



*कृष्णा नदीचे विस्तृत झालेले पात्र*

देशातील भाक्रा नानगल, सरदार सरोवर, नागार्जुन सागर, नर्मदा सागर इ. विशाल प्रकल्पांच्या तुलनेत राज्यातील कोयना, भीमा, जायकवाडी, पैनगंगा, पेंच व गोसीखुर्द सारख्या प्रकल्पांचा उल्लेख करणे प्रस्तुत ठरेल.

राज्यात योजनापूर्व काळात (स्वातंत्र्यापूर्वी) २.७४ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता धरण आणि कालव्याच्या माध्यमातून निर्माण झालेली होती. यासाठी रू.१६.६० कोटी गुंतवणूक झालेली दिसते. महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपर्यंत (१९६०) ही सिंचनक्षमता ३.८६ लक्ष हेक्टर पर्यंत वाढली. १९८० च्या कालखंडापर्यंत सिंचन क्षमतेचा आकडा १५ लक्ष हेक्टरपर्यंत गेला आणि यासाठी रू.११३३ कोटीची गुंतवणूक झाली. आठव्या योजने अखेर (१९९७) रू.१०,००० कोटीची गुंतवणूक होऊन सिंचनक्षमता ३२ लक्ष हेक्टर पर्यंत वाढली. जून २००६ अखेर निर्मित सिंचनक्षमता ४१.५ लक्ष हेक्टर झाली आणि त्यासाठी रू.३८ हजार कोटीची गुंतवणूक झाली. जून २००८ अखेर निर्मित सिंचनक्षमता ४३ लक्ष हेक्टर पर्यंत वाढलेली असणार आणि यासाठी गुंतवणूक जवळपास रू.४५ हजार कोटी झालेली असणार. जून २००६ अखेर ५४ मोठे २२२ मध्यम आणि २७२६ लघु असे ३००२ प्रकल्प मिळून २९.५ द.ल.घ.मी. चा पाणीसाठा झाला. २५० हेक्टर पेक्षा कमी सिंचनक्षमता असणाऱ्या लघु प्रकल्पाची संख्या पण अडीच हजारापर्यंत आली. याशिवाय जवळ जवळ ५२ हजार लहान लहान बंधारे (पाझर तलाव-१८०००, कोप बंधारे-१००००) आहेत आणि या सर्व प्रकल्पाच्या साठयातून जवळजवळ १३ लक्ष हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाल्याचं दृश्य आहे. ढोबळमानाने मार्च २०१० अखेर राज्यस्तरीय (२५० हेक्टरपेक्षा जास्त सिंचन क्षमता) लघु, मध्यम व मोठया प्रकल्पाची संख्या ३२०० पेक्षा जास्त असावी. यातून निर्माण झालेली सिंचन क्षमता ४५ लक्ष हेक्टरपेक्षा जास्त असेल. प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पाची उर्वरित किंमत पण जवळपास ५० हजार कोटीपर्यंत असावी.

चितळे आयोगाने राज्यातील सिंचन क्षमता १२६ लक्ष हेक्टर पर्यंत जाईल असा अंदाज वर्तवलेला आहे. त्यामध्ये धरण, कालवे, उपसाद्वारे ८५ लक्ष हेक्टर सिंचन क्षमतेचा अंदाज केलेला आहे. सध्याची निर्मित सिंचनक्षमता (४५+१३) = ५८ लक्ष हेक्टर आहे. प्रगतीपथावरील प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या सिंचनक्षमतेचा अंदाज जवळजवळ ३० लक्ष हेक्टरचा आहे. वरील सिंचनक्षमतेत भूजल आधारीत सिंचन क्षमतेचा अंतर्भाव नाही. राज्यामध्ये भूजल क्षमता जवळ जवळ ३१ अब्ज घ.मी. आहे आणि वापरा योग्य भूजल २०.५ अब्ज घ.मी.च्या जवळपास आहे. भूजलाचा वापर १० अब्ज घ.मी.पुढे गेलेला असावा. विहिरीच्या संख्येचा अंदाज ३० लक्षच्या पुढे आहे. दुर्दैवाने विहिरीची, त्याच्या प्रकारानुसार वेगवेगळया कालखंडात कशी वाढ होत गेली. आणि त्यावर किती क्षेत्र

भिजते याची, विश्वास ठेवण्याइतपत आकडेवारी शासनाच्या कोणत्याही विभागाकडे उपलब्ध नाही. उघडया विहिरी किती आहेत, विंधन विहिरी किती आहेत, किती टयुबवेलस् आहेत आणि यापैकी किती चालू आहेत, किती बंद आहेत आणि या सर्व विहिरी कोणकोणत्या प्रयोजनासाठी (पिण्याचे पाणी, सिंचन, उद्योग इ.) प्रत्यक्ष वापरात आहेत याची माहिती उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत भूजलावर आधारित सिंचनाचा अंदाज बांधणे फार कठीण आहे. अंदाजीत आकडेवारीवरून भूजलावर आधारित सिंचन हे एकूण सिंचन क्षेत्राच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त आहे, अशीही माहिती पुढे येते. कोणत्या आकडेवारीवर विश्वास ठेवावा हे तरी सध्या एक प्रश्नचिन्हच आहे. एका विहिरीवर सरासरी एक हेक्टर सिंचन गृहित धरून भूजल आधारित निर्मित सिंचनक्षमता ३० लक्ष हेक्टरचा आकडा सहज गाठेल. यापैकी कालव्याच्या लाभक्षेत्रातील विहिरीवर होणारे सिंचन १० लक्ष हेक्टरच्या आसपास आहे. याचाच अर्थ लाभक्षेत्राच्या बाहेर भूजल आधारित निर्मित सिंचन क्षमता २० लक्ष हेक्टरच्या आसपास असावी. चितळे आयोगाने भूजल आधारित अंतिम सिंचन क्षमता ४१ लक्ष हेक्टर पर्यंत असेल असा अनुमान वर्तविलेला आहे. १२६ लक्ष हेक्टर या अंतिम सिंचनक्षम क्षेत्रामध्ये जवळ जवळ १५ लक्ष हेक्टर सिंचनक्षमता ही आधुनिक सिंचन पद्धतीमुळे (वाढ) धरलेली आहे.

हे चित्र फार बोलके आहे. डाळी आणि तेलबीया पिकविण्यासाठी पुरेशी अनुकूलता असताना याबाबतीत आपण परावलंबी झालो आहोत. हे चित्र बदलण्याची गरज आहे. सिंचन व्यवस्थेतून या दोन्ही पिकांच्या वाढीला वेगळी दिशा मिळणार आहे. हरितक्रांतीचा फटका या दोन प्रमुख पिकांना बसला आहे असं म्हणलं तर वावगं ठरू नये. क्रांती सर्वांगिण असावी लागते. काहीच क्षेत्रातील तीची घोडदौड इतर क्षेत्रांना बाधक ठरते.

विसाव्या शतकाच्या सुरूवातीला इंग्रजी राजवटीत महाराष्ट्रात कृष्णा, नीरा, मुठा, प्रवरा, गोदावरी व गिरणा या नद्यांवर वळवणीचे बंधारे बांधून कालव्याद्वारे सिंचनास सुरूवात करण्यात आली. कालव्याद्वारे प्रवाही सिंचन उपलब्ध झाले आणि काळाच्या ओघात या प्रदेशातील फळबागा हळूहळू नामशेष झाल्या. असे म्हटले जाते की महाराष्ट्रात नगर व सोलापूर परिसरात उत्तम प्रकारच्या मोसंबीच्या बागा होत्या. श्रीरामपूर या ठिकाणी मोसंबी संशोधन केंद्र होते. प्रवाही सिंचन आले, ऊ स वाढला व मोसंबी गायब झाली. असे का झाले याचे उत्तर सिंचन व्यवस्थापनाचे शास्त्र देते. फळझाडांना, फुलांना पाण्याची मात्रा किती लागते हे समजून निश्चित तेवढेच पाणी देणे गरजेचे आहे. दिवसाआड, दोन दिवसांनी, चार दिवसांनी पाणी देऊ  हा विचार फळझाडांच्या वाढीला उपयुक्त ठरत नाही. फळांची झाडे मोठी होतील पण त्यावरील फळांची संख्या कमी राहणार आणि म्हणून उत्पादनात घट होणार. हा बारकावा फळबागा वाढविताना लक्षात ठेवणे आवश्यक ठरते. थोडक्यात फळबागांना सिंचन उपलब्ध करण्याच्याबाबतीत हात आखडता ठेवणे गरजेचे असते. अधिक उत्पादनासाठी पाण्याचा ताण गरजेचा आहे याची जाण फळबागा वाढविणाऱ्या शेतकऱ्याला असते. याच कारणास्तव फळपिकांना ठिबक, तुषार, डिफ्युजर, भूमिगत सिंचनासारखी पाण्याची मात्रा मोजून देणारी सिंचन प्रणाली फारच अनुकूल ठरते. हा अनुभव गेल्या २०-२५ वर्षात महाराष्ट्रातल्या अनेक शेतकऱ्यांना आला आहे आणि म्हणून राज्यातला शेतकरी आधुनिक सिंचन प्रणालीचा वापर मोठया प्रमाणावर करण्याकडे कलला आहे. याबरोबरच फुल शेती, कुरणाची शेती, मच्छशेती, पर्यटन इ. चाही विकास समांतरपणे होण्याची गरज आहे. त्यादिशेने हळूहळू प्रवास सुरू झालेला आहे.

गेल्या ५० वर्षात सिंचन व्यवस्थेच्या बांधकाम क्षेत्रात एक बदल झाला. दगडी बांधकाम हद्दपार झाले. कुशल कामगाराचा अभाव हे त्यातील प्रमुख कारण म्हणावं लागेल. येणाऱ्या काळात विविध प्रकाराची बांधकामे काँक्रीटमध्येच करावी लागणार आहेत. धरणाच्या दरवाज्यामध्ये तसा काही बदल झालेला नाही. स्वयंचलित दरवाज्याची निर्मिती करण्यात आपण यशस्वी झालो नाही. निर्माण केलेल्या पायाभूत सोई (धरण, कालवे, वितरीका) त्याची देखभाल करण्यामध्ये सुद्धा आपण अडखळतच राहिलो. अनेक कालव्यातून जाणारा पाण्याचा विसर्ग हा ७५ टक्क्याच्या आसपासच आहे. हे सुधारण्यासाठी काही विशेष प्रयत्न झालेले नाहीत. धरणासाठी, कालव्यासाठी नेमकी लागते तितकीच जमिन संपादन करावी ही जाण आपल्यात रूजली नाही. पुढे मागे लागेल म्हणून अधिकच्या जमिन संपादित करून त्या विनावापर ठेवण्याची झळ शेतकऱ्याला बसते. राज्य त्या जमिनीपासून मिळणाऱ्या उत्पादनापासून वंचित होते. हा विचार डोकावला नाही.

येणारा काळ हा सामुहिक शेतीचा राहणार आहे. गटशेतीचा राहणार आहे. कराराच्या शेतीचा राहणार आहे. राज्यातील शेती तुकडया तुकडयामध्ये विखुरलेली आहे. शेती ही एकटया दुकटयाने करावयाचा व्यवसाय नाही. पाणी,

सिंचन, शेती, प्रक्रिया उद्योग, वाहतूक, बाजरपेठा, साठवण व्यवस्था इ. सिंचनाशी संलग्नबाबी या एकत्रितपणे हाताळावयाच्या असतात. गेल्या ५० वर्षात प्रत्येक बाबींमध्ये सुटेसुटेपणा, एकलेपणा यांचा शिरकाव झाला. शेतकरी, पर्यायाने सिंचन व्यवस्था कमकुवत झाली. पण गेल्या दशकातलं चित्र हे वेगळं आहे, आशादायी आहे. अनेक ठिकाणी सामुहिक शेतीचे प्रयोग होत आहेत आणि शेतकरी एकरी एक लाखाचे उत्पन्न मिळवत आहेत. जळगांव, धुळे भागात कराराची शेती फुललेली आहे. जालना जिल्हयात अनेक गावांमध्ये गट-शेती विकसीत होत आहे. लोक एकत्र येत आहेत आणि सामुहिकपणे शेती करण्याकडे वळत आहेत. तुकडयाच्या शेतीला हे उत्तर आहे.

पिकाला पाणी फार कमी लागते. गेल्या ५० वर्षातला सिंचनाचा प्रवास शेतीला पाणी देण्यापासून सुरूवात झाला. १९८० च्या दरम्यान पिकाला पाणी देण्याचा विचार रूजू लागला. इ.स. २००० नंतर पिकाच्या मुळाला पाणी देण्याचं शास्त्र शेतकरी अवगत करून घेवू लागला. पिकाच्या वेगवेगळया वाढीच्या टप्प्यामध्ये पाण्याची मात्रा देखील वेगळी लागते. प्रवाही सिंचन पद्धतीत नेमके पाणी देण्यासाठी काही मर्यादा आहेत. पिक निहाय पण पाणी देता येत नाही. लाभ क्षेत्रात सर्व प्रकारच्या पिकांना आणि वाढीच्या वेगवेगळया टप्प्यामध्ये सारखेच पाणी द्यावे लागते आणि यामुळे पाणी वाया जाते. पाण्याबरोबर खत वाहून जाते. जमिनी पाणथळ होतात. क्षारयुक्त होतात. ओढया नाल्यातले पाणी प्रदूषीत होते. मशागतीचा खर्च वाढतो. पिकाची उत्पादकता घटते. पिक रोगराईस बळी पडते. गरजेपेक्षा जास्त पाणी देण्याचे तोटे असे अनेक आहेत. आणि म्हणून अधिक पाणी, अधिक खते व किटकनाशके, म्हणजे अधिक उत्पादन हे चुकीचे समीकरण शेतकऱ्याला आता लक्षात यायला लागले आहे. पिकाच्या वाढीसाठी लागत तितकं पाणी त्याच्या मुळापाशी देण्याचं कसबं शेतकऱ्याच्या अंगी रूजत आहे. यातूनच ठिबक, तुषार, डिफ्युजर, भूमिगत सिंचन, इ. आधुनिक सिंचन पद्धतीचा शेतकरी मोठया प्रमाणात अंगीकार करत आहे. केवळ याच पद्धतीद्वारे पिकाला पाणी त्याच्या गरजेनुसार मोजून देता येते. यामुळे कमी पाणी लागते. पण याही पेक्षा महत्त्वाचे फायदे म्हणजे, खत वाया जात नाही. पिक रोगराईस बळी पडत नाही. जमिनी पाणथळ होत नाहीत. मशागतीचा खर्च वाचतो. उत्पादनामध्ये दुपटीने, तिपटीने वाढ होते. उत्पादनाची गुणवत्ता पण उच्च दर्जाची असते आणि म्हणून पाणी वाचविण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर या विचाराच्या पलीकडे शेतकरी जात आहेत. अधिक उत्पादनासाठी, खर्चात बचत करण्यासाठी आणि दर्जेदार उत्पादन मिळविण्यासाठी आधुनिक सिंचन पद्धतीचा वापर हा अपरीहार्य ठरतो. हे राज्यातील शेतकऱ्यांना अवगत झालेले आहे. महाराष्ट्राचा बहुतांश भाग हा तुटीचा भाग आहे. पण मुळातच पिकाला पाणी कमी लागते. पाणी, पाणी म्हणून चुकीच्या वाटा धुंडाळण्यापेक्षा पिक वाढीचं, उत्पादनाचं शास्त्र समजून नेमकं तेवढं पाणी पिकाच्या मुळाशी देऊन उत्पादनात उच्चांक गाठणारी सिंचन व्यवस्था येत्या काळात आपल्याला स्विकारायची आहे. देशामध्ये आधुनिक सिंचन पद्धतीचा अंगीकार करण्यामध्ये राज्य अग्रक्रमावर आहे. उत्पादन वाढीत पण निश्चितच तो आग्रक्रमावर राहील. हे शक्य आहे. कारण याला शास्त्रीय बैठक आहे. येत्या काळातील सिंचन व्यवस्था पाण्याची उत्पादकता या तत्त्वावर आधारली जाणार आहे. त्यादृष्टीने सिंचन व्यवस्थेतील शेतकरी व सिंचन व्यवस्थापक प्रशिक्षित होण्याची गरज आहे. पाण्याचा वापर विवेकाने होण्यामुळे पाण्याचे प्रदूषण, पाणथळ व क्षारयुक्त जमिनीचे प्रश्न आपोआपच नाहीसे होणार आहेत. पाण्याचा विवेकाने वापर हा मंत्र पाण्यातील सर्वच क्षेत्राला लागू आहे. घरगुती वापराचं पाणी असो वा उद्योगाचं पाणी असो वापरामध्ये काटकसर आणि विवेक येण्याची गरज आहे. गरजेपेक्षा जास्त पाण्याचा वापर प्रदूषणामध्ये भर घालतो. अधिक सांडपाण्याची निर्मिती करतो आणि म्हणून पाण्याच्या सर्वच क्षेत्रामध्ये मग ते सिंचनाचे क्षेत्र असेल, पिण्याच्या पाण्याचे असेल, वा उद्योगाचे असेल सर्वांनीच पाण्याचा शास्त्रीय पद्धतीने वापर करण्यासाठी कटिबद्ध झाले पाहिजे. या दृष्टीने स्वत:ची मानसिकता बदलणे ही फार मोठी देशसेवा ठरणार आहे.

या पार्श्वभूमीवर येणाऱ्या काळात जलनिस्सारण, लाभक्षेत्राबाहेरील क्षेत्र, सिंचनक्षम जमिनी, ऊसासाठी मर्यादा यासारखे शब्दप्रयोग कालबाहय ठरणार आहेत. विजेच्या उपलब्धतेमुळे कोणतेही क्षेत्र सिंचनाच्या बाहेर राहणार नाही, कसल्याही ओबडधोबड, उताराच्या जमिनी आधुनिक सिंचन पद्धतीखाली आणल्या जाऊ शकतात आणि ठिबक किंवा तुषार सिंचनामुळे ऊसाच्या जमिनी पाणथळ वा क्षारयुक्त होण्याची शक्यता कमी राहणार आहे. गेल्या ५० वर्षात सिंचन क्षेत्रात झालेल्या बदलाचा हा परिणाम आहे.

राज्यामध्ये लागवडीयोग्य क्षेत्र २२५ लक्ष हेक्टर आहे. सर्वच पिकांना, मग ते गहू असेल, ज्वारी असेल, तूर असेल,



वैनगंगेवरील गोसीखुर्द धरण



उजनीचा कालवा



बीडमधील खजाना विहीर



नागपूरचा पेंच प्रकल्प

हरभरा असेल वा भात असेल आधुनिक सिंचन पद्धती उपकारक ठरत आहे. शेतकरी शहाणा होत आहे. तो निश्चितच या दिशेने प्रवास करणार आहे. शेतावरील पाणी शेततळयात साठवून थेंबाथेंबाने त्याचा वापर पिकासाठी करून एक घन मीटर पाण्याच १०० रूपयात रूपांतरण करण्याचं उद्दिष्ट तो गाठणार आहे. एकरी एक लक्ष रूपये हे सुत्र त्यांच्या अंगवळणी पडत आहे. कोकणात पाणी विपुल आहे. वैनगंगेच्या पूर्व भागात पाणी विपुल आहे. पाण्यातील विपुलता म्हणजे उत्पादनातील विपुलता हे सुत्र व्यवहारामध्ये चुकीचे ठरते. पिकाला पाणी त्याच्या गरजेइतकचं द्या. तुम्ही स्वत: सुद्धा तुमच्या गरजेइतकचं पाणी वापरा. पाण्याची तूट हा शब्दप्रयोग हद्दपार करण्यासाठी हे गरजेचे राहणार आहे. त्यादिशेने राज्याच्या सिंचनाचा प्रवास चालू रहावा ही अपेक्षा आहे. थोडा वेळ लागेल, गती संथ राहील, कारण मानसिकता बदलण्यास वेळ लागतो आणि हे जेव्हा घडेल तेव्हा राज्यातील लागवडी योग्य क्षेत्राच्या ७५ ते ८० टक्के भागावर सिंचनाच्या सोयी उपलब्ध झालेल्या असतील. पिकाला पाणी कमी लागते. हे सत्य पटण्यासाठी जेवढा वेळ जाईल तेवढा सिंचनाचं हे उद्दिष्ट गाठण्यासाठी उशिर लागेल. शासनाने मुलभूत सोई उपलब्ध करून देवून टप्प्याटप्याने शेतकऱ्यांना प्रशिक्षित करून सिंचनाची व्यवस्था लाभधारकाच्या हातात सोपविण्याची जबाबदारी प्रामाणिकपणे हाताळणे गरजेचं आहे. त्यांनीच केलेल्या कायद्याचं अनुपालन प्रशासनाला करावं लागणारं आहे. यात स्वयंप्रेरणा जर आली तर हा बदल गतिमान होईल.

१९८५ च्या दरम्यान राज्यामध्ये आधुनिक सिंचन पद्धतीच्या वापरास सुरूवात झाली. आजच्या घडीला ठिबक

खाली पाच लक्ष हेक्टर आणि तुषार खाली दोन लक्ष हेक्टर क्षेत्र असावे. एकूण क्षेत्र हे सात लक्ष हेक्टर म्हणजेच निर्मित सिंचन क्षमतेच्या (४५+१३+२०) = ७८ लक्ष हेक्टरच्या जवळ जवळ ९ टक्के आहे असे म्हणावयास काही हरकत नसावी. दुर्देवाने राज्यामध्ये आधुनिक सिंचन प्रणालीखाली पिकनिहाय क्षेत्राची कशी वाढ होत आहे? ही पण आकडेवारी सहजगत्या उपलब्ध होत नाही. अशी आकडेवारी दरवर्षी अधिकृतरित्या प्रसिद्ध होण्याची नितांत गरज आहे.

१९९६ च्या दरम्यान सिंचन निर्मितीस गती देण्यासाठी खाजगी क्षेत्रातून भांडवल निर्मिती करण्यासाठी सिंचन विकास महामंडळाची निर्मिती करण्यात आली. ती पुढीलप्रमाणे आहे. महाराष्ट्र कृष्णाखोरे विकास महामंडळ (१९९६), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ (१९९७), तापी पाटबंधारे विकास महामंडळ (१९९७), कोकण विकास पाटबंधारे महामंडळ (१९९७), गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ (१९९८) या महामंडळाच्या माध्यमातून बाजारातून कर्ज उभारण्याची सोय झाली आणि त्यामुळे पाणी विकासाच्या व सिंचनाच्या व्यवस्थेत एक वेगळी रचना उभी राहिली. या महामंडळाचा सध्याचा हेतू केवळ भांडवल उभारणी आणि त्यातून बांधकाम निर्मिती असा आहे. काळाच्या ओघात ही महामंडळे 'खोरे विकासाचा' दिर्घकालीन कार्यक्रम पेलवणारी आणि पाणी नियोजनाची व नियमानाची जबाबदारी स्विकारणारी होतील असाही विचार काही तज्ज्ञांकडून मांडण्यात येतो. योगायोगाने या महामंडळाची रचना खोरे निहाय झालेली आहे. याच रचनेचे रूपांतरण नदी खोरे मंडळात करण्याचा शासनाचा विचार असल्याचे समजते. त्यादृष्टीने पावलेपण टाकण्यात येत असावीत. महामंडळाच्या कायद्यात पाण्याचे घनमापन पद्धतीने वितरण होणे आणि वार्षिक देखभाल व व्यवस्थापनाचा आवर्ती खर्च अधिक  कर्जान उभे केलेल्या भांडवलावरील व्याजाची परतफेड होण्याच्या दृष्टीने पाणी पट्टीचा विचार होणे आणि त्यामुळे सर्व पाणी वापराला व सिंचन व्यवस्थापनाला एक आर्थिक शिस्त मिळेल अशीही आपेक्षा व्यक्त झाली. पण तसे काही घडले नाही.

१९८० च्या दरम्यान सिंचनाचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने 'लाभ क्षेत्र विकास यंत्रणेची' निर्मिती झाली. शेतकऱ्यांना नियमानुसार पाणी पुरविणारी व्यवस्था म्हणजे 'सिंचन व्यवस्थापन' हे मर्यादित उद्दिष्ट न ठेवता, कोरडवाहू शेतीचे समृद्धीप्रवण सिंचीत शेतीत रूपांतर करणे व सलग सिंचीत लाभक्षेत्राचा शेती उत्पादनावर आधारित आर्थिक विकास होण्यासाठी आधारभूत रचना उभी करणे, हे सिंचन व्यवस्थापनाचे व्यापक उद्दिष्ट असणे आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून लाभक्षेत्र विकास या बहुशाखीय व्यवस्थेची देशभरामध्ये निर्मिती करण्यात आली. राज्यामध्ये पाच प्राधिकरणाची निर्मिती करण्यात आली होती. वेगवेगळया विषयाची (पाणी पुरवठा, रानबांधणी, बियाणे, खते, औषधे, औजारे, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठा, साठवणी, वाहतूक, कर्ज पुरवठा ई.) माणसे एका सामुहिक उद्दिष्टासाठी एकोप्याने काम करू शकली नाहीत. काळाच्या ओघात हा प्रयोग यशस्वी झाला नाही असेच म्हणावे लागेल.

गेल्या ५० वर्षात धरण, कालवे, वितरीका याच जाळं पसरिवण्यात आपण लक्षणीय यश मिळविलेलं आहे असं म्हटलं तर अतिशोक्ती ठरू नये. सिंचनाचा वापर मात्र तुलनेने बराचसा कमी राहिलेला आहे. त्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे क्षेत्रीय स्तरावर भिजणाऱ्या क्षेत्राच्या खऱ्या आकडेवारीचं एकत्रीकरण करण्यासाठीची ढिसाळ व्यवस्था. प्रकल्पाच्या पाण्यातून किती क्षेत्र नेमकं भिजतं याचा सोप्या पद्धतीने शोध घेणाऱ्या व्यवस्थेचा अभाव आहे आणि त्यामुळे खरी आकडेवारी एकत्रित होत नाही. यातील दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे पीक पद्धतीतील बदल आणि पावसाळी हंगामात सिंचनाखाली येणारे अल्पसे क्षेत्र. राज्याच्या वेगवेगळया भागात खरीपामध्ये कालव्याच्या पाण्यातून पिके वाढवली जात नाहीत. सिंचनक्षमतेच्या आकडेवारीमध्ये खरीपातील भिजणारे क्षेत्र अंतर्भूत केलेले आहे. प्रकल्पीय सिंचन क्षमतेची फेर मांडणी हा त्यावरील उपाय आहे. पण हे घडत नाही.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागामार्फत दरवर्षी पाण्याचा हिशोब मांडला जातो. प्रकल्पात पाणी किती आलं, त्यातून पिण्यासाठी आणि उद्योगासाठी किती पाणी वापरलं, सिंचनासाठी किती वापरलं गेलं, किती सिंचन झालं आणि एक एकक पाण्यातून किती संपत्ती निर्माण झाली ई. ची आकडेवारी प्रसिद्ध केली जाते. २००८-२००९ अहवाल काय सांगतो? सरासरी एक हेक्टर जमिन सिंचनाखाली आणण्यासाठी ६००० घ.मी. ते १०,२५० घ.मी. पर्यंत पाण्याचा वापर होतो. एक दशलक्ष पाण्यातून १०० हेक्टरच्या आसपास सिंचन होते. निर्मित सिंचन क्षमतेचा वापर ६० ते ७० टक्क्याच्या आसपास रेंगाळत आहे. एक हेक्टर सिंचीत क्षेत्रापासून मिळणारे उत्पन्न २० हजार ते ४० हजार रूपयापर्यंत आहे. एका घ.मी. पासून निर्माण होणारी संपत्ती रू.४ ते ५ च्या दरम्यान आहे.

ही आकडेवारी निराशाजनक आहे. एक हेक्टर सिंचीत

क्षेत्रापासून सरासरी रू.एक लक्ष ते अडीच लक्षाचे उत्पादन आज अनेक शेतकरी घेत आहेत. एक घ.मी. पाण्याचे रू.५० ते १०० संपत्तीत रूपांतरण करत आहेत. एक हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्यासाठी साधारणत: ५ हजार घ.मी. पेक्षा पाणी जास्त लागू नये. जागतिक सरासरी पण याच दरम्यान आहे. हे यश प्रकल्पाच्या बाहेरील क्षेत्रातील आहे. एक दशलक्ष घ.मी. पाण्यातून किमान २०० हेक्टर सिंचन होण्याची गरज आहे आणि निर्मित सिंचन क्षमतेच्या तुलनेत सिंचनाचा वापर हा जास्त होण्याची गरज आहे कारण अलिकडे मोठया प्रमाणात सिंचन हे उपशाखाली होत आहे, ज्याची कार्यक्षमता अधिक आहे.

राज्याची निर्मिती १९६० ला झाली. राज्याच्या वेगवेगळया भागासाठी (विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र) वेगवेगळे सिंचनाचे कायदे आणि नियम होते. सिंचनासाठी एकच कायदा करण्यासाठी १९७६ हे वर्ष उजाडले. त्या कायद्याचे अद्यापी नियम झालेले नाहीत. तदनंतर २००५ साली शेतकऱ्याच्या सहभागातून सिंचन व्यवस्थापनाचा कायदा अस्तित्वात आला आहे. सिंचन व्यवस्थापन शेतकऱ्यांच्या गटाला हस्तांतरण करण्याची प्रक्रिया १९९२ पासून सुरूवात झाली. गेल्या १८ वर्षांमध्ये कालव्याखालील केवळ ४ लक्ष हेक्टर क्षेत्र सुमारे १२०० पाणी वापर संस्थांना हस्तांतरीत करण्यात आपण यशस्वी झालो आहोत. तीन हजारापेक्षा जास्त प्रकल्प संख्या असणाऱ्या राज्यात आजपावेतो केवळ दोन प्रकल्प (वाघाड आणि काटेपूर्णा) शेतकऱ्याच्या पाणी वापर संस्थेच्या शिखर संस्थेला हस्तांतरीत करू शकलो. पाणी मोजून देण्याची जबाबदारी आपण स्विकारलेली आहे. पाणी मोजणारी साधने बसविण्याकडे आपण अनास्था दाखविलेली आहे. पाणी जर मोजले जात नाही तर पाण्याचा लेखा, बेन्चमार्कींग या प्रक्रियेला कसला अर्थ प्राप्त होणार, असेही प्रश्न जाणकारांकडून विचारले जात आहेत. शेतकऱ्याच्या सामुहीक व्यवस्थेकडे सिंचन व्यवस्थापन हस्तांतरण करून देण्याचा प्रवास फारच संथ गतीन चालू आहे.

२००३ ला राज्याची जलनिती ठरवली गेली आणि २००५ ला पाणी नियमनासाठी एक स्वायत्त असे प्राधिकरण निर्माण केले गेले. खोऱ्यातील पाण्याचं समन्यायी वाटप केलं जावं अशी प्राधिकरणाच्या कायद्यात तरतूद आहे. अनेक वेळा एकाच खोऱ्यामध्ये वरची धरणं भरली जातात आणि खालची रिकामी राहतात. अशा आपतकालीन स्थितीत खोऱ्यामध्ये किमान गरजा परीपूर्ती करण्याच्या दृष्टीने पाण्याचं संक्रमण कसं करावं याचे नियम ठरविण्यात आपण पुढाकार घेतला नाही.

प्रकल्पासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या. त्यांचे पुर्नवसन करण्याची जबाबदारी स्विकारली. आधी 'पुर्नवसन मग धरण' हे तत्त्व कायद्याने स्विकारलं. पण त्याचं अनुपालन करण्यात मानवी दृष्टीकोन दाखविला नाही. गेल्या ३०-४० वर्षात जे प्रकल्प आपण हातावेगळे केले त्या प्रकल्पातील बाधीत लोकांना आपण किमान अंशी कायद्यातील तरतुदीप्रमाणे पण पुर्नवसित करू शकलो नाही. कालवे, धरण या पार्थीव सांगाडयाबद्दल आपलं प्रेमाचं नातं जुळलं. पण बाधिताबरोबर मानवी नातं आपण निर्माण करू शकलो नाही. अनेक प्रकल्प-बाधीत बेघर व अनवाणी झाले आहेत. वीस वीस वर्ष मावेजा न मिळालेली प्रकरणे आहेत. त्यांनी कोणाकडे जावे? त्यांना न्याय देण्याची जबाबदारी टाळता येणार नाही.

सिंचन विकासाचा उद्देश शेती उत्पादनात वाढ करून ग्रामीण जीवनात आर्थिक उन्नती आणणे हा आहे. या उद्दिष्टाचा अर्थ सिंचन व्यवस्थेचे पार्थीव सांगाडे निर्माण करणाऱ्यापर्यंत पोहचविला गेला नाही. धरण बांधणे आणि कालवे काढणे हेच पाटबंधारे विभागाचं (सध्याचा जलसंपदा विभाग) उद्दिष्ट आहे याच धारणेमध्ये आपण रममाण राहिलो आहोत का? असाही प्रश्न पुढे उभा टाकतो.

एकात्मिक नियोजन हा शब्दप्रयोग आपण अनेक ठिकाणी वापरतो. खोऱ्यातील पाणी खोऱ्यात निवास करणाऱ्या सर्वांचं पाणी आहे. प्रत्येकाचा हिस्सा समन्यायी पद्धतीने ठरणे आवश्यक आहे. गेल्या ५० वर्षात आपला बिगर सिंचनाचा वापर २० टक्क्यांपर्यंत वाढलेला असताना प्रकल्प नियोजनात बहुविध उद्दिष्ट आणले गेले नाहीत. याचा परिणाम सिंचन निर्मितीचं पार्थीव जाळं वाया घालविण्यात होत आहे. आजही आपण पुढच्या २०-३० वर्षाच्या वेगवेगळया प्रयोजनाच्या गरजा विचारात घेऊन प्रकल्पाची बांधणी करत नाही. प्रकल्प सिंचनासाठी आणि वापर मात्र बिगर सिंचनासाठी असं चित्र अनेक प्रकल्पावर दिसून येतं. बिगर सिंचनाचा वापर करणाऱ्याची पण मनोवृत्ती आयत्या बिळातील नागोबा याच वृत्तीची झालेली आहे.

धरणं बांधले, कालवे काढले म्हणजे प्रकल्पाचं उद्दिष्ट पूर्ण झालं अशा कल्पनेत आपण वावरत आहोत. एक एकक पाण्यातून किती संपत्ती निर्माण केली यावरून त्या प्रकल्पाच्या उद्दिष्ट पूर्तीचा अंदाज घेण्याची गरज आहे.

सिंचन प्रकल्पाची सुरूवात सह्याद्रीच्या पूर्व घाटात

पाण्याचे साठे निर्माण करून कालव्याद्वारे ते पाणी सपाट प्रदेशात दूरवर दुष्काळी भागात खेळविणे या हेतूने झाली. हाच विचार डोळयापुढे ठेऊन भंडारदरा, दारणा, पाणशेत, वरसगांव, भाटघर इ. धरणे निर्माण केली गेली आणि कालव्याद्वारे माळशिरस, अकलूज, कोपरगांव, संगमनेर अशा कमी पाऊस पडणाऱ्या भागात पाऊस जास्त पडणाऱ्या भागातील पाणी घेऊन जाऊन शेतीला आधार दिला. सहयाद्रीच्या घाटात पाणी साठवणीला अनुकूल ठिकाण मिळाली. जलाशयाच्या अवतीभोवती पण लागवडीखालील जमिनीच प्रमाण फारच कमी होत. त्यामुळे सिंचनाचा विकास हा सपाट प्रदेशात कालव्याच्या माध्यमातून करण्याच धोरण स्विकारल गेलं. सपाट प्रदेशात उदा. उजनी, जायकवाडी, मांजरा ई. ठिकाणी धरणे बांधून सिंचनासाठी त्या पाण्याच्या वापराचं नियोजन करताना भंडारदरा, पानशेत सारखं तत्व स्विकारणं कितपत बरोबर आहे? याचाही विचार करण्याची गरज निर्माण होते. जलाशयाच्या भोवती पण विस्तृत प्रमाणात लागवडीखालील क्षेत्र आहे आणि धरणाच्या वरच्या भागात पण धरणाच्या खालच्या भागाइतकीच पाण्याची गरज आहे. याचा विचार करून उपसा आणि कालवे याच्या एकत्रिकरणातून सिंचनाचा विकास घडविणे अधिक किफायतशीर आणि सामाजिक न्यायाला धरून होतो. धरणं आणि कालवे या चाकोरीच्या बाहेर येण्याची गरज होती. ज्या ज्या ठिकाणी आपण ही चाकोरी ओलांडली नाही त्याठिकाणी लोकांनी जलाशयाच्या भोवती उपसा पद्धतीने सिंचनाचा विस्तार केला. उजनी, जायकवाडी, मांजरा, मानार यासारखी अनेक उदाहरणे आहेत. त्या ठिकाणी कालव्यापेक्षा जलाशयाभोवतीचं सिंचीत क्षेत्र अधीक प्रभावीपणे विकसीत झालेलं आहे. कालव्याचा अशा परिस्थितीत आकार पण कमी लागतो व खर्चात बचत होते. जलाशयात साठलेलं पाणी धरणाच्या खाली कालव्याच्याचं मालकीचं आहे या विचाराशी आपण घट्ट राहिलो. बर्वेआयोगाच्या शिफारशीनंतरच आपण कालव्यावरून १० टक्के आणि जलाशयावरून ६ टक्के उपशाने पाणी वापरण्यास परवानगी देण्याचं धोरणं स्विकारलं. या १० टक्के आणि ६ टक्क्याला कसलाही शास्त्रीय वा आर्थिक आधार नाही. प्रकल्पानुसार लाभव्ययाचा विचार करून हे प्रमाण ठरविणे न्यायोचित होणार आहे. त्या दिशेने सिंचनाचा पुढचा प्रवास होण्याची गरज आहे. पाणी बचतीच्या सिंचन पद्धतीच्या स्विकारातून हा प्रश्न सुटू शकतो.

सिंचनाच्या पहिल्या टप्प्यात धरणं आणि कालव्याचा आधार घेतला. त्यानंतरच्या टप्प्यात लाभक्षेत्रात आणि त्याच्या बाहेर उपसा पद्धतीने सिंचन करण्यास सुरूवात झाली. लाभक्षेत्रात विहिरीच्या माध्यमातून कालवे आणि भूजलाच्या पाण्याचा एकत्रित वापरास सुरूवात झाली. यानंतर लाभक्षेत्राच्या सर्वांगिण विकासाचा विचार पुढे आला. यातूनच लाभक्षेत्र विकास यंत्रणेचा जन्म झाला. निर्मित सिंचन क्षमतेचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाला. शेतावरील पाटचाऱ्या शासनाच्या खर्चाने करून देण्यात आल्या. शेतकरी जास्त परावलंबी व पंगू बनू लागला. पाण्याचा कार्यक्षम वापर होण्याच्या दृष्टीने शेतकऱ्याच्या समूहाला पाणी मोजून देणे, पीक स्वातंत्र्य देणे, पाणीपट्टी वसुलीचे अधिकार देणे, वितरण व्यवस्था निटनिटके ठेवण्याची जबाबदारी देणे हा विचार जास्त प्रभावी ठरू लागला. शेतकऱ्याच्या समुहाला पाण्याचा हक्क दिल्यामुळे पाण्याची उत्पादकता वाढणार आहे. थोडक्यात इतिहाकालीन सामुहिक सिंचन व्यवस्थेच्या तत्वाचा आपण आधार घेतला. त्यादृष्टीने शासनाने कायदा केला. दृतगतीने त्यादिशेने जाण्यासाठी शेतकऱ्याला जागं करणं आवश्यक आहे. सिंचनातून समृद्धी गाठण्यासाठी शेतकऱ्याचं प्रशिक्षण आवश्यक आहे. सिंचन व्यवस्थेमध्ये जी मंडळी काम करणार आहेत त्यांना पण प्रशिक्षित व्हावं लागणारं आहे. नवीन बियाणाचा वापर, औजाराचा वापर, टिश्यु कल्चरचा वापर, पिकाच्या वाढीला नेमकं किती पाणी लागतं या सर्व गोष्टी शेतकऱ्यांना समजावून सांगण्याची गरज आहे. केवळ पारंपारिक शेती आणि सिंचन व्यवस्थेवर विसंबून राहून भागणार नाही, याची जाणीव शेतकऱ्यामध्ये निर्माण होण्याची गरज आहे. या विकासाच्या टप्प्याबरोबरच पाण्याचा कार्यक्षमपणे वापर करण्यासाठी ठिबक, तुषार, डिफ्युजर, हरितगृहे या नविन सिंचन पद्धतीचा स्विकार करण्याची गरज आहे. सिंचन व्यवस्थापनात काम करणारा शासकीय अधिकारी शेतकऱ्याला मार्गदर्शन करण्याइतपत सक्षम होण्याची गरज आहे. केवळ अभियांत्रिकी शिक्षणामधली तज्ज्ञता पुरेशी राहणार नाही. अभियांत्रिकीबरोबरच माती, पाणी, वनस्पती या सर्व बाबींचं शास्त्र समजून घेण्याची क्षमता त्याच्या अंगी असण्याची गरज आहे. थोडक्यात सिंचन व्यवस्थापनातला अधिकारी हा कृषी व अभियांत्रिकी शाखेतला माहितीगार होणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने सध्याच्या व्यवस्थेमध्ये बदल अपेक्षित आहेत. प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात आधुनिक सिंचन पद्धती अद्यापी प्रवेश केलेली नाही. ही वस्तुस्थिती याबाबतीत बरचसं काही सांगून जाते. यावरून आत्मपरिक्षणाची गरज निर्माण होत आहे.



हे करत असतानाच उंचावरल्या जमीनिची तहान भागविण्यासाठी पाणी दूरवर आणि उंचावर घेऊ न जाण्याची मागणी पुढे येत आहे. तांत्रिकदृष्टया हे जरी शक्य असले तरी सामाजिक आणि आर्थिकदृष्टया या व्यवस्था हाताळण्याची क्षमता अंगी असणे गरजेचे आहे. विजेची उपलब्धता, त्याची किंमत देण्याची सक्षमता आणि त्यातून फायदा मिळवणारी पीक व्यवस्था या सगळयाची सांगड घालण्याची गरज आहे. अन्यथा अभियांत्रिकी क्षेत्रातील उच्चांक दर्शविणारे पार्थीव सांगाडे व्यवहारिक पातळीवर कुचकामी ठरत आहेत असे चित्र उभे ठाकेल. अशारितीने गेल्या ५० वर्षात महाराष्ट्रातील सिंचन वेगवेगळया टप्प्यातून प्रवास करीत पुढे जात आहे. प्रत्येक टप्प्यातील अडचणीतून धडा घेऊन भविष्याचा मार्ग सोपा करणे हे शहाणपणाचं राहणारं आहे.

सिंचनाचा प्रवास धरण, कालवे, बंधाऱ्यापासून सुरूवात झाला. १९७२ च्या दुष्काळाने पाणलोट क्षेत्र विकासाच्या प्रक्रियेला पुनर्जीवीत केलं. पाझर तलाव हे भूजल पुर्नभरणाचं भरवशाचं साधन प्रसिद्धीस आलं. रोजगार हमी योजनेचा जन्म झाला आणि यातूनच पाझर तलाव, भूमिगत बंधारे, गांव तलाव, कोप बंधारे, वन तलाव, साठवण तलाव, माती नाला बांध, सिमेंट बंधारे, वसंत बंधारे, सिसिटी, डिसिटी, लुजबोल्डर्स् या पाण्याचे पुनर्भरण करण्याच्या साधनांचा उदय झाला. पारंपारिक कालव्याच्या आखत्यारित न येणाऱ्या क्षेत्रासाठी पाणलोट क्षेत्र विकास हा एकच उपाय हे ही सत्य आता स्विकारण्यात आलेलं आहे. इतकचे नाही तर पाण्याची चणचण असणाऱ्या भागात विपुल पाण्याच्या प्रदेशातून पाण्याचे संक्रमण करणाऱ्या योजनांचा देखील स्विकार करावा लागणार आहे. अशा अनेक योजना राज्यामध्ये राबविण्यात आलेल्या आहेत व येत आहेत.

पडणारा पाऊस हा दोलायमान आहे. ठराविक काळानंतर दुष्काळाची वर्षे येणारचं. १९७२, १९८६, १९९२, २००१, २००२, २००३ हे दुष्काळाचे वर्षे राज्याने पाहिले. पाणलोट क्षेत्र विकास आणि त्यातून निर्माण झालेल्या पाण्याचा विवेकाने वापर आणि यातून स्वयंपूर्णता गाठलेली राज्यामध्ये अनेक उदाहरणे पुढे आलेली आहेत. वर्षाला पावसाच्या माध्यमातून वेगवेगळया खोऱ्यामध्ये उपलब्ध होणारे पाणी हे वेगवेगळया परिमाणाचं राहणारं आहे. नियोजनासाठी गेल्या ५० वर्षात आपण ७५ टक्के विश्वासार्हतेचा स्विकार केलेला आहे. हे उत्तर शास्त्रीय नाही हे आता पटलेलं आहे. बदलणाऱ्या आकडेवारीचं उत्तर हे सरासरीमध्ये असतं आणि सरासरी विश्वासार्हता ही यापुढे स्विकारावी लागणार आहे.

हरितक्रांतीचे परिणामातून राज्यातील शेतकरी शहाणा झाला आहे. राज्याने १९६१ ला च पाणशेत धरण फुटीचा अनुभव घेतलेला आहे. १९६७ ला कोयनेचा भुकंप, १९८३ ला भातसाचा भुकंप, १९९३ चा किल्लारीचा भुकंप पण अनुभवला आहे. यातून पाटबंधारे खाते बरचसं काही शिकलं. येत्या काळात अशी परिस्थिती जर उद्भवलीच तर त्यावर मात करण्याची क्षमता शासनप्रणालीत आणि लोक व्यवस्थेमध्ये रूजलेली आहे असे म्हणणे धाडसाचे होणार नाही.

याच विभागाने सुरूवातीपासूनच जलविद्युत निर्मिती करण्याचं दायित्व स्विकारलेलं आहे. राज्याच्या निर्मितीच्या वेळी ३०० मेगावॅट क्षमता असावी. ती वाढवून ३५०० मेगावॅट चा आकडा ओलांडला आहे. या प्रवासात लेक टॅपिंग, फ्लायॲशचा वापर करून घाटघर उदंचण जलविद्युत केंद्राची निर्मिती यासारखे उपक्रमपण या विभागाने हाताळले आहेत.

आपण प्राथमिक उत्पादनात अद्यापी गुंतून आहोत. आपली शेतीतील दर हेक्टरी उत्पादकता फार कमी आहे. कालव्याचं पाणी असो वा विहिरीचं पाणी, लाभधारकांमध्ये ते कसं वाटावं या गुंतागुंतीतून अद्यापी बाहेर पडलो नाही. समन्यायी पाणी वाटपाच्या व्याख्येचा अर्थ समजून घेण्यातच ५० वर्षे उलटून गेलेली आहेत. शेतीला समृद्धी देण्यासाठी प्राथमिक उत्पादनाचं रूपांतरण कृषी प्रक्रिया उद्योगाद्वारे टिकाऊ आणि जास्त मूल्यवान पदार्थात करण्याची गरज आहे. उसाला साखर कारखान्यांनी उत्तर दिलं. देशामध्ये जितकी साखर निर्माण होते तिच्या १/३ साखर एकटया महाराष्ट्रात निर्माण



होते. ग्रामीण भागात रिकाम्या हाताला काम देण्यात राज्यातील जवळजवळ दोनशे कारखान्यानी हातभार लावलेला आहे असंही बोललं जातयं. सुरूवात सहकारी कारखान्यापासून झाली. ५० वर्षे उलटत असताना खाजगी कारखान्याने आपली पकड या क्षेत्रावर मिळविली आहे. आर्थिक बेशिस्त आणि राजकारणाचा नको तितका शिरकाव यामुळे सहकारी साखर कारखान्याचे कंबरडे मोडलेलं आहे. हे चित्र या ५० वर्षातून पुढं आलं आहे.

राज्यांमध्ये वेगवेगळया भागात वेगवेगळी फळे पिकतात त्यावर प्रक्रिया उद्योग बसविण्यात आपण समक्ष झालो नाही. कापसापासून कापड इथपर्यंत प्रवास आपला झाला नाही. जळगांव येथील जैन इरिगेशन ग्रुपने मात्र कृषी प्रक्रिया उद्योगात भरारी मारून शेतकऱ्यांना उस आणि कापूस व्यतिरिक्त उत्पादनाला चांगली बाजारपेठ मिळवून दिलेली आहे. कराराची शेती हा त्यांचा आधार आहे. हजारो टन कांदा, आंबा, डाळींब, पपई, आवळा, भाजीपाला, सिताफळ यावर प्रक्रिया करून त्याचं टिकावू पदार्थात रूपांतर करून आंतरराष्ट्रीय क्षेत्रात या पिकांना बाजारपेठ मिळवून देण्यात या संस्थेचा मोलाचा वाटा राहिलेला आहे. खाजगी क्षेत्रातून जैन इरिगेशन सारखे कृषी क्षेत्राला आधार देणारे उद्योजक राज्याच्या वेगवेगळया भागात निर्माण होण्याची गरज आहे. एकटे जैन कसे पुरणार?

गहू, भात, भाजीपाला यांना कालव्याच्या पाण्याचा आधार देऊन उत्पादनात वाढ करून शेतकऱ्याला आर्थिक आधार देण्याच्या विचारातून ब्रिटिश कालावधीपासून सिंचनाची सुरूवात झाली. राज्याच्या निर्मितीनंतर साखर कारखाने वाढीस लागले. उसाला बाजारपेठ मिळाली. यातून राज्यामध्ये उस वाढला. एकंदरीत पाणी उपलब्धतेच्या दृष्टीने राज्याचे तुटीच्या क्षेत्रात वर्गीकरण होऊन सुद्धा उस पिक खूप वाढले. हा विरोधाभास या ५० वर्षांमध्ये निर्माण झाला. १९७० च्या आसपास हरितक्रांतीचे युग आले. स्थानिक पिकाचे वाण मागे पडले. हायब्रीड पिकं, रासायनिक खतं, किटकनाशके यासारखे शब्द शेतकऱ्यांच्या अंगवळणी पडले. १५-२० वर्षाच्या प्रवासात शेतीचा कस घटला आणि शेतकरी पूर्णपणे पंगू झाला. सेंद्रीय शेती तो विसरला. स्वतःच्या शेतात बि निर्माण करण्याचं कसब तो गमावून बसला. जमिनी नापिक झाल्या. हे ५० वर्षात घडलं. आता त्याला माती परिक्षणातून शेतीची सुपिकता टिकवावयाची आहे. हरीतक्रांतीच्या कालखंडात दोनच पिके जोमाने वाढली भात, आणि गहू. जीवनाला आवश्यक असणारी डाळी, तेलबिया सारखी पिके मागे पडली.

■■